**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७१

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. जयचंद्र श्रीकिशन मोदानी, :अपिलार्थी
रा. पैठण, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
मुख्याधिकारी नगर परिषद, पैठण,
जि.औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी,
नगर परिषद, पैठण, जि.औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक,
नगर परिषद, पैठण, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी,
नगरपरिषद, पैठण, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, नगर परिषद कार्यालयातील मोजमापपुस्तिका क्र. ९१ मध्ये जी बीले रेकॉर्ड केली आहेत, त्या बीलांच्या झेरॉक्स प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०५.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या मोजमापपुस्तिका क्र.९१ मधील कामांच्या व देयकांच्या छायाप्रती, सदर रेकॉर्ड नगर परिषद कार्यालयात नसल्यामुळे, देता येत नाही, असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती उपलब्ध झाली नसल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, पैठण नगर परिषदेने वेगवेगळया कामांवर मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केला असून हा भ्रष्टाचार शोधण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पैठण शहरामध्ये आलेल्या पूरानंतर मागितली आहे. ती माहिती पुरात वाहून गेल्याची शक्यता आहे. त्यांना ही माहिती त्यामुळे त्यांच्या कार्यालयात आढळून आली नाही. यावर अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, पैठण नगर परिषद कार्यालय पूराच्या वेळी सुस्थितीत होते व ते उंचावर आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०८.०८.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा सखोल शोध घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केले आहे. यावरुन नगर परिषदेच्या पैठण विभागामध्ये पूर्वी मोजमाप पुस्तिका क्र. ९१ अस्तित्त्वात होती, असा निष्कर्ष आयोग काढत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी आयोगास असा लेखी युक्तिवाद सादर केला आहे की, या अभिलेख्यांचा शोध घेण्याचे काम त्यांच्याकडे चालू आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करीत नाही. कारण अभिलेखे शोधण्याचे काम जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्यावर सोपविले होते. तथापि आजतागायत म्हणजे एक वर्ष आणि तीन महिन्याचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकली नाही, या वस्तुस्थितीकडे आयोगास डोळेझाक करता येणार नाही. मूळात या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी खरोखरीच अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा शोध घेतला होता किंवा कसे, हे देखील आयोगास पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. तेव्हा आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सात दिवसांच्या आत शोधून ती अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे आणि जर या कालावधीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, नगरपरिषदेकडे आढळून आली नाही तर, नगर परिषद कार्यालयाच्या ज्या कर्मचाऱ्यांच्या ती ताब्यात होती अथवा ज्यांच्यावर ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी होती, त्यांच्यावर फौजदारी संहितेप्रमाणे कारवाई करावी व त्याची प्रत अपिलार्थीस द्यावी, असे मुख्याधिकारी, नगर परिषद,पैठण यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयचंद्र श्रीकिशन मोदानी,रा.रंगारहट्टी, गोजरे गल्ली, पैठण, ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७२

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. सुरेश साळवे, :अपिलार्थी
रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
संशोधन अधिकारी तथा सभासद सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी
समिती, नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
नाशिक.

त्रयस्थ पक्ष : श्री. आर.व्ही. परदेशी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते, परंतु अद्यापपर्यंत अपिलावर कार्यवाही न करण्यात आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष

श्री. आर.व्ही. परदेशी यांनी वैधता प्रमाणपत्र क्र. १८६६९ दि. २९.०१.२००८ च्या वैधता प्रमाणपत्राची प्रत व सोबत नमुन्यातील अर्ज व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे (पुरावे), समितीचा अहवाल, कार्यालयीन टिपणी, वैधता प्रमाणपत्र, सहाय्यक निबंधक खुलताबाद यांचा दि. १८.०१.२००८ चा प्रस्ताव यासंबंधी मागणी केली होती. तथापि ही माहिती, अपिलार्थीस विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने व त्यांच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक यांच्याकडे दि. १३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणताही निर्णय न दिल्याने आणि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत..

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील विनंतीशी सुसंगत असा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित असून त्यांनी आजच्या सुनावणीच्या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. आर.व्ही. परदेशी यांच्या जातीच्या वैधता प्रमाणपत्रांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित दि. १३.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१३.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला नि-र्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश साळवे,प्रगती कॉलनी, म.न.पा.शाळेजवळ, मकाईगेट रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती

प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७३

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, :अपिलार्थी
रा. ताडकळस, ता.भोकरदन, जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
भोकरदन, जि.जालना.

२ जन अपिलीय अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
भोकरदन, जि.जालना.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,
भोकरदन, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी,
भोकरदन, जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने आणि त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतरही त्यांनी सुनावणी न घेतल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील नदी खोरे योजना व रोहयोच्या अंमलबजावणीसंदर्भात सन २००७-०८ व २००८-०९ या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणात व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "मंडळ अधिकारी, भोकरदन यांनी दि. ०१.०३.२००८ ते दि. ३१.०३.२००८ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेवर खर्च केलेली रक्कम, कामाचे हजेरीपत्र,क्रमांक व रक्कम, कोणकोणत्या गावात किती कामे करण्यात आली, तालुका कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी तसेच कृषि पर्यवेक्षक यांनी नियमाप्रमाणे किती टक्के व किती काम तपासली याचा मार्च महिन्याचा अहवाल, मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन यांनी नदी खोरे योजनेतून माहे एप्रिल, ०७ ते मार्च, २००८ या कालावधीमध्ये कोणकोणती कामे केली, या कामांची हजेरीपत्रके, क्रमांक व रक्कम, गावनिहाय कामांची संख्या, कामाचा प्रकार,हजेरीपत्रक क्र. यांची रक्कम व कामाच्या तपासणी रिपोर्टच्या प्रती" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४,०६४/- इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने दि. ०८.०८.२००८ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०८.२००८ रोजी व्यक्तिशः माहिती हस्तांतरित केली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने दि. २८.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात दि. ०८.०८.२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांनी ही माहिती, त्यांच्या मूळ अर्जात मागितल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २९.०८.२००८ रोजी व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न देण्याचे कारण त्यांना आयोगाने विचारले असता, त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ज्या दिवशी सुनावणी ठेवली होती, त्याच दिवशी अपिलार्थीस माहिती तयार असल्याचे त्यांनी कळविल्यामुळे व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतला नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत असून केवळ जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली म्हणून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेणे हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे द्योतक आहे, असे त्यांना येथे स्पष्ट करण्यात येत आहे. अपिलार्थीने ज्याअर्थी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले आहे, त्याअर्थी अपिलार्थीचे प्राप्त माहिती संदर्भात निश्चित काहीतरी म्हणणे असणार, हे उघड आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदारास प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर प्राप्त माहितीवर त्यांचे समाधान न झाल्यास त्यांच्याच कार्यालयाच्या अपिलीय अधिकाऱ्याकडे त्यांनी या माहितीसंदर्भात त्यांचे आक्षेप अपिलाद्वारे नोंदविण्याची तरतुद आहे. या प्रकरणी ज्याअर्थी, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले त्याअर्थी, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे निश्चित काहीतरी आक्षेप असणार, हे उघड आहे. हे आक्षेप स्पष्ट

करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असून यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे नमूद केले आहे. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या संपूण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे असद्हेतूने टाळले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आलेले नाही किंवा यासंदर्भातील कोणताही लेखी पुरावा सादर करण्यासाठी अथवा तोंडी युक्तिवाद आयोगासमोर करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात जन अपिलीय अधिकारी यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची सखेद नोंद आयोगाने घेतली असून, ही नोंद कृषि आयुक्त यांनी देखील घ्यावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश गंगाराम बनकर,रा. ताडकळस, पो.सिपोरा (बाजार), ता.भोकरदन, जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७४

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. शिवदास दामोधर शहाणे, :अपिलार्थी
रा.अंबड, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी
कार्यालय,जालना.

२ जन अपिलीय अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
जालना.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, जालना
जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, जालना

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती उपलब्ध झाली नसल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले असून, जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश त्यांना अमान्य आहेत, असेही त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २७.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, रोजगार हमी योजना जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २००८च्या इस्टीमेटची, मस्टरची झेरॉक्स प्रत, किती निधी उपलब्ध झाला, त्या निधीतून किती निधी वाटप

करण्यात आला व कोणाला विश्वासात घेऊन वाटप करण्यात आला, याची माहिती तीस दिवसांच्या आत देण्यात यावी, अशी माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपात असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. ०२.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना, दि. २८.०७.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही जन माहिती अधिकारी यांनी, दाखविली. याच दिवशी अपिलार्थीने तालुका कृषि अधिकारी, जालना यांना माहिती प्राप्त झाल्याने सदर प्रकरण निकाली काढावे, असे त्यांच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या दि. २७.०५.२००८ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात वेगळ्या अर्जाद्वारे नमूद केले आहे. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत दिली आहे. यावरुन अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. तथापि माहिती प्राप्त झाली नसल्याचे दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस आयोगाने त्यांना निश्चित कोणत्या विषयाची माहिती हवी आहे, असे विचारले असता, अपिलार्थीने या प्रश्नाला कोणतेही उत्तर दिले नाही. या प्रश्नावर त्यांनी आयोगास असे उत्तर दिले आहे की, त्यांना ज्या विषयाची माहिती पाहिजे आहे,त्या विषयाचा उल्लेख त्यांनी अर्जामध्ये केलेला आहे,

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये '२०८' असा आकडा लिहिलेला आहे. अर्थात अपिलार्थीस २००८ सालची माहिती हवी आहे, असे गृहीत धरुन त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. २८.०७.२००८ रोजी व्यक्तिशः हस्तगत केलेली आहे व यासंदर्भात त्यांच्याकडे अपिलार्थीने पोचसही दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हवी आहे, त्या कालावधीचा उल्लेख केलेला नाही. त्यांच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने '२०८' असे नमूद केले आहे. अपिलार्थीने अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख केला नसल्याने अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती द्यावयाची, हे अपिलार्थीशिवाय कोणासही कळणे शक्य नाही. आज देखील अपिलार्थीने आयोगाकडे झालेल्या सुनावणीमध्ये त्यांना ज्या विषयाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, त्याचा उल्लेख त्यांनी दि. २७.०५.२००८ रोजीच्या अर्जामध्ये केल्याचे आयोगास आढळून आले परंतु या अर्जामध्ये आयोगास फक्त २०८ हा आकडा आढळून येत आहे. अपिलार्थीस २०८ म्हणजे सन २००८ हे गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचही देखील त्यांनी आयोगाकडे सादर केली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या विचाराधीन अपिलामध्ये कोणताही तथ्यांश आढळून येत नसल्यामुळे सदर अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांकः १७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे,नुतन वसाहत, अंबड, जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७५

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. भास्कर बळिराम लटपटे, :अपिलार्थी
रा.कोद्री, ता. गंगाखेड, जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
मुख्याध्यापक,महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ
महाविद्यालय,
कोद्री, ता.गंगाखेड,जि.परभणी.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, परभणी.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर विहित कालावधी संपूनही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती विहित मुदतीत प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय,कोद्री यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून संबंधितांच्या कार्यालयात अपिलार्थीचे सदरचे अर्ज प्राप्त झाले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.०९.२०८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०१.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक: १७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर बळिराम लटपटे,मु.पो.कोद्री, ता. गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय, कोद्री, ता.गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७६

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. बालाजी सिताराम कदम, :अपिलार्थी
रा.पूर्णा, जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांचे आत माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांनी अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे हट्टा ते पूर्णा रोड दुरुस्ती व डांबरीकरण व पूर्णा उपविभागात झालेल्या डांबरीकरणासंदर्भात एकूण चार मुद्यांद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"१) माहे एप्रिल,२००७ ते मे, २००८ या कालावधीत हट्टा ते पूर्णा रोड दुरुस्तीचे टेंडर काढले होते का? काढले असेल तर टेंडरच्या छायांकित सत्यप्रती व अंदाजपत्रकाच्या व वर्क ऑर्डरच्या छायांकित सत्यप्रती (२) डांबरीकरण केले असेल तर डांबरीकरण कामाच्या अंदाजपत्रकाच्या व वर्क ऑर्डरच्या छायांकित सत्यप्रती,(३) सदरील रोडवर दुरुस्ती व डांबरीकरण कामाचे देयके अदा केली का? केली असेल तर मोजमाप पुस्तिकेची (M.B.) व चेक क्र.,दिनांक व एजन्सीचे नावासह कॅशबुकच्या छायांकित सत्यप्रती व (४) आपल्या पूर्णा उपविभागात सदरील कालावधीत डांबर किती आले, पैकी वापरले किती व शिल्लक किती? वापरलेले डांबर कोणत्या रोडवर किती कि.मी. वापरले ते रोडच्या नावासह यादी व वापरलेल्या डांबरात एकूण किती कि.मी. काम झाले."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१८.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०७.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि विहित कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी , जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.१०.२००८

रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. त्यांच्या युक्तिवादापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची त्यांना माहिती प्राप्त झाल्याची पोचसही आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपील दि. ०६.१०.२००८ रोजी पाठविले होते. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज आयोगाच्या कार्यालयात दि. १३.१०.२००८ रोजी प्राप्त झाला व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १०.१०.२००८ रोजी म्हणजेच त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल केल्यानंतर अपेक्षित माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास पुरविण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या कॅशबुकच्या प्रतींचा समावेश नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.१०.२००८ रोजी पुरविण्यात आलेली माहिती अपूर्ण असल्याचे आढळून आले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत पुरविण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कॅशबुकच्या संदर्भात वर नमूद केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीत कोणताही प्रतिसाद दिला नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०७.२००८ रोजी आदेशित करुनही अपिलार्थीस मुदतीत माहिती पाठविली नाही. तदनंतर जी माहिती पाठविली, ती वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपूर्ण स्वरुपाची पाठविली असल्याचे आयोगास आढळून आले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयीन सहाय्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी हे सर्वजण अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देण्यासाठी जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे कार्यालयीन सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील कॅशबुकच्या संदर्भातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक: १७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बालाजी सिताराम कदम,रा.श्रीरामनगर,साळूबाई गल्ली,पूर्णा, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७७

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. सय्यद रशिद सय्यद यासिन, :अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
सह उपवनसंरक्षक,
परभणी.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, वनविभाग,परभणी.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),परभणी
जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.),परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने "खॉजा सॉ मिल आजपर्यंत सील का केले नाही व सॉ मिलकरिता स्वतःच्या मालकीची जागा लागते का?" अशाप्रकारची माहिती त्यांना आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "खाजा सॉ मिल आजपर्यंत सील का नाही केले", या विषयासंदर्भात दि. ०५.०२.२००८ व दि. २८.०१.२००७ या दिनांकाशी संबंधित काही माहिती शीघ्र टपालाद्वारे

मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या दिनांक २८.०१.२००७ ते ०५.०२.२००८ च्या आक्षेप अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, सॉ मिलसाठी स्वतःच्या मालकीच्या जागेची आवश्यकता असते किंवा नगर परिषदेची अतिक्रमणाच्या जागेची आवश्यकता असते, सॉ मिलसाठी किती जागा लागते व ५० X ५० फूट अतिक्रमण केलेल्या जागेवर सॉ मिल उभी राहू शकते का?, नगर परिषदेने ५० X ५० फूट ही जागा ११ महिन्याकरिता करारपत्राने दिली असता जन माहिती अधिकारी यांनी सॉ मिल, १२ महिन्याकरिता परवाना नुतनीकरण कोणत्या नियमाप्रमाणे व अटीने देण्यात आले ही माहिती लेखी स्वरुपात व खॉजा सॉ मिलचे २००८ चे परवाना नुतनीकरणाची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क पोस्टेज खर्चासह एकूण रु. ६३/- इतके अपिलार्थीस स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९(१) प्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना पुरविण्यात येत असल्याचे नमूद करुन अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला आहे. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजी माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १८.०९.२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि १४.०७.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद हा अवैध आहे, कारण या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीनुसार दिलेला नाही. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ३ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी एकाच परिच्छेदामध्ये दिली असून अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी विचारलेल्या कोणत्याही मुद्यांचा समावेश नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीने दि. २८.०१.२००७ व दि. ०५.०२.२००८ रोजी केलेल्या आक्षेप अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, अपिलार्थीचे सदरचे कथित आक्षेप अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर संदर्भित विषयावर वेगवेगळया प्राधिकरणाकडे, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज दाखल करेपर्यंत म्हणजे दि. १४.०७.२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, ही होय. अशाप्रकारच्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्या असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोठेही अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये स्पष्ट भाष्य केलेले नाही. मूळात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील, नगर परिषदेने अकरा महिन्याकरिता करार केला असून वन विभागाने १२ महिन्याकरिता परवाना नुतनीकरण कोणत्या नियमाप्रमाणे

केले आहे, यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्पष्टपणे माहिती पुरविलेली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या परवाना नुतनीकरणाची प्रत पुरविल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना प्रत्यक्ष पुरविलेली माहिती, यांचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ४ च्या संदर्भातील माहिती,स्पष्ट स्वरुपात त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व ४ च्या संदर्भातील माहिती, स्पष्ट स्वरुपात त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद रशिद सय्यद यासिन,वांगी रोड, गफार किराणाजवळ,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.), परभणी यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.), वनविभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७८

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. होळकर लक्ष्मण मल्लाप्पा, :अपिलार्थी
रा. बंडूर ता.निलंगा,जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तहसील कार्यालय, निलंगा,
जि. लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,निलंगा,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे बंडूर येथील वहिवाटीसंदर्भात एकूण २ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अर्जाची छायांकित प्रत जमाबंदी विभाग, तहसील कार्यालय, निलंगा यांच्याकडे पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस पाठविली. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०७.२००८ रोजी तहसीलदार तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करणे आवश्यक आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, निलंगा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित दि. ०३.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०३.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. होळकर लक्ष्मण मल्लाप्पा,मु.पो. बंडूर ता.निलंगा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,निलंगा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, निलंगा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७९

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, :अपिलार्थी
रा.निलेगाव, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
अध्यक्ष व सचिव,
जलस्वराज्य प्रकल्प समिती,
मानेवाडी,ता.तुळजापूर,
जि.उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद,
उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊनसुध्दा त्यांना माहिती अधिकाऱ्याने माहिती दिली नाही. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२१.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अध्यक्ष व सचिव,

जलस्वराज्य प्रकल्प समिती, मानेवाडी, ता.तुळजापूर यांच्याकडे मौ. मानेवाडी येथे चालू असलेल्या कामासंदर्भात सन २००७-२००८ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधितांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दि. १६.०४.२००८ प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०९.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. तथापि त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, अध्यक्ष/सचिव, जलस्वराज्य प्रकल्प समिती,मानेवाडी व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार करावयाचा मूळ अर्ज अध्यक्ष व सचिव, जलस्वराज्य प्रकल्प समिती, मौ.मानेवाडी यांच्याकडे केलेला आहे. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे आदेश क्र. जिपउ/ जलस्व/ आस्था/ ३६०/०९, दि. ०१.०६.२००९ अन्वये जलस्वराज्य प्रकल्पाकरिता ग्रामपातळीवर संबंधित गावाच्या ग्रामसेवकाची माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज अध्यक्ष व सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा समिती यांच्याकडे केलेला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेले 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारच्या स्थानिक पाणी पुरवठा समित्यांचा समावेश होऊ

शकत नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीने माहिती मागताना ती सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागितली नसल्याने आणि तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर या प्रकरणासंदर्भात नेमक्या कोणत्या घडामोडी झाल्या, हे देखील सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळू शकत नाही, अशा परिस्थितीत अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार,रा.निलेगाव, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

२. अध्यक्ष व सचिव,जलस्वराज प्रकल्प समिती, मानेवाडी,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

३. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मानेवाडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८०

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. जयराम शिवाजी शिंदे, :अपिलार्थी
रा.परतापूर, ता.कळंब, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,
कळंब,जि.उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, भूम,
जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०४.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या तालुक्यातील कार्डधारकांची संख्या, परवानेधारक रॉकेल विक्रेत्यांची नावे व पत्ते, सन २००५ ते २००८ या वर्षात वितरण केलेला रॉकेलचा महिन्यानुसार कोटा,सन २००५ ते २००८ या वर्षात सर्व कार्डधारकांना वितरीत करुन नोंद केलेल्या पावत्या व नोंद केलेल्या रेशनकार्डच्या साक्षांकित प्रती व वाटप रजिस्टर गावनिहाय झेरॉक्स प्रती,अशी माहिती नोंदणीकृत

टपालाद्वारे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने चुकीची, उशीरा व असंयुक्तिक माहिती प्राप्त झाल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य केले व अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि ०४.०६.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपेक्षेप्रमाणे कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दि. ११.०७.२००८ रोजीच्या आदेशान्वये सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर आज रोजी सुनावणीच्या दिवसापर्यंतच्या कालावधीमध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली किंवा कसे, हे आयोगास सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही, तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: निश्‍चित कोणती माहिती दिली, ती माहिती देखील अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील

अर्जासोबत जोडलेली नाही. अशाप्रकारे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय घेता येणार नाही. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थीसह सर्व संबंधित अनुपस्थित आहेत. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयराम शिवाजी शिंदे,रा.परतापूर,पो. पानगाव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८१

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. सुरेंद्र (राजेंद्र) मनोहर जाधव, :अपिलार्थी
रा. तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तहसील कार्यालय,उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार,उस्मानाबाद
त्रयस्थ पक्ष : श्री. द्वारकादास पांडुरंग बांगड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, दि.१६.०९.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी निकाल देऊनही आजतागायत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार, २००५ चे गांभीर्य वाटत नाही, त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० नुसार शास्ती लावावी व अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करावे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. द्वारकादास पांडुरंग बांगड, उस्मानाबाद दुकान नं.२६ यांच्याकडील रॉकेल परवान्यासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - रॉकेल विक्री परवाना कोणत्या स्वरुपाचा आहे, एकूण ग्राहकांची संख्या, विक्रीसाठी मिळणाऱ्या रॉकेलचा साठा, वितरण व्यवस्थेचा प्रकार,रॉकेल वितरण ठिकाणावरील दर, प्रत्येक ग्राहकास वितरणाचे प्रमाण, एकूण ग्राहक संख्या व त्यांची यादी आणि ग्राहकास रॉकेल विक्री केलेल्या दि.०१.०१.२००६ व ०१.०७.२००८ पर्यंतच्या पावत्या, वितरणाचे ठिकाण व वेळ - या मुद्यांचा समावेश होता.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून समक्ष घेऊन जाण्याचे आणि नियमाप्रमाणे दरपेज रु.२/- प्रमाणे शासन बँक भरणा करुन त्वरित हस्तगत करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारच्या मिळालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.०५.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०९.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे त्यांनी दि. २०.०९.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. या घटनेचा त्यांनी पंचनामा केला आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी या पंचनाम्याची प्रत आयोगास अवलोकनास्तव सादर केली व त्याचबरोबर अपिलार्थीस देऊ केलेली माहिती देखील त्यांनी आयोगास दाखविली.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांना, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात भेटले व त्यांच्याकडून पैशांची मागणी केली. ज्या वेळी त्रयस्थ पक्ष त्यांच्याकडे माहिती घेऊन गेले होते, त्यावेळी अपिलार्थीने ही मागणी केली होती.

त्रयस्थ पक्षाच्या व माहिती अधिकाऱ्याच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. १४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही निश्चितपणे कोणत्या कालावधीशी संबंधित आहे, याचा उल्लेख त्यांनी या अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे जी माहिती काळानुसार बदलत असते, ती माहिती अपिलार्थीस देय असणार नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३, ५,व ६ या तीन मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मूळातच देय असणार नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, आयोगास असे आढळून आले आहे की, मूळात ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्वत: जन माहिती अधिकारी या नात्याने न देता त्रयस्थ पक्ष श्री. द्वारकादास पांडुरंग बांगड यांनी तहसीलदार,उस्मानाबाद यांना दिलेल्या पत्राची

प्रत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती जन माहिती अधिकरी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांच्या कार्यालयातच उपलब्ध असावयास हवी. परंतु या प्रकरणी अपिलार्थीस स्वतः माहिती देण्याचे, जन माहिती अधिकारी यांनी टाळून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षामार्फत अपिलार्थीस परस्पर देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील श्री. बांगड यांच्याकडील रॉकेल विक्री परवाना कोणत्या स्वरुपाचा आहे, या माहितीवर श्री. बांगड यांनी तहसीलदार यांना, रॉकेल वितरण परवाना किरकोळ आहे, अशी माहिती दिली आहे आणि ही माहिती तहसीलदार अपिलार्थीस देऊ पाहत आहेत. त्याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ द्वारे अपिलार्थीने वितरणाचे ठिकाण व वेळ या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली आहे. वितरणाचे ठिकाण व वेळ हे कायम स्वरुपाचे असते. ते बदलणारे नसते. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षामार्फत, "शासनाने ठरवून दिलेले दुकान चालू असते" असे दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. एकूण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, तहसीलदार यांच्याकडे उपलब्ध असूनही त्यांनी ती स्वतः न पुरविता, त्रयस्थ पक्षामार्फत परस्पर पुरविण्याचा संबंधित जन माहिती अधिकारी यांचा हा प्रयत्न म्हणजे त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे द्योतक आहे, असे आयोग मानतो. तालुका पातळीवरील सार्वजनिक वितरण व्यवस्था प्राधिकरण म्हणजे तहसीलदार,अन्न व नागरी पुरवठा खात्याने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती तहसीलदार यांच्या कार्यालयातच उपलब्ध असावयास हवी. परंतु अशाप्रकारची माहिती ज्या-ज्या वेळी महसूल खात्यातील अधिकाऱ्यांकडून मागविली असता, एखादा अपवाद वगळता, सदर माहिती रॉकेल पुरवठाधारकाकडून घेऊन नंतर ती अर्जदारास पुरविण्याचा महसूल खात्यातील अधिकाऱ्यांचा प्रयत्न असतो, असे आढळून येत आहे. सबब या प्रकरणी सचिव (महसूल) व सचिव (अन्न व नागरी पुरवठा) यांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) मधील तरतुदीनुसार असे सूचित करण्यात येत आहे की, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अशाप्रकारे माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारांना माहिती न देण्याच्या प्रवृत्तीस वेळीच प्रतिबंध घालण्याकरिता त्यांनी, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्याकडून उपलब्ध असणारी माहिती त्यांनाच देणे अनिवार्य आहे व ती कशाप्रकारे अर्जदारास द्यावी, असे सार्वजनिक वितरण विभागाशी संबंधित अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्राधिकरणांना एका परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात यावे, जेणेकरुन सामान्य नागरिकांना आवश्यक ती माहिती, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकेल.

विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५ व ६ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय असणार नाही. परंतु अर्जातील मुद्दा क्र. ८ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या स्तरावरुनच अपिलार्थीस द्यावी लागेल. मुद्दा क्र.८ च्या संदर्भात त्रयस्थ पक्षाकडे त्यांनी दि. ०१.०१.२००६ ते दि. ०१.०७.२००८ पर्यंत ग्राहकांना रॉकेल विक्री केलेल्या पावती पुस्तकाची स्थळप्रत उपलब्ध असल्याचे आयोगास अवगत केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.८ च्या संदर्भातील माहितीच्या छायाप्रती त्रयस्थ पक्षाकडून प्राप्त करुन घेऊन, नंतर त्या अपिलार्थीस त्यांना पुरवाव्या लागतील. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील देय माहिती (मुद्दा क्र. १,२,४,७,८ व ९) देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे हे आदेश निर्गमित झाल्यापासून पंधरा दिवसांचा कालावधी देण्यात येत आहे. अपिलार्थीने यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती स्वीकारली नाही, या संदर्भात सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. या मुद्यावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, सार्वजनिक प्राधिकरणाकडून व्यापक स्वरुपात माहिती मागवून नंतर माहिती स्वीकारण्यास नकार देणे, अशाप्रकारच्या त्यांच्या प्रवृत्तीस त्यांनी वेळीच आवर घालावा व माहिती मागताना विवेक बाळगावा. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या प्रतिसादाचे पत्र पाहता, या पत्रामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या अंदाजित पृष्ठांची संख्या,

माहिती पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर व शुल्काची एकूण रक्कम हा तपशील, जो त्यांना अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे देणे अनिवार्य आहे, तो दिलेला नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरवावी लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली असता, त्याप्रमाणे कार्यवाही न करता उलट त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन हस्तगत करुन घेऊन जाण्याचे पत्र देखील अशाप्रकारे अवैध ठरत आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५ व ६ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३,५ व ६ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेंद्र (राजेंद्र) मनोहर जाधव,विपुल चष्माघर, पुजारी मंगल कार्यालयाजवळ,

तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (अन्न व नागरी पुरवठा), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८२

निर्णय दिनांक : १७.११.२००९

१ श्री. गणेश धोंडिबा थोरात, :अपिलार्थी
रा. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
अधीक्षक अभियंता,
महावितरण संवसु मंडल कार्यालय
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी,
अधीक्षक अभियंता,
महावितरण संवसु मंडल कार्यालय
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जावरुन अपिलार्थीने सदरचे अपील जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०९.२००८ रोजी दिलेल्या त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयाविरुध्द केल्याचे आढळून येत आहे. यासंदर्भात त्यांनी जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यपध्दतीसंबंधी प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षकांच्या नेमणूकीसंदर्भातील निविदापध्दतीविषयी एकूण १३ मुद्यांद्वारे विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.०८.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०९.२००८ निर्णय घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. तथापि या आदेशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १०.०९.२००८ रोजी दिलेल्या आदेशावर जन अपिलीय अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे हे आदेश अवैध व अर्थहीन ठरत आहेत. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आता सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश धोंडिबा थोरात, शिवाजीनगर, लिंबोणी बाग, गणपती मंदीराजवळ , तांब्री विभाग, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता, महावितरण संवसु मंडल कार्यालय उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी,अधीक्षक अभियंता, महावितरण संवसु मंडल कार्यालय,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४
निर्णय दिनांक १७/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०६.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५
निर्णय दिनांक १७/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजर्षी शाहु महाराज माध्यमिक विद्यालय, जवाहर नगर, मौजे तुप्पा, ता.जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६
निर्णय दिनांक १७/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, श्री. सेवालाल शिक्षण संस्था, सेवादासनगर, मौजे हानेगांव, ता.देगलूर, जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाविर हाऊसिंग सोसायटी, नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८९

निर्णय दिनांक : १८.११.२००९

१. श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, :अपिलार्थी
रा. मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
तहसीलदार, उमरगा, जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरगा, जि.उस्मानाबाद.
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, उमरगा, जि.उस्मानाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या तालुक्यातील राखीव जागेवर निवडून आलेल्या सर्व लोकप्रतिनिधींच्या वैधता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती प्राप्त झाल्या नसल्याने, जन माहिती अधिकारी यांनी प्रमाणपत्र वेळेत व नियमात जमा करण्याचे प्रयोजन नाही आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीवर अपात्रतेसंबंधीचे कार्यवाहीचे अधिकार माहिती अधिकाऱ्यास नाहीत, असे नमूद केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. अपिलार्थीने या अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, उमरगा तालुक्यातील राखीव जागेवर निवडून आलेल्या सर्व लोकप्रतिनिधीचे जात वैधता प्रमाणपत्र त्यांच्या कार्यालयात वेळेत व नियमाप्रमाणे जमा केले आहे काय?, सदर प्राप्त जात वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत, सदर जात प्रमाणपत्र दिले नसल्यास संबंधित लोकप्रतिनिधींवर अपात्रतेसंदर्भात काय कार्यवाही केली, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन त्यांना दहा दिवसांच्या आत त्यांच्याकडील माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजी माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये राखीव जागेवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींकडून त्यांनी जात वैधता

प्रमाणपत्रे मूळात प्राप्त करुन घेतलेली नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, राज्य निवडणूक आयोगाने पारित केलेले परिपत्रक दि. ११.०१.२००८ मध्ये, उमेदवारांनी चार महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांना अपात्र करण्याचे निर्देशन आहे, असे मुंबई उच्च न्यायालयातील क्र. ५६९१/२००७ या याचिकेत म्हटले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयामध्ये जर संबंधित उमेदवाराला जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी चार महिन्यापेक्षा अधिक उशीर झाला तर त्यात संबंधित व्यक्तीचा दोष नसतो, असे म्हटले आहे. याच विषयासंदर्भात त्यांना राज्य निवडणूक आयोगाचे दि. ११.०१.२००८ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली असून, यामध्ये राज्य निवडणूक आयोगाने सार्वजनिक निवडणूक घेणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना असे निर्देश दिले आहेत की, "निवडून आल्याच्या दिनांकापासून उमेदवाराने चार महिन्याच्या आत जातीचे प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्या उमेदवारास अनर्ह ठरविण्याची जी तरतूद आहे, ती तरतूद निर्देशात्मक आहे, ही तरतूद आवश्यक तरतूद नाही व चार महिन्यांपेक्षा अधिक उशीर झाला तरीही संबंधित व्यक्तीचा दोष नसतो. त्यामुळे त्या व्यक्तीने चार महिन्यात जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्या सदस्यास अनर्ह न ठरविता उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी". उच्च न्यायालयाच्या या निर्देशानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध असणे संभवत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही कोणत्या निवडणूकीच्या संदर्भात आहे अथवा अपिलार्थीस निश्चित कोणत्या उमेदवाराशी व कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती त्यांना अपेक्षित आहे, याचा उल्लेख त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. मूळात जन

माहिती अधिकारी यांच्याकडे निवडणूकामध्ये राखीव जागांवर झालेल्या निवडणुकांशी संबंधित उमेदवाराची जात वैधता प्रमाणपत्रे कोणत्याही प्रकारे असणे संभवत नसल्यामुळे, व आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी माहिती असल्याशिवाय अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना पुरविता येणे शक्य नाही. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत नाही.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख,रा. मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९०

निर्णय दिनांक : १८.११.२००९

१. श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, :अपिलार्थी
रा.मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
नगर परिषद कार्यालय,
मुरुम,ता.उमरगा, जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद मुरुम,ता.उमरगा,
जि.उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर अभियंता,
नगर परिषद कार्यालय, मुरुम,ता.उमरगा,
जि. उस्मानाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती देण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांनी जाणूनबुजून स्थानिक पुढाऱ्यांच्या दबावाला बळी पडून माहिती नाकारलेली आहे, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "मुरुम नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७१, दि. १८.०२.२००३ ची नक्कल व त्रयस्थ पक्ष श्री. लक्ष्मीनारायण काबरा यांनी सुधारीत भूखंड रेखानकाशे नगर रचनाकार, उस्मानाबाद यांच्याकडून पत्र क्र. मुरुम/स.नं.१५५भाग/अभिन्यास/न.र.उस्मानाबाद ४४५,दि. ३०.०४.२००३ अन्वये दिलेल्या सुधारीत मंजूरीच्या प्रत्राची झेरॉक्स प्रत", अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकाऱ्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे आणि अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १७.११.२००९ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेला त्यांचा दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा हा बोगस आहे. कारण अपिलार्थी हे नगर परिषदेचे निलंबित कर्मचारी असून कोणत्याही प्रकारे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती होऊ शकत नाहीत. तसेच अपिलार्थी हे मुरुम येथील रहिवाशी असल्यामुळे अपिलार्थीस दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र

तहसीलदार, मुरुम यांनी देणे आवश्यक असताना सदर प्रमाणपत्र त्यांनी तहसीलदार, लातूर यांच्याकडून प्राप्त करुन घेतले आहे. या प्रमाणपत्राचा दुरुपयोग करुन अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती सार्वजनिक प्राधिकरणास वेठीस धरुन प्राप्त करण्याचा कायम प्रयत्न करीत असतात.जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे, हे अर्जदाराचे उत्तरदायित्त्व असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्त्व योग्य प्रकारे पार पाडले आहे किंवा कसे, यासंदर्भात कोणताही पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत सादर केलेला नाही किंवा या मुद्याचे तोंडी समर्थन करण्यासाठी देखील अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, आणि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आता व्यक्तिशः माहिती पुरविली असल्यामुळे आणि यासंदर्भात आवश्यक तो पुरावा जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १७९०/०८, दि.१३.१०.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १८-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश सुदामराव गायकवाड,रा.यशवंतनगर,मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद, मुरुम, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद मुरुम,ता.उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९१

निर्णय दिनांक : १८.११.२००९

१. श्री. सय्यद निसार उस्मान, :अपिलार्थी
रा. धर्माबाद, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००८ रोजी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मान्यताप्राप्त महाविद्यालयातील बी.सी.ए., बी.सी.एस., बी.सी.एम. व बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्सच्या महाविद्यालयामधील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सन १९९१ ते दि. ०२.०६.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मान्यताप्राप्त व्याख्यात्यांची नावे, त्यांच्या नेमणूकीच्या दिनांक, नेमणूकीचा प्रकार, वेतनश्रेणी आणि कॉलेजचे नाव, बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्सच्या कॉलेजची यादी, त्यामध्ये सदर विषय ऐच्छिक या सदरामध्ये उपलब्ध असलेल्या संलग्नित कॉलेज स्थापनेचा दिनांक व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडने सदर संगणक विषय कोणत्या प्रवर्गात समाविष्ट केला, या विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या बी.सी.ए., बी.सी.एस., बी.सी.एम. व बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (ऐच्छिक) हा विषय उपलब्ध असलेल्या सर्व महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुखांची नावे आणि शासन पत्र NGC 209/(1652)/vishi-2 dated 24-09-1991 ची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडे दि. ०४.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.३१.०७.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे, अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य माहिती पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि ०२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदीप्रमाणे प्रतिसाद देणे हे सर्वसाधारण परिस्थितीत अपेक्षित आहे. त्याचबरोबर येथे असेही दिसून येत आहे की, अपिलार्थीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ज्या महाविद्यालयात बी.सी.ए., बी.सी.एस. बी.सी.एम. आणि बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्सचे वर्ग घेतले जातात, त्या वर्गाच्या प्राध्यापकांच्या संदर्भातील सार्वजनिक माहिती मागविली आहे. मूळात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली सर्व महाविद्यालये ही स्वतःच एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरणे असल्यामुळे, अपिलार्थीने ही माहिती संबंधित महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेणे उचित ठरले असते. या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०२.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीप्रमाणे, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत त्याच्या प्रती सर्व संबंधित महाविद्यालयांकडे पाठवून, या पत्रांच्या प्रती अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि येथे असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि. ०२.०६.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी मूळात अधिनियमातील कलम ७ व ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे जो प्रतिसाद देणे अपेक्षित होते, तो त्यांनी मूळातच दिलेला नाही. एवढेच नव्हे तर, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर देखील अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१०.२००८ रोजी द्वितीय अपील करेपर्यंत म्हणजेच, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर

अडीच महिन्याचा कालावधी व्यपगत होऊनही, अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३१.०७.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडून माहिती न दिल्या गेल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही, असा युक्तिवाद अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी केला आहे. या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५(५) च्या तरतुदी लक्षात घेणे आयोगास गरजेचे वाटते. कलम ५(५) च्या तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व कार्यालयीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती प्राप्त न होण्यासाठी जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व कार्यालयीन सहायक अधिकारी/कर्मचारी हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी आणि त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अशाप्रकारे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयास कोणताही प्रतिसाद न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सर्व संबंधित कार्यालयीन सहाय्यक अधिकारी/ कर्मचारी, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सर्व संबंधित कार्यालयीन सहाय्यक अधिकारी/ कर्मचारी, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद रशिद सय्यद यासिन,द्वारा संगणक विभाग, एल. बी. एस. कॉलेज, धर्माबाद, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.        निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९२

निर्णय दिनांक : १८.११.२००९

१ श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, :अपिलार्थी
रा.पैठण, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
जिल्हाधिकारी, जालना
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपजिल्हाधिकारी (रोहयो),जालना
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर ४५ दिवसांच्या आत सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण २ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २२०/- इतके त्यांना चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने रु. २२०/- इतके मनीऑर्डरद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविले. तथापि वेळेत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे केला होता. या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्याने अगर त्यावर निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याचे आयोगास अवगत केले.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १०.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १०.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१०.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे,रा.बालाजी मंदीरामागे, दुर्गावाडी,पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९३

निर्णय दिनांक : १८.११.२००९

१. श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद, :अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक संचालक,
विभागीय शिक्षण उपसंचालक
कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : अध्यक्ष, अंजुमने इशाते तालीम
संस्था,औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या प्रथम अर्जाची व त्यावरील अपील अर्जाची छाननी केली असता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या याच विषयासंदर्भातील अपिलाची आयोगाकडे दि. ११.११.२००९ रोजी सुनावणी

झाली असून यासंदर्भात आयोगाने आपले आदेश पारित केले आहेत. अपिलार्थीच्या दि. ११.११.२००९ रोजीच्या अपील निर्णयाशी संबंधित असलेला प्रथम अर्ज व प्रथम अपील आणि विचाराधीन अपिलाशी संबंधित माहितीसाठीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज एकच आहेत.

अपिलार्थीच्या आज रोजीच्या विचाराधीन अपील अर्जावर, आयोगाने अपिलार्थीच्या अशाचप्रकारच्या दुसऱ्या अपील अर्जावर दि. ११.११.२००९ रोजी निर्णय दिला असल्याने, वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १७९३/०८, दि. ०६.१०.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुनव्वर अहेमद नईम अहेमद,प्लॉट नं. ४०, द्वारा अब्दुल माजीद, न्यु एस.टी.कॉलनी, कटकट गेट,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९४

निर्णय दिनांक : १८.११.२००९

१. श्री. राजेश सोनपाल साबु, :अपिलार्थी
रा. सेलू, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमी अभिलेख कार्यालय, पुणे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमी अभिलेख कार्यालय, पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक (आस्था-३),
जमाबंदी आयुक्त कार्यालय,पुणे.
जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक, भूमी अभिलेख,
(संलग्न) जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे
त्रयस्थ पक्षः श्री. एस.एम.साबु

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००८ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती मान्य नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. .

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१७.०८.२००७ (प्रत्यक्षात प्राप्त दि. २१.०८.२००७) रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. एस.एम.साबु यांच्या

सेवानिवृत्ती वेतनाच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री.एस.एम. साबु यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरण इतक्या दीर्घ कालावधीसाठी का प्रलंबित ठेवले?, याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून आजपावेतो काय कार्यवाही झाली, सदर प्रकरण नियमानुसार मंजूर करण्याची/मंजूर करुन घेण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची आहे काय? श्री. साबु यांना व त्यांच्या कुटुंबियांना यामुळे जो आर्थिक व मानसिक त्रास झाला, त्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तिचे नाव - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती तालुका निरीक्षक भूमी अभिलेख सेलू, जि. परभणी यांच्याकडे पाठविण्यात आली असल्याचे आणि ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून नियमानुसार टपालखर्चासह आकारण्यात येणाऱ्या फीच्या रकमेचा भरणा करुन प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमानुसार मुदतीत पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष व अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. २१.०९.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या संदर्भात शासनाच्या महसूल व वन विभागाकडून दि. ०७.०७.२००८ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आले असून, या आदेशाद्वारे त्रयस्थ पक्ष श्री. साबु यांना दरमहा रु.२८५३/- इतके अनुकंपा निवृत्तीवेतन मंजूर केल्याचा उल्लेख या निर्णयामध्ये नमूद केलेले आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या त्यांच्या अर्जातील चारही मुद्यांच्या संदर्भात आपले आक्षेप नोंदविले आहेत. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व्यतिरिक्त इतर कोणत्याही मुद्यांवरील माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. कारण या उर्वरित सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा, स्पष्टीकरण व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती देण्यासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याइतपतच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कोणतीही विचारणा करणे आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा, स्पष्टीकरण आणि त्यांचे वैयक्तिक मत मागविणे व जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्टीकरण अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील फक्त मुद्दा क्र. २ शी संबंधितच माहिती देय

होत आहे. या मुद्यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.०९.२००७ रोजी पुरविल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे आक्षेप घेतले आहेत की, माहिती अधिकारी यांनी त्यांचे प्रकरण दि. ०१.०७.२००२ ते ०५.१२.२००४ या कालावधीत कोठे पाठविले होते व ते प्रलंबित का ठेवण्यात आले याबाबत त्यांना कोणतीही माहिती दिली नाही. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदाराने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकदा अर्ज दिल्यास आणि त्यावरील कार्यवाहीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या अर्जातील विषयासंदर्भात त्यांनी विविध प्राधिकरणाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती पाठविणे अथवा निश्चित कोणती कार्यवाही केली, हे अर्जदारास कळविणे असे अपेक्षित होते. अपिलार्थीचे प्रकरण जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात का प्रलंबित राहिले, असा विषयच मूळात माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेबाहेरचा आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र २ च्या संदर्भातील जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीने नोंदविलेला दुसरा आक्षेप असा आहे की, दि. ०६.१२.२००४ ते ०४.०७.२००७ या कालावधीमध्ये हे प्रकरण शासनाकडेच होते किंवा कसे, ते का ठेवण्यात आले व त्या कालावधीत जन माहिती अधिकारी यांनी काय पाठपुरावा केला किंवा नाही, याबाबत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी काहीच माहिती दिली नाही. या मुद्यावर देखील वरील परिच्छेदात स्पष्ट केलेले अभिप्राय लागू होतात.

अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्र. २ मधील शेवटचा मुद्दा असा आहे की, श्री. साबु यांच्या मूळ सेवापुस्तिकेत सन १९९६ ची वेतन पडताळणी झाल्याची नोंद नाही, ती शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यापूर्वी का करण्यात आली नाही, याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताच खुलासा केलेला नाही, यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी हे त्यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीची कारणे अर्जदारास देण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार बांधील नाहीत. त्यांनी फक्त अर्जदाराने मागणी केलेली

माहिती, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात, ती अर्जदारास देय असल्यास त्यांनी, योग्य त्या माध्यमाद्वारे उपलब्ध करुन द्यावयाची एवढीच प्रक्रिया येथे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचे सेवानिवृत्तीवेतनाच्या संदर्भात वेगवेगळे आक्षेप नोंदविले आहेत. अपिलार्थीस या आक्षेपांचे निराकरण करुन घ्यावयाचे असेल तर त्यांनी, त्यांच्या सेवानिवृत्तीवेतन प्रकरणाशी संबंधित अभिलेख्यांची तपासणी करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्जाद्वारे विनंती करावी, म्हणजे त्यांच्या सेवानिवृत्तीवेतनाच्या संदर्भातील अभिलेख्यांची तपासणी त्यांना करता येईल व त्यांच्या मनातील सर्व शंका दूर होऊ शकतील, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस मूळात त्यांच्या अर्जातील फक्त मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती देय आहे. या मुद्यावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नोंदविलेल्या आक्षेपावर आयोगाने आपले अभिप्राय वरील परिच्छेदामध्ये दिलेले आहेत, तसेच अपिलार्थीचे सेवानिवृत्तीचे प्रकरण आता शासनाकडून दि. ०७.०७.२००८ रोजी निकाली काढण्यात आल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १८-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेश सोनपाल साबु,राजेश ट्रेडर्स, मोंढा, सेलू, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक (आस्था-३),जमाबंदी आयुक्त कार्यालय,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख,(संलग्न) जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७
निर्णय दिनांक १८/११/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (महसूल विभाग),
तहसील कार्यालय, बिलोली, ता.बिलोली,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, बिलोली, ता.बिलोली,
जि.नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८
निर्णय दिनांक १८/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नागसेन विद्यालय, रहीमपुर, सिडको, वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या पाठीमागे, नविन नांदेड, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९
निर्णय दिनांक १८/११/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
के.एम.पाटील माध्यमिक विद्यालय,
पाटोदा बु., ता.धर्माबाद, जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८३

निर्णय दिनांक १८-११-२००९

१ श्री. सचिन जगन्नाथ त्रिभुवन, : अपिलार्थी
मु. पो. जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी, पाटबंधारे विभाग,
नाथनगर (उत्तर), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, गारखेडा,
औरंगाबाद

प्रत्यक्षत : जन माहिती अधिकारी : भांडारपाल, कार्यालय अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण गारखेडा, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील अपील सुनावणीत ठरल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रु. २५० इतकी शास्ती आकारण्यात येऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाशी संबंधित मार्च २००७ ते दि. २७-०३-२००८ या कालावधीशी स्टेशनरी पुरवठ्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये आपल्या कार्यालयास स्टेशनरी कोणत्या एजन्सीमार्फत पुरविण्यात येते, आपल्या कार्यालयात श्री. मिर्झा हे स्टेशनरी पुरवितात का ?, स्टेशनरी वाहतूक कशा पध्दतीने केली जाते, त्यांच्या देयकावर वर्षनिहाय झालेला खर्च, निरुपयोगी साहित्य भंगारमध्ये विक्री करतांना वरिष्ठ कार्यालयाची परवानगी घेतली त्याची प्रत, साहित्य विक्री करुन आपल्या कार्यालयास प्राप्त झालेली रक्कम, साहित्य विक्री करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे एजन्सींनी सादर केलेले दरपत्रक, आपल्या कार्यालयात अतिरिक्त म्हणून तसेच इतर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची त्यांच्या विभागासह यादी द्यावी, साहित्य लोड करुन देतांना दिलेल्या डिलेवरी चलनाची प्रत - इत्यादी प्रश्नार्थक मुद्दयासह समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०६-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती संबंधित शाखेकडून प्राप्त झाली आहे ती या शाखेतून घेऊन जावी असे कळविले. त्यानंतर अपिलार्थीने ही माहिती दिनांक ०१-०७-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०७-२००८ रोजी प्राप्त माहिती खोटी व दिशाभूल करणारी

असल्याचे त्यांना वाटल्यावरुन प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०७-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०१-०७-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती पुरविली आहे काय असे आयोगाने विचारता, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या आदेशानंतर त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्दयान्वये संमिश्र स्वरुपाची माहिती मागविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ वगळता उर्वरित सहाही मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील "

आपल्या कार्यालयातील श्री. मिर्झा हे स्टेशनरी पुरवठा करतात काय, " मुद्दा क्रमांक ३ मधील "............. एजन्सीकडून करण्यात आले होते काय, .............. वरिष्ठ कार्यालयाची परवानगी घेतली होती काय, घेतली नसल्यास ती का घेण्यात आली नाही किंवा आपल्या कार्यालयास तसे अधिकार आहेत काय," मुद्दा क्रमांक ५ मधील" ................. कर्मचा-यांस कार्यमुक्त न करता कार्यरत ठेवण्याचे कारण काय," मुद्दा क्रमांक ६ संपूर्ण व मुद्दा क्रमांक ७ मधील "चलनावर सही करण्याचे अधिकार कोणास आहेत " अशी माहिती मागितली आहे, जी अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील स्टेशनरीवर वर्षनिहाय किती खर्च होतो ही माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील अतिरीक्त कर्मचा-यांची यादी ही माहिती त्यांना दिल्याचे आढळून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबुल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली मुद्दा क्रमांक ५ मधील त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांच्या विभागासह माहिती आणि मुद्दा क्रमांक २ मधील अंशतः स्टेशनरीवर करण्यात आलेला वर्षनिहाय खर्च ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् आयोगास असे आढळून आले आहे की, या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य चोखपणे पार पाडलेले नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देताना अर्जदारास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांची स्वाक्षरी असणे अपेक्षित आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता ती एक जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०७-०६-

२००८ च्या कागदपत्राची प्रत आहे. या प्रतीवर सहायक भांडारपाल, भांडारपाल व कार्यकारी अभियंता यांच्या सह्या आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिलेल्या अर्जास अशा प्रकारे माहिती देणे अपेक्षित नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या कथित निर्णयाचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना अधीक्षक अभियंता यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झालेली होती. तथापि हा निर्णय त्यांनी स्वाक्षरी न करता या निर्णयावर त्यांच्या सहायकाने सही केली आहे. ज्यावेळी निर्णय देण्यात आला त्यावेळी निर्णय देण्यासाठी सक्षम अधिका-यानेच आदेशावर स्वाक्षरी करणे त्यांना अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावरील निर्णयावर अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांनी सही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे नि:संशयपणे सिध्द झाले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमत: अपूर्ण माहिती देऊन व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कथित निर्णयानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती न देऊन त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना, संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे. तथापि यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडला नसल्यामुळे त्यांचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ५ मधील उर्वरित देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सचिन जगन्नाथ त्रिभुवन, मु. पो. जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल, अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कार्यालय, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८४

निर्णय दिनांक १८-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गौतम दारकोजी काळे,<br>मु. कोळघर, पो. कनकोरी, तालुका गंगापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रादेशिक व्यवस्थापक,<br>राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, पुणे - ०१ | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप महाव्यवस्थापक (कर्म.वर्ग अधि.), महाराष्ट्र राज्य<br>मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व खोटी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगाकडे सादर केलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये दिनांक ०६-१२-१९९९ रोजी ८४ चालकांना दिलेल्या

नेमणुकीसंदर्भात माहिती मागितली होती. या चालकांना रुजू करुन घेतांना दिलेले मूळ बेसिक व सध्या चालू असलेले मूळ बेसिक, त्यांना नेमणूका दिलेले आगार व रुजू करुन घेतल्याची तारीख या मुद्दयावर काही माहिती मागितली होती. अपिलाथीने मागणी केलेली माहिती ही दिनांक ०६-१२-१९९९ ते २००२ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तथापि प्राप्त माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक (कर्म.वर्ग अधि.), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २६-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-१०-२००८ रोजी एक पत्र लिहिले असून या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-१२-२००७ रोजी त्यांना माहिती पाठविल्याचे कळविले आहे. तथापि ज्या कारणाने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते त्या कारणांचा ऊहापोह जन अपिलीय अधिकारी यांनी या पत्रामध्ये केला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे तसेच अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक (कर्म.वर्ग अधि.), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या

दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. उप महाव्यवस्थापक (कर्म.वर्ग अधि.), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गौतम दारकोजी काळे, मु. कोळघर, पो. कनकोरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक (कर्म.वर्ग अधि.), महाराष्ट्र राज्य

मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८५

निर्णय दिनांक १८-११-२००९

१ श्री. राजेश सांडूजी हिवराळे, : अपिलार्थी

घर क्रमांक २६१, मिलींदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त,

अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : सहायक आयुक्त, अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती न पाठविता अपूर्ण माहिती पाठविली. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माध्यमिक शिक्षक २००६ च्या मुलाखती व लेखी परीक्षेसंदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०८-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी हे सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याने त्यांच्या सदर अपील अर्जावर निर्णय होऊ शकला नाही. त्यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते असे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयाचे अवलोकन करता त्यांच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी, हे आदेश निर्गमीत

होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेश सांडूजी हिवराळे, घर क्रमांक २६१, मिलींदनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी

विकास, नाशिक  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८७

निर्णय दिनांक १८-११-२००९

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी
अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कोलते पिंपळगांव,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी, मु. कोलते पिंपळगांव, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांच्याकडे एकूण २९ स्वातंत्र्य सैनिकांची यादी सादर केली असून त्यांचे सख्खे भाऊ किती, बहिणी किती, मुले किती, पुतणे किती, त्यांची नांवे, बहिणीच्या सासरचे संपूर्ण नांव, गाव व तालुका जिल्हा अशी

माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणातील व त्यांच्या कार्यालयाच्या नियंत्रणातील बाब नसून ती "रक्ताचे नाते " या विषयी संबंधित असल्याचे अपिलार्थीस कळवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने आपल्या युक्तिवादात त्यांनी ज्या २९ त्रयस्थ पक्षांच्या संदर्भात माहिती मागितली आहे ती माहिती ग्रामसेवकाकडे उपलब्ध असावयास हवी असे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी ही माहिती ग्रामसेवकाकडे मागितली असल्याचे व त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये एकूण २९ त्रयस्थ व्यक्तींच्या नातेवाईकांची नावे व बहिणीच्या सासरची संपूर्ण पत्ते, बहिणींच्या सासरची संपूर्ण नावे व पत्ते अशी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या अपेक्षेप्रमाणे या स्वातंत्र्य सैनिकांच्या नातेवाईकांची माहिती

ग्रामसेवकाकडे उपलब्ध असली तरी त्यावरुन या व्यक्ती त्रयस्थ पक्षाच्या नातेवाईक आहेत किंवा कसे हे त्यावरुन कळणार नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशा प्रकारे मागणी केलेली माहिती ही पूर्णतः सार्वजनिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अभिलेख्यावर कोणत्याही प्रकारे उपलब्ध असणे संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकत नाही, हे उघड आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक स्वरुप नसल्याने, ही बाब त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीशी संबंधित असल्याने व तसेच ही माहिती उघड केल्याने एखादे व्यापक जनहित साध्य होईल असे आयोगास वाटत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोलते पिंपळगांव, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८८

निर्णय दिनांक १८-११-२००९

१ श्री. गणेश नंदराम बहुरे, : अपिलार्थी
व्दारा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बदनापूर,
तालुका बदनापूर, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती
प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १६-११-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्यामुळे ते विचाराधीन अपील परत घेऊ इच्छित आहेत.

अपिलार्थीने आता त्यांचे विचाराधीन अपील मागे घेण्यासाठी आयोगास केलेली विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १७८८/२००८, दिनांक १७-११-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश नंदराम बहुरे, व्दारा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८६
निर्णय दिनांक १८/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुहास सुधाकर धामणे,<br>रा.गंगापूर, जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद कार्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद कार्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद | : | |
| प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | १) लिपिक, नगर परिषद, गंगापूर, जि. औरंगाबाद<br>२) प्रकल्प अधिकारी, नगर परिषद, गंगापूर, जि. औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आजपावेतो परिपूर्ण माहिती पुरविली नाही, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, त्यांनी या अपिलावरील आदेशाची प्रत दि. २७.०८.२००८ रोजी अपिलार्थीस दिली. तथापि या आदेशामध्ये त्रुटी, चुका असून सदर आदेश सुध्दा गोलमाल दिलेले आहेत. त्यांनी या अपील अर्जामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांना विनाकारण मानसिक त्रास दिल्याबद्दल आणि आजपावेतो माहिती न दिल्याबद्दल संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्तीच्या कलमान्वये २५०/-रु. प्रतिदिनाप्रमाणे जास्तीत

जास्त दंड आकारावा. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध विकास कामांशी संबंधित सन २००० ते २००८या कालावधीतील काही माहिती एकूण १४ मुद्यांव्दारे व्यक्तिशः मागितली होती. या माहितीतील मुद्दा क्र. १, ६ व १४ शी संबंधित माहिती सी.डी. च्या स्वरुपात व्यक्तिशः देण्यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनंती केली होती. अपिलार्थीने सदर अर्ज मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर यांना उद्देशून केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०७.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागवलेली माहिती संपूर्ण नगरपरिषदेच्या कामकाजाशी संबंधित असल्यामुळे ती विहित मुदतीत देता येणे शक्य होणार नसल्याचे अपिलार्थीस कळवून माहिती पाठविण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्याची त्यांना विनंती केली. तथापि सदर पत्र प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत मुख्याधिकारी, नगरपरिषद गंगापूर यांच्याकडे दि. ३१.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १६.०९.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रत्यक्ष संचिका तपासणीसाठी व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या निर्णयाने व्यथित होऊन व या निर्णयानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी त्यांच्या वकिलासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगास सादर केला आहे. या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जातील निवेदनाशी सुसंगत मुद्दे उपस्थित केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते १४ शी संबंधित माहिती त्यांना विनामूल्य देण्याची व या मुद्यांतील मुद्दा क्र. १, ६ व १४ शी संबंधित माहिती सी.डी. मध्ये उपलब्ध करुन देण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संपूर्ण नगरपरिषदेशी संबंधित असल्याने त्यांनी त्यांच्या दि. १८.०७.२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस १५ दिवसांची मुदत देण्याची विनंती केली होती. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णयानुसार ते अपिलार्थीस माहितीशी संबंधित अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यास व त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती देण्यास तयार आहेत. तथापि अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात यासंदर्भात कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्र. १, ६ व १४ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे सी.डी.च्या स्वरुपात उपलब्ध नसल्याने ते ती अपिलार्थीस सी.डी. च्या स्वरुपात पुरवू शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे प्रचंड व्याप्ती असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजेच दि. १८.०७.२००८ रोजी प्रतिसाद दिला. तथापि या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यासाठी १५ दिवसांची मुदत मागितली. अशाप्रकारे अपिलार्थीकडून मुदत मागण्यासंदर्भातची कोणतीही तरतूद अधिनियमामध्ये नसल्याने, जन माहिती अधिकारी यांचा

दि. १८.०७.२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद, अवैध ठरत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १, ६ व १४ शी संबंधित माहिती सी.डी. च्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. परंतु ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सी.डी. च्या स्वरुपात उपलब्ध नसून ती कागदपत्रांच्या स्वरुपात असल्याचा जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला आहे. या संदर्भात येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्र. १, ६ व १४ शी संबंधित माहिती, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सी.डी. च्या स्वरुपात उपलब्ध नसल्याने, त्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा त्यांना आज आयोगासमोर सादर करता आला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.०७.२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या अर्जास दिलेला प्रतिसाद वर नमूद केल्याप्रमाणे अवैध होत आहे. यावरुन या प्रकरणी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडून अपेक्षित असलेली कृती योग्य प्रकारे केल्याचे आढळून येत नाही. तरी देखील अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती त्यांना याच कालावधीमध्ये अपिलार्थीस सशुल्क पुरवाव्यात. अपिलार्थीस या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे याच कालावधीमध्ये, त्यांच्या कार्यालयात

पूर्वनियोजित वेळी उपस्थित रहावे लागेल. या कालावधीनंतर ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य तपासणीसाठी देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेख अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व यातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती त्यांना याच कालावधीमध्ये सशुल्क पुरवाव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत :

१. श्री. सुहास सुधाकर धामणे, रा.मु.पो.परदेशीपुरा रोड, गंगापूर, ता.गंगापूर, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक / प्रकल्प अधिकारी, नगरपरिषद, गंगापूर, जि. औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०१

निर्णय दिनांक : १९.११.२००९

१. श्री.नंदलाल मदनलाल गट्टाणी, :अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई
जि. बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, बीड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीचा द्वितीय अपील अर्ज आणि त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलातील अपेक्षित माहितीच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे यापूर्वी दि. १६.०९.२००९ रोजी अपील क्र. २७६७/०८ मध्ये सुनावणी झाली असून या प्रकरणी आयोगाने आपले आदेश स्वतंत्रपणे निर्गमित केले आहेत. अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जासंदर्भातील माहितीचा अर्ज देखील त्यांच्या द्वितीय अपील क्र. २७६७/०८ अपिलाशी संबंधित प्रथम अर्जासारखा आहे. यावरुन अपिलार्थीने एकाच प्रकरणासंदर्भात दोन वेगवेगळी स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाकडे एकसारख्याच कागदपत्रांसह सादर केली आहेत, असे दिसून येत आहे. यापैकी एका प्रकरणावर आयोगाने दि.

१६.०९.२००९ रोजी निर्णय दिलेला असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने निर्णय देण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १९-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.नंदलाल मदनलाल गट्टाणी, व्दारा-पायल मॅचिंग सेंटर, ९, भाजी मंडी, परळी वैजनाथ, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०२

निर्णय दिनांक : १९.११.२००९

१. श्री.तुकाराम जळबाजी मिरकुटे :अपिलार्थी
रा. पळसगाव, ता.वसमत, जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, :प्रतिवादी
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
वसमत, जि.हिंगोली.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक,भूमी अभिलेख, हिंगोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दहा दिवसांच्या आत अपिलार्थीस मौ. पळसगाव, माळवाटा, ता.वसमत येथे शेतवार सर्व्हेनंबर ५ व ६ ची नक्कल दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "वडिलोपार्जित असलेली जमीन मौ. पळसगाव तर्फे माळवाट येथील स.नं.५ व ६ ची शेतवार नक्कल मिळावी."- अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन

माहिती अधिकारी यांनी दि. २७.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविले. तथापि या पत्राने समाधान न झाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु या कालावधीनंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी---यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप आयोगास स्पष्ट केले. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व्हेनंबर ५ व ६ च्या शेतवार प्रतीची मागणी केली आहे. 'शेतवार नक्कल' म्हणजे सव्हेनंबर त्या सर्व्हेनंबरमध्ये शेतमालकाची नावे व सर्व्हेनंबरचे क्षेत्रफळ अशी माहिती होय. जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अशाप्रकरची जमिनीची नोंद घेण्याची पध्दत निझामकाळात होती, त्यांच्या कार्यालयाकडे अशाप्रकारच्या काही नोंदी उपलब्ध आहेत. परंतु अपिलार्थीने मागणी केलेली शेतवारीची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही.अपिलार्थीच्या मालकीहक्काच्या जमिनीसंदर्भात सर्व तपशील त्यांच्याकडे उपलब्ध आहे. परंतु अपिलार्थीस शेतवार नोंदीचीच प्रत हवी आहे. अशाप्रकारची या सर्व्हेनंबरच्या शेतवार नोंदीची त्यांच्याकडे उपलब्ध नाही.त्यामुळे ती अपिलार्थीस ते आता देऊ शकत नाहीत. अपिलार्थीस त्यांच्या मालकीच्या जमिनीसंदर्भात त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, ती माहिती ते अपिलार्थीस देण्यास कधीही तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती मागविली आहे. त्या स्वरुपात ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस ज्या शेतवाराची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, ती माहिती जन माहिती अधिकारी, अपिलार्थीस वेगळया स्वरुपात उपलब्ध करुन देत आहेत. परंतु अपिलार्थी त्यास्वरुपात ही माहिती स्वीकार करण्यास तयार नाहीत, अशी वस्तुस्थिती या प्रकरणी असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने ज्या स्वरुपात माहिती मागितली आहे, त्या स्वरुपात ते ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे आता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १९-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.तुकाराम जळबाजी मिरकुटे,रा. पळसगाव, ता.वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०३

निर्णय दिनांक : १९.११.२००९

१. श्री. कावळे चिमणराव दिगंबरराव, :अपिलार्थी
रा. अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

## **निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे दि. २६.०५.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे प्रथम सादर केलेले व दि.०७.१०.२००९ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०३.२००८ रोजीच्या त्यांच्या आदेशाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे व जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीसह दंडनीय कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुधाकरराव नाईक प्राथमिक आश्रमशाळा, तुळशीराम तांडा,ता. अहमदपूर जि.लातूर या शाळेच्या तपासणी संदर्भात आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या प्रशासकीय बाबीसंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अनधिकृत आश्रमशाळांची तपासणी करण्याचे अधिकार शिक्षण विभागास आहेत काय? असल्यास नियमाची सत्यप्रत, तपासणी केली नसल्यास तपासणी अधिकारी कोणत्या कारवाईस पात्र आहेत, सुधाकरराव नाईक प्राथमिक आश्रमशाळा, तुळशीराम तांडा, ता.अहमदपूर, जि.लातूर ही शाळा अनधिकृत असून ती तात्काळ बंद करण्याचे आदेश जिल्हा समाज कल्याण अधिकारी लातूर यांनी दिलेले असतांनाही शाळेची शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर यांनी सन १९९४-९५, १९९६-९७ व १९९७-९८ या कालावधीमध्ये तपासणी करुन अनधिकृत आश्रमशाळेस अधिकृत घोषित केले या बाबीस जबाबदार अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कोणत्या कारवाईस ते पात्र आहेत, याचा स्वयंस्पष्ट खुलासा, शिक्षण विभागाच्या तपासणी अहवालाचा आधार घेऊन संस्थेने लाखो रुपयांचे अनुदान उचलले तर ते अनुदान आपल्या विभागामार्फत चुकीने काढले असल्यास कोणत्या अधिकाऱ्यावर दोषारोप ठेवणार आहात त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम, सदर शाळेची तपासणी करण्याचे आदेश शिक्षण विभागामार्फत देण्यात आले असल्यास त्याच्या सत्यप्रती व आदेश न देता तपासणी झाल्यास त्याचा स्वयंस्पष्ट खुलासा व मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्र. ४०४/०४ मध्ये संस्थेने आपल्या तपासणी अहवालाचा आधार घेतला आहे, याबाबत मा. उच्च न्यायालयात आपले म्हणणे दाखल करणार का? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत गट

शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर यांच्याकडे पाठविली. तथापि त्यांच्याकडूनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे विनादिनांकाचे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०३.२००८ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असून या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आजपावेतो माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठीचा प्रथम अर्ज शिक्षणाधिकारी यांच्याकडे केला होता, त्यावेळी श्री. साळुंके नावाचे शिक्षणाधिकारी जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती श्री. मरपल्ले नावाच्या गट शिक्षणाधिकारी यांच्याशी संबंधित होती. श्री. मरपल्ले हे आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलार्थीस त्यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नसल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आपल्या युक्तिवादामध्ये मान्य केले व अपिलार्थीस त्यांच्याकडील देय माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील, "--------------------अधिकार शिक्षण विभागास आहेत काय?", मुद्दा क्र. २ मधील, "-----------------अनधिकृत आश्रमशाळेस अधिकृत घोषित केली, सदर बाबीस जबाबदार अधिकाऱ्याचे नाव व पदनाम व त्यांच्यावर कोणती कारवाई होण्यास ते पात्र आहेत, याचा स्वयंसष्ट खुलासा", मुद्दा क्र. ३ मधील, "-----------------कोणत्या अधिकाऱ्यावर दोषारोप ठेवणार त्या अधिकाऱ्याचे नाव व पदमाम", मुद्दा क्र. ५ मधील, "------------------------------बाबत मा.उच्च न्यायालयात आपले म्हणणे दाखल करणार का? याबाबत आपले म्हणणे कळवावे." या भागशः मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी पूर्णपणे विसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पूर्णतया काल्पनिक आणि अमूर्त (Abstract) असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण व खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील या भागशः मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त शिक्षण विभागाकडून त्यांना जर आश्रमशाळेची तपासणी करण्याचे अधिकार प्राप्त झाले असतील तर शिक्षण विभागाच्या आदेशाची प्रत आणि संबंधित शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर, ज्यांनी सुधाकरराव नाईक प्राथमिक आश्रमशाळेची सन १९९४-९५, १९९६-९७ व १९९७-९८ या कालावधीमध्ये तपासणी केली होती, त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम, एवढीच माहिती देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस

त्यांच्या मूळ अर्जातील वर स्पष्ट केल्याप्रमाणे देय माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शिक्षणाधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवली आहे. तथापि अशी कृती करताना त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) मध्ये विहित केलेल्या पाच दिवसांची मुदत ओलांडली आहे.या विलंबासाठी तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), श्री. साळुंके (सध्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रत्नागिरी येथे कार्यरत) जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) चा भंग केल्याने, त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती श्री. मरपल्ले, तत्कालीन गट शिक्षणाधिकारी, अहमदपूर यांच्या ताब्यात होती. तथापि त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र होत आहेत. तथापि ते नियतवयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही कारवाईचे आदेश देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (सध्या जिल्हा परिषद रत्नागिरी येथे कार्यरत) जि.प.लातूर यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १९-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कावळे चिमणराव दिगंबरराव, महात्मा गांधी कॉलेजच्या पाठीमागे, टेभूर्णी रोड, अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. साळुंके, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०४

निर्णय दिनांक : १९.११.२००९

१. श्री. मो. मोईज खान पठाण, :अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तहसील कार्यालय (पुरवठा),
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी,
तहसील कार्यालय, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) व ७(५) चे पालन केले नाही व बनावट कागदपत्रे असल्यामुळे सत्यप्रत देण्यास नाकारल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " नांदेड शहरातील केरोसीन हॉकर्स याच्या माहे ऑक्टोबर, २००७ च्या विक्री

रजिस्टरची सत्यप्रत, शहरातील हॉकर्सच्या झालेल्या बदल्यांचे कारण तसेच त्याबाबतचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांची कार्यालयीन टिपणी", अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नांदेड शहरातील किरकोळ रॉकेल विक्रेते यांच्याकडे असल्याने आणि ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे जतन करुन ठेवली जात नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जास प्रथमत: दि. ०३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधितांच्याकडून मागविण्यात आली असल्याने आणि ती माहिती प्राप्त होताच आवश्यक ती फी भरुन अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०५.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे २४ तासांच्या आत करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्याचे सूचित केले. त्याचदिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४५५०/- इतके असल्याचे आणि हे शुल्क चलनाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता या प्रकरणी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून अपिलार्थीने या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्याकडे भरल्यास ती माहिती ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही किरकोळ रॉकेल विक्री रजिस्टरच्या

संदर्भात होती. अशाप्रकारची प्रत त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारे जतन करुन ठेवली जात नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही किरकोळ रॉकेल विक्रेत्यांकडे असल्याने, त्यांना ही माहिती प्रथमतः किरकोळ रॉकेल विक्रेत्यांकडून प्राप्त करुन घ्यावी लागेल. किरकोळ रॉकेल विक्रेत्यांची अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यापोटी लागणारा खर्च सहन करण्याची तयारी नाही व तशी त्यांची ऐपतही नाही, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ०६.११.२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून त्यामध्ये त्यांनी विचाराधीन अपील ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन, विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. या पत्राची प्रत त्यांनी मूळ स्वरुपात आयोगास अवलोकनास्तव सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे जतन करुन ठेवण्याची पध्दत, त्यांच्या कार्यप्रणालीमध्ये प्रचलीत नाही आणि तसे कोणते संकेतही या सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, जन माहिती अधिकारी यांना किरकोळ रॉकेल विक्रेत्यांकडूनच प्राप्त करुन घेणे गरजेचे होते. नांदेड शहरामध्ये अशा किरकोळ रॉकेल विक्रेत्यांची संख्या २७४ इतकी असून या २७४ किरकोळ रॉकेल विक्रेत्यांकडून जन माहिती अधिकारी यांना ही माहिती प्राप्त करुन घ्यावयाची होती, त्याप्रमाणे त्यांनी ही माहिती झेरॉक्स प्रती काढण्याकरिता तयार करुन ठेवली आहे. संबंधित किरकोळ रॉकेल विक्रेत्यांची या अर्जाच्या पृष्ठाच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य देण्याची तयारी नाही. त्यामुळे अपिलार्थीस जर या माहितीची अद्यापही आवश्यकता असेल तर जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करणे अनिवार्य आहे. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली

माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे जतन करुन ठेवण्याची कोणतीही पध्दत नाही अथवा यासंदर्भात कोणतेही नियम आज रोजी अस्तित्त्वात नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती सशुल्क प्राप्त करुन घेणे, हा एकच पर्याय त्यांच्याकडे खुला आहे. जर या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित माहितीचा भाग असता तर अपिलार्थीस विनामूल्य माहिती देणे या प्रकरणी उचित राहिले असते. त्याचबरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचाराधीन अपील रद्द करण्यासाठी आयोगास उद्देशून दि. ०६.११.२००९ रोजीचे एक पत्र दिले आहे आणि यानंतर दि. १२.११.२००९ रोजी आयोगास उद्देशून लिहिलेल्या दुसऱ्या पत्रामध्ये त्यांनी दि. ०९.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत केल्याचे आयोगास अवगत केले आहे. आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि. १२.११.२००९ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद न देता त्यांनी माहिती देण्यास लावलेल्या विलंबाबद्दल त्यांना शास्ती लावावी, अशी आयोगास विनंती केली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने या प्रकरणी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये परस्पर विरोधी वर्तन व विसंगत मतप्रदर्शन केले आहे. तरीही अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याच्या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही असद्‌हेतूने टाळले असल्याचे अथवा अपिलार्थीपासून ही माहिती दुष्ट हेतूने दडविली असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे त्यांची जन माहिती अधिकाऱ्यास शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करत आहे. तसेच या मुद्यावर युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबींचा विचार करता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. मोईज खान पठाण, व्दारा-राम संगनवार, 'ओम निवास', प्र.नि.हा.शाळेजवळ, कैलास नगर, नांदेड ४३१ ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०५

निर्णय दिनांक : १९.११.२००९

१. श्री.जयराम सिध्देश्वर कंचलीवार, :अपिलार्थी
रा.किनवट, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, हिमायतनगर, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हदगाव, जि.नांदेड
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, हिमायतनगर,जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१९.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शेत स.नं.१६९ मालमत्ता क्र. १८-अ व शेत स.नं. २८३,२८४,२८५,२८९ च्या संदर्भात प्लॉटच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या स.नं.मधील विक्री झालेल्या प्लॉटची संख्या, फेर झालेल्या प्लॉटची संख्या,

फेरफारासह प्रत, उर्वरित प्लॉटचे मालकी हक्क प्रमाणपत्र व नमुना नं.८ च्या नकला आणि आतापर्यंत फेरफार झालेल्या प्लॉटस्धारकांची नावासह व पत्त्यासह यादी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर असल्यामुळे हदगाव पंचायत समिती कार्यालयाने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दि. ०७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर यांना पाठविला. त्यांनी दि. १६.०४.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर संबंधित ग्राम सेवकांनी अपिलार्थीस दि. ०२.०९.२००८ रोजी पोस्टाद्वारे माहिती पाठविली. तथापि अपिलार्थीने यापूर्वीच वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या सर्व्हे नंबरमधील प्लॉटच्या विक्रीसंदर्भात माहिती मागविली आहे, हे स.नं.खुद्द अपिलार्थीच्या मालकीचे आहेत. त्यांच्याकडे ही माहिती पूर्णपणे उपलब्ध असूनदेखील त्यांनी ही माहिती ग्रामसेवकाकडे विचारली आहे. अपिलार्थीस त्यांनी दि. ०२.०९.२००८ रोजी (पोस्टाची पावती क्र. १११ दि.०४.०९.२००८द्वारे) आवश्यक ती माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले. माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी आयोगासमोर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या जमिनीच्या प्लॉटच्या विक्रीसंदर्भात ग्रामसेवकाकडे माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित जमीन ही अपिलार्थीच्या मालकीची असल्यामुळे ही माहिती वास्तविक अपिलार्थीकडे उपलब्ध असावयास हवी. तथापि तरीही अपिलार्थीने ग्रामसेवकाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ही माहिती मागितली आहे. अर्थात अधिनियमातील कलम ३ नुसार तसा त्यांना हक्कही आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता आयोगास असे आढळून आले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त एका पृष्ठाची माहिती पाठवून अपिलार्थीने विक्री केलेल्या प्लॉटपैकी ज्यांच्या नावे फेर झाला आहे, त्यांच्या नावाची फक्त यादी व प्लॉट क्रमांक इतकीच माहिती अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये उर्वरित प्लॉट्सचे मालकी हक्कांचे प्रमाणपत्र व नमुना नं. ८ च्या नकला आणि ज्यांना प्लॉट विक्री केले आहेत, त्यांचे पत्ते ही माहिती अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी स.नं. फेरफार नमुना नं.८ च्या प्रती आता एकत्रित केल्या असून, ही माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीने ज्या प्लाटधारकाने प्लॉट विकला आहे, त्यांच्या पत्त्याची माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर प्लॉटचे फेर झाल्याशिवाय, उपलब्ध होऊ शकणार नाही, असे त्यांनी आयोगास अवगत केले. ज्या प्लॉटचे फेर झाले, त्या प्लॉटच्या खरेदी खताच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध असून खरेदीखताच्या प्रतीवरुन खरेदी केलेल्या प्लॉटधारकांचे पत्ते अपिलार्थीस त्यांना पाठविता येतील, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आणि अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती याचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली

उर्वरित सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १९.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. वडपत्रे (सध्या ग्रामसेवक, ग्राम पंचायत खडकी, हिमायतनगर पंचायत समिती अंतर्गत येथे कार्यरत) यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्तव्य परायणतेचा अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. वडपत्रे (सध्या ग्रामसेवक, खडकी, ता. हिमायतनगर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांकः १९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.जयराम सिध्देश्वर कंचलीवार,कृष्णा गारमेंटस, मेन रोड, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत, हिमायतनगर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०६

निर्णय दिनांक : १९.११.२००९

१. श्री.नारायण ग्यानबा बापमारे, :अपिलार्थी
रा.मंगरुळ नं.१, ता.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
माजलगाव,जि.बीड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जि.बीड.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही समाधानकारक माहिती मिळालेली नाही. त्यांनी याबाबत दाखल केलेल्या दुसऱ्या एका अपिलामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामधील अधिकाऱ्यांनी आयोगासमोर खोटे कथन केले असून ते देखील त्यांच्या संदर्भातील आहे व ही माहिती देखील अपिलार्थी सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आणून देणार आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, सुनावणीच्या वेळी ते स्वतः उपस्थित राहून त्यांची बाजू संपूर्ण कागदपत्रांसह मांडणार आहेत, त्यामुळे या अपील अर्जामध्ये ते जास्तीचे कथन करु इच्छित नाहीत. या अर्जामध्ये

त्यांनी आयोगास अंतिमतः अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्यात येऊन कलम ७(६) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस मोफत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत रोहयो अंतर्गत दि. ०१.०१.२००८ ते २५.०१.२००८ पर्यंत केलेल्या कामांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०१.०२.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना अपेक्षित असलेली माहिती संबंधित शाखा अभियंत्याकडून प्राप्त होताच देण्यात येईल असे कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपील निकाली काढले. या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भातील प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पुरविण्यात आलेली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील केले आहे. परंतु त्यांच्या

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या व ही माहिती त्यांना का अपूर्ण वाटते याच्या समर्थनार्थ कोणतीही कागदपत्रे आयोगास सादर केलेली नाहीत, तसेच द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांनी आयोगासमोर स्वतः उपस्थित राहण्याचे कबूल करुन, आयोगाच्या कार्यालयातून दि. ०९.१०.२००९ रोजी सुनावणीसंबंधीचे सूचनापत्र पाठवूनही, आज रोजी आयोगासमोर ते उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य नसावे, असे अनुमान काढण्यात येऊन आवश्यक त्या कागदपत्रांच्या अभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १९-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.नारायण ग्यानबा बापमारे,रा.मंगरुळ नं.१, ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप-विभाग, माजलगांव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१
निर्णय दिनांक १९/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅंड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२
निर्णय दिनांक १९/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी, विशेष समाजकल्याण अधिकारी कार्यालय, आनंदनगर, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, विशेष समाजकल्याण कार्यालय, आनंदनगर, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८
निर्णय दिनांक १९/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती उज्वला दि. पाटील,<br>बी-१३, पहिला मजला, मेघदूत शॉपींग सेंटर,<br>सी.बी.एस. नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>निफाड, जि. नाशिक | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषी अधिकारी,<br>निफाड, जि. नाशिक | | |

**निर्णय**

श्रीमती. उज्वला दि. पाटील यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०५.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केले असता, हे अपील जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम

अपिलावर विहीत एक महिन्यात निर्णय न दिल्यामुळे पुढील ३ महिन्याचे कालावधीत दाखल करणे आवश्यक होते. तथापि ते विहीत मुदतीनंतर ११० दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. विहीत मुदतीत अपील दाखल न करण्यासंबंधी आईचे आजारपण व ऑपरेशन हे कारण नमूद करुन विलंब क्षमापित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि प्रथम अपील केल्यापासून व्दितीय अपील सादर करेपर्यंतच्या कालावधीत अपिलार्थी यांना आयोगाकडे विहीत मुदतीत अपील करण्यास कोणतेही बंधन नसतांना व संधी असतांना त्यांनी व्दितीय अपील विहीत मुदतीमध्ये सादर केले नाही, असे दिसून येते. त्यांनी विहीत मुदतीत अपील करण्यासाठी झालेल्या विलंबासाठी दिलेले कारण आयोगास संयुक्तिक वाटत नाही. वरील वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळणे योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्रीमती उज्वला दि. पाटील, बी-१३, पहिला मजला, मेघदूत शॉपिंग सेंटर, सी.बी.एस., नाशिक.

२) जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, निफाड, जि. नाशिक

३) जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, निफाड, जि.नाशिक

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९५

निर्णय दिनांक १९-११-२००९

१ श्री. संजय रामचंद्र लिहिणार, : अपिलार्थी

मु. पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर,

तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर,

तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे आणि त्यांनी उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांनी सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-११-२००७ रोजी रात्रौ ११-३० वाजता धाड टाकून घाणेगांव येथील

धरणात अवैधरित्या मुरुम चोरी करतांना सुधाकर गायके व गणेश गायके यांचे एक जे. सी. बी. व तीन ट्रॅक्टर यांचा स्पॉट पंचनामा, जप्त केलेल्या मालाचा तपशील व पोलीस पंचनामा तसेच मुरुम चोरी प्रकरणात त्यांना लावण्यात आलेल्या दंडाची किती रक्कम वसूल केली याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीची लागणारी रक्कम चलनाव्दारे भरण्याचे व दंडनीय रकमेचे चलन हवे असल्यास शासकीय कोषागारात चलनाव्दारे शुल्क भरणा करुन त्याची चलन प्रत तलाठी सजा कासोडा यांच्याकडे सादर करावी व प्रत त्यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २८-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस मोफत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी " माहिती अधिकारी हे अर्जदाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास उदासीन असल्याचे स्पष्ट होते " असे अभिप्राय नोंदविले आहेत. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०८-२००८ रोजी काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील तहसीलदार, गंगापूर यांनी या प्रकरणी घाणेगांव शिवारात

अवैध मुरुम चोरी करतांना पकडलेल्या प्रकरणी केलेल्या स्पॉट पंचनाम्याची प्रत, जप्त केलेल्या मालाचा तपशील आणि पोलीस पंचनाम्याची प्रत ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अप्राप्त आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, दिनांक ०८-११-२००७ ते १२-११-२००७ या कालावधीमध्ये घाणेगांव शिवारामध्ये श्री. सुधाकर गायके हे रात्रौ ०८-०० ते पहाटे ०४-०० या कालावधीमध्ये सतत अवैधरित्या जमिनीची खोदाई करुन मुरुम खाजगी कंपनीला विकत होते. त्यांनी या प्रकरणी तत्कालीन तहसीलदार, गंगापूर (श्रीमती सविता चौधर, सध्या तहसीलदार, वाशी, जिल्हा उस्मानाबाद या पदावर कार्यरत) यांच्याकडे याविषयी तक्रार केली असता त्यांनी रात्रौ ११-३० वाजता घटनास्थळी भेट देऊन श्री. सुधाकर गायके यांनी खोदाई केलेल्या क्षेत्राची पोलीसांच्या मदतीने मापे घेतली आहेत. त्यांच्या त्यावेळेच्या अनुभवाप्रमाणे गायके यांनी २१०० ब्रास इतक्या मुरुमाची खोदाई केल्याचे आढळून आले व त्याप्रमाणे तसाच पंचनामा श्रीमती सविता चौधर यांच्याकडे आहे. या पंचनाम्याची प्रत त्यांना मिळावी अशी त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अंतीमतः अपेक्षा व्यक्त केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अभिलेख्यातील या प्रकरणाशी संबंधित सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०८-२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील स्पॉट पंचनामा, जप्त केलेल्या वाहनाचा तपशील आणि पोलीस पंचनामा याच्या प्रती याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या विषयीचा कोणताही तपशील त्यांच्याकडील अभिलेख्यात त्यांना आढळून आला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या सहायकाने देखील असा युक्तिवाद केला की, अशा प्रकारचा पंचनामा मूळात त्यांच्या अभिलेखात कधीच उपलब्ध नव्हता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीच्या दिनांक २८-०५-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रथम

प्रतिसाद हा अवैध आहे. कारण या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित शुल्क व त्याचा तपशील जो त्यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कळविणे अनिवार्य आहे, तो अपिलार्थीस दिलेला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले आहे की, त्यांनी शासकीय कोषागारात चलनाव्दारे शुल्क भरणा करुन त्याची प्रत तलाठी सजा कासोडा यांच्याकडे सादर करावी व त्यांच्याकडून माहिती परस्पर हस्तगत करावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशा प्रकारची सूचना देणे हे पूर्णतः अवैध आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद देण्याच्या ऐवजी त्यांनी अशा प्रकारचे अवैध पत्र ज्यामध्ये शुल्काच्या तपशीलाचा समावेश नाही, असे अपिलार्थीस पाठवून, अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीचा भंग केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता, या निर्णयामध्ये उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणताही कालावधी जन माहिती अधिकारी यांना निश्चित करुन दिलेला नाही असे दिसून येते.

उपरोक्त प्रकरणी आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, संबंधितांनी भरलेल्या दंडाच्या पावतीच्या प्रतीशिवाय दुसरी कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने, इतर मुद्दयावरील माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळणार नाही, हे उघड आहे. तथापि या प्रकरणी आयोग सचिव (महसूल) यांचे एका मुद्दयावर लक्ष वेधू इच्छितो की, संबंधित तहसीलदार श्रीमती सविता चौधर यांनी दिनांक १२-११-२००७ रोजी रात्रौ ११-३० वाजता गंगापूर तहसील क्षेत्रातील घाणेगांव येथील अवैध मुरुम खोदाई संदर्भात केलेल्या जप्तीसंदर्भात कोणत्याही प्रकारची कायदेशीर कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या प्रकरणी त्यांनी अवैध खोदाई संदर्भात कोणताही पंचनामा न करता अवैध खोदाई करणा-या व्यक्तीवर फक्त दंड लावला आहे. त्यांनी या प्रकरणी केलेल्या अशाप्रकारच्या कारवाईबाबत मंत्रालयीन स्तरावर चौकशी होणे आयोगास आवश्यक वाटते. त्याचबरोबर अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या

पत्राव्दारे अवैध प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ७ चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती सविता चौधर, तत्कालीन तहसीलदार, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद सध्या तहसीलदार, वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देण्यासाठी कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती सविता चौधर, तत्कालीन तहसीलदार, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद सध्या तहसीलदार, वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय रामचंद्र लिहिणार, मु. पो. घाणेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर,

जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९६

निर्णय दिनांक १९-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. जगन्नाथ जयवंतराव बोबडे,<br>मु. पो. इसारवाडी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयास त्यांनी वेळोवेळी दिलेल्या अर्जावर तहसील कार्यालय, पैठण यांनी काय कार्यवाही केली याबाबतची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांच्या पत्रांचा संदर्भ अपिलार्थीने दिला आहे ज्यामध्ये पत्राचा जावक क्रमांक व दिनांक

याचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०६-२००८ रोजी निर्णय देऊन देखील, कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. या माहितीची त्यांना आवश्यकता आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ज्या पत्रांचा संदर्भ दिला आहे ती पत्रे खरोखरच अस्तित्वात आहेत किंवा कसे हे जाणून घेण्यासाठी आयोगाने अपिलार्थीस या पत्राच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध असल्यास अथवा त्यांनी माहितीसाठीच्या दिलेल्या अर्जासंदर्भात त्यांच्याकडे कोणता पुरावा आहे याची विचारणा केली असता, त्यांनी आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या संदर्भाच्या प्रती सादर केल्या. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्या सर्व अर्जाच्या प्रती त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत जोडल्या होत्या. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाच्या प्रतीची आयोगाने मागणी केली असता, सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास आढळून आले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठी-च्या मूळ अर्जाबरोबर फक्त त्यांच्या कार्यालयाच्या पत्राचा जावक क्रमांक व दिनांक एवढाच संदर्भ दिला आहे. यावरुन त्या कागदपत्रांचा ते त्यांच्या कार्यालयात नेमका शोध घेऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे ज्या ज्या पत्राच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती त्या पत्राच्या प्रती देखील अर्जासोबत जोडल्या आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. आता या पत्राच्या प्रती ते जन माहिती अधिकारी यांना देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी, जावक क्रमांक आणि दिनांकाअन्वये त्यांना संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकली नाहीत हा केलेला युक्तिवाद, आयोग पूर्णतः अमान्य करत आहे. कारण कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये पत्राला जावक क्रमांक दिल्यानंतर ते त्या कार्यालयातील कोणत्या शाखेशी व कोणत्या कर्मचा-याशी संबंधित आहे हे तात्काळ कळून येते. त्यामुळे तहसीलदार यासारख्या जबाबदार पदावरील अधिका-याने केलेला हा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही. या त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांना कार्यालयीन पत्रव्यवहारासंदर्भात अपूरे ज्ञान असल्याचे आढळून येत आहे. आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या सर्व अर्जाच्या प्रती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन, त्या पत्रांच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या निर्णयास जन माहिती अधिकारी व या प्रकरणातील त्यांचे सर्व जबाबदार कर्मचारी/अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देता स्पष्ट

केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल महसूल आयुक्त, औरगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित जबाबदार सर्व कर्मचारी /अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या केलेल्या पत्रांवर त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित जबाबदार सर्व कर्मचारी /अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जगन्नाथ जयवंतराव बोबडे, मु. पो. इसारवाडी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,

पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९७

निर्णय दिनांक १९-११-२००९

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
कार्यालय, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती दिली गेली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - माहिती

अधिकार कलम ४ च्या १७ कामांची माहिती तयार असल्याबाबत व वरिष्ठांना पाठविलेल्या अहवाल पत्राची छायांकीत प्रत, उपविभागीय कार्यालयांनी कलम ४ ची १७ कामे पूर्ण असल्याबाबत त्यांच्या कार्यालयास पाठविलेल्या अहवालांच्या छायांकीत प्रती, उपविभागनिहाय कृषि पंपधारकांची यादी, त्यांना दिलेला जोडणीचा सामानाचा दिनांकासह अहवाल, आपल्या व उपविभागीय भांडारगृहातील साहित्याचे आवक जावक रजिस्टरच्या संपूर्ण नोंदीसह छायांकीत प्रती व आपल्यासह जिल्ह्यातील उपविभागीय कार्यालयात आलेल्या व निकाली काढलेल्या माहिती अधिकार अर्जांची संख्या - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी येथील कार्यालयामध्ये अर्जाची व अपील अर्जाची दखल घेतली जात नाही. या प्रकरणी देखील त्यांनी दिनांक ०८-०८-२००८ रोजी कार्यकारी अभियंता श्री. बेग यांच्याकडे, त्यांच्या दिनांक ०५-०७-२००८ च्या अपिलाची सुनावणी घेण्याकरिता पत्र दिले. श्री. बेग, कार्यकारी अभियंता यांना हे पत्र त्याच दिवशी प्राप्त झाले. परंतु जनतेच्या पत्रांची कोणतीही दखल घेतली जात नाही अथवा कोणताही प्रतिसाद हे कार्यालय देत नाही. त्यांनी मूळ

अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर दंड लावण्याचे आदेशित करावे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात किती वेळा गेले यासंदर्भात अपिलार्थीकडे काही पुरावा उपलब्ध आहे काय, असे आयोगाने विचारले असता, अशा प्रकारचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (१) नुसार कार्यवाही करणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीने अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत ते आयोगाकडील सुनावणीच्या वेळेपर्यंत त्यांना कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी तर जन माहिती अधिकारी यांच्याही वर कडी करुन अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२००८ रोजीच्या अपील अर्जावर, त्यांना अपिलार्थीने दिनांक ०८-०८-२००८ रोजी स्मरणपत्र देऊन देखील, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर यासंदर्भात कोणताही निर्णय दिला नाही. आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज, प्रथम अपील अर्ज आणि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०८-०८-२००८ रोजी दिलेले स्मरणपत्र, ही सर्व कागदपत्रे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ त्यांच्या कार्यालयाच्या जावक लिपिकाची सही व शिक्का असल्याची कागदपत्रे अपिलार्थीने आयोगास सादर केली आहेत. यावरुन अपिलार्थीची माहितीसाठीची सर्व पत्रे व अर्ज

सर्व संबधितांना प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अर्ज केलेल्या दिनांकापूर्वीच्या तीन वर्षाशी संबंधित असल्याचे दिसून येत आहे. माहितीची व्याप्ती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मूळात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. अशा प्रकारची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. अपिलार्थीने हे उत्तरदायित्व पार पाडले किंवा कसे याबाबत त्यांच्याकडे कोणताही पुरावा उपलब्ध नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी स्वतः होऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापृष्ठ्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेले असल्याचे सिध्द होत नाही. परिणामी अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या-वर शास्ती लावण्याची आयोगास केलेली विनंती आयोग अमान्य करत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर दिनांक ०८-०८-२००८ रोजी त्यांच्या स्मरणपत्रा-व्दारे अपील निर्णयासंदर्भात पाठपुरावा केल्याचे आढळून येत आहे. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी (श्री. बेग, कार्यकारी अभियंता ) यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, मु. पो. सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९८

निर्णय दिनांक १९-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख,<br>मु. पो. सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, परभणी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कृषि उपसंचालक,<br>जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालय, परभणी | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००५ ते १५-०४-२००८ या कालावधीशी संबधित काही

माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधीत माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने त्यांना पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीने दिनांक ०८-०८-२००८ व दिनांक १२-११-२००८ रोजी स्मरणपत्रे देऊन देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, मु. पो. सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९९

निर्णय दिनांक  १९-११-२००९

१ श्री. राजेंद्रकुमार वामनराव भुतकर, : अपिलार्थी
मु. मुरुमखेडा, पो. येलदरी कॅम्प, तालुका जिंतूर,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर,
तालुका जिंतूर, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
उपविभागीय कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या तरतुदीनुसार ग्रामपंचायत

निवडणूकी संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पोस्टाने पाठविली आहे. तथापि विचारलेली माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून आणि जन अपिलीय अधिकारी यांचा अपील निर्णय प्राप्त न झाल्याचे दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात स्वतः कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०३-२००८ रोजी पोस्टाव्दारे आवश्यक ती माहिती पाठविली. अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०३-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठविल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि या माहितीत अपिलार्थीच्या मूळ

अर्जातील 'जिल्हाधिकारी यांनी मौ. मुरुमखेडा येथील सरपंच पदाची तारीख घोषित न करता कोणत्या कलमानुसार निवडणूक झाली' या मुद्दयाची माहिती आढळून येत नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, सरपंच पदाची निवडणूक घेण्याकरिता त्यांना जिल्हाधिकारी, परभणी यांनी त्यांच्या दिनांक १७-११-१९६४ च्या आदेशाव्दारे प्राधिकृत केले असून या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली आहे. तसेच अपिलार्थीच्या मुरुमखेडा या गावामध्ये सरपंच पदाची तारीख तहसीलदार, जिंतूर यांनी घोषित केलेली होती आणि असे आदेश जिल्हाधिकारी ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३३ च्या तरतुदीनुसार देऊ शकतात. यासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने तहसीलदार, जिंतूर यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी निवडणूक घोषित केलेल्या आदेशाची प्रत तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३३ ची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी म्हणजे अपिलार्थीस परिपूर्ण माहिती प्राप्त होऊ शकेल.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी तहसीलदार, जिंतूर यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिंतूर, जिल्हा परभणी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्रकुमार वामनराव भुतकर, मु. मुरुमखेडा, पो. येलदरी कॅम्प, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उपविभागीय कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८००

निर्णय दिनांक १९-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. दिनकर उर्फ दिलीप माधवराव बोराडे,<br>रा. खासबाग, बीड, तालुका जिल्हा बीड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>बीड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. सदर अपिलाचा निर्णय अपिलार्थीच्या बाजूने लागला असून त्यानंतर माहिती अधिका-याने अपिलार्थीस काही माहिती दिली आहे. तथापि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही दिली गेली नाही. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना

शास्ती लादण्यात यावी व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी व अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-१९९८ ते १२-०५-२००८ या कालावधीतील एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांच्या मूळ अर्जातील रहिवासी प्रमाणपत्राबाबत शासनाकडून शासन आदेश, नियम व मार्गदर्शन मागवावे असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १५-०५-२००८ व तदनंतर दिनांक ०८-०७-२००८ व २४-०७-२००८ रोजी आवश्यक ती व त्यांच्या-कडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थीस आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ७ वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे 'एखाद्या ठिकाणाचा रहिवासी म्हणून गृहीत धरण्याबाबतचा आणि वेगळे प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक नसल्याबाबत शासनाचे आदेश किंवा जे नियम आहेत त्या नियमाची प्रत' अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी, अशा प्रकारचा कोणताही शासन आदेश आस्तित्वात नाही त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या या मुद्दयासंदर्भात शासनाकडून दि. १४-०७-२००८ रोजीच्या पत्राद्वारे मार्गदर्शन मागितले असून या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०७-२००८ रोजी पाठविली आहे, असे आयोगास अवगत केले. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी टाळले असल्याचे म्हणता येणार नाही. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणार नाही. तथापि या मुद्दयावर अपिलार्थीस दिलासा देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी शासनाकडे दिनांक १४-०७-२००८ रोजी केलेल्या संदर्भाने पाठपुरावा करावा व या संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस यानंतर लागलीच उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व्दारे सन १९९८ पासून आजपर्यंत किती धरणग्रस्तांना नोक-या मिळाल्या याची वर्षनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयीन अभिलेख्यावरुन मागितली आहे. जन माहिती अधिकारी

यांना ही माहिती अपिलार्थीस कळविणे आवश्यक आहे. तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या पत्रासंदर्भात दिलेली माहिती चुकीची आहे. या मुद्दयासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस सन १९९८ पासून निवड प्राधिकरणाने मागणी केल्यानुसार त्यांनी पाठविलेल्या पडताळणी अहवालाची माहिती अपिलार्थीस कळविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या मुद्दयासंदर्भात आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडून पुरविल्या जाणा-या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित प्रकल्पग्रस्तांना जेव्हा नियुक्ती दिली जाते तेव्हा नियुक्तीचे आदेश जन माहिती अधिकारी याच्याकडे प्राप्त होत नाहीत. किंबहुना अशा प्रकारची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे जतन करुन ठेवली जात नाही. कारण जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे, प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, सदर प्रकल्पग्रस्तास महाराष्ट्र राज्यामध्ये कोठेही शासकीय कार्यालयामध्ये नोकरी प्राप्त करुन घेण्याची मुभा असते. जन अपिलीय अधिकारी यांचे हे स्पष्टीकरण समाधानकारक वाटते. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारचे स्पष्टीकरण अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात कळविणे उचित राहिले असते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात मागणी केलेली माहिती त्यांनी अशा प्रकारे अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे अथवा अपिलार्थीपासून माहिती दडविली असल्याचे नि:संशयपणे आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिनकर उर्फ दिलीप माधवराव बोराडे, रा. खासबाग, बीड, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१३

निर्णय दिनांक : २०.११.२००९

१. श्री. राहुल गोरख गाडे, :अपिलार्थी
राा. आंदोरा, ता.कळंब, जि. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
ग्रामपंचायत कार्यालय, बांगरवाडी,
ता.कळंब, जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, कळंब,
जि.उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, बांगरवाडी,
ता.कळंब,जि.उस्मानाबाद.

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, कळंब, जि.उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००४ ते दि. ०१.०७.२००८ या कालावधीशी संबंधित काही विस्तृत स्वरुपाची माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०८.२००८ रोजी प्रथम केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसांचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब, जि.उस्मानाबाद उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दि. १२.१०.२००८ रोजी संपूर्ण माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले. तथापि यासंदर्भातील त्यांनी सादर केलेला पुरावा पाहता, दि. १२.१०.२००८ रोजी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०१.०६.२००८ रोजीच्या अन्य अर्जासंदर्भात माहिती दिल्याचे आयोगास आढळून आले आहे. यावरुन उपस्थित जन माहिती अधिकारी हे आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे दिसून येत आहे.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदींनुसार देय होत आहे. त्यांना माहिती देण्यासंदर्भात

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. सध्याचे जन माहिती अधिकारी या पदावर ते नुकतेच बदलून आले असल्यामुळे त्यांना या प्रकरणाची कोणतीही माहिती नाही. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. संबंधित जन माहिती अधिकारी हे वरील आदेशाचे मुदतीत अनुपालन करतील, याची दक्षता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.उस्मानाबाद यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती पाटील (सध्या ग्रामसेवक, पंचायत समिती पंढरपूर, जि.सोलापूर येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय होत असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्रीमती पाटील, सध्या ग्रामसेवक, पंचायत समिती पंढरपूर,जि.सोलापूर) या पदावर कार्यरत यांच्यावर प्रचलीत

सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २०-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राहुल गोरख गाडे,रा. आंदोरा, ता.कळंब जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बांगरवाडी, ता.कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. श्रीमती पाटील, ग्रामसेवक, पंचायत समिती, पंढरपूर, जि.सोलापूर.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१४

निर्णय दिनांक : २०.११.२००९

१. श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, :अपिलार्थी
रा.वैजापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,
औरंगाबाद कार्यालय, रोटेगांव,
ता.वैजापूर, जि. औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता श्रेणी-१, वर्ग-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर,
जि. औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२५.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, गट नं. १५२ मौ. वैजापूर येथील नागपूर-मुंबई महामार्गाकरिता संपादित क्षेत्राची स्थळ पाहणी व पंचनामा, संमतीपत्र आणि दि. ०३.०७.२००२ रोजी घेतलेल्या व्हीडीओ शुटींगच्या कॅसेटची प्रत, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०९.२००८ रोजी प्रथम केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२९.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, गायकवाड वाडी, शिवराई रोड, वैजापूर, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्रेणी-१, वर्ग-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१५

निर्णय दिनांक : २०.११.२००९

१. श्री. दत्तराव भुजंगराव सोनटक्के, :अपिलार्थी
रा. ब्राम्हणवाडा, ता.जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
मुख्याध्यापक,
संजय गांधी हायस्कूल, पुणेगाव,
ता.जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

त्रयस्थ पक्ष : (१)श्री. तवर वाय.डी., (२) सौ. मग्गीरवार एस.एस.,(३)श्री. एम.पी.मग्गीरवार, (४) श्री. तेलंग, (५) श्री.मग्गीरवार,(६) श्री. उमाटे एन.एच. व (७) श्री. शिंदे के.व्ही.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील सादर केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. तवर, श्री. तेलंग, सौ.मग्गीरवार एस.एस. यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत, श्री. तेलंग, सौ.मग्गीरवार यांनी ६ जुलै १९९८ पासून दि. ३१.०८.२००७ पर्यंत

पगारापोटी किती अनुदान उचलले, श्री. उमाटे एन.एच. यांचा बंद केलेला पगार सुरु करण्याच्या आदेशाची प्रत, प्र.मुख्याध्यापक यांच्या दि. ०१.०२.२००८ ते दि. ३०.०४.२००८ व दि. ०१.०५.२००८ पासूनची आदेशाची प्रत, श्री. तेंलग व मग्गीरवार यांच्याबाबतीत दि.२८.०१.२००८ च्या प्रस्तावाची संपूर्ण कागदपत्रे, श्री. शिंदे के.व्ही. यांच्या प्रस्तावाच्या व ठरावाची प्रत, श्री.तेलंग एम.पी, मग्गीरवार एस.एम. यांच्या जातीचे प्रमाणपत्र, जेष्ठता यादी जन्म दिनांकासह व अनुशेष तक्ता - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९९८-२००८ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. २६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भातील माहिती दि. २५.०९.२००८ रोजी व मुद्दा क्र. ६ च्या संदर्भातील दि. १९.०९.२००८ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संजय गांधी हायस्कूल, पुणेगाव, ता.जि.नांदेड उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संजय गांधी हायस्कूल, पुणेगाव, ता.जि.नांदेड यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे जी माहिती मागविली आहे, ती अपिलार्थीकडेच उपलब्ध असून त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाच्या विषयी जन

माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे त्यांच्याशी संबंधित सर्व माहिती अपिलार्थीकडेच उपलब्ध असून ते ही माहिती संस्थेस देत नाहीत. ते सध्या संस्थेचे सचिव या पदावर कार्यरत आहेत. तसेच अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षांच्या संदर्भात माहिती मागितली आहे, त्यांची नेमणूक, अपिलार्थी हे ज्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक या पदावर कार्यरत होते त्यावेळी त्यांनीच केली असून त्यांचा पगार देखील अपिलार्थीनेच काढलेला आहे. तसेच त्यांच्याकडे उपलब्ध माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ०५.१०.२००९ रोजी पूर्णपणे पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादामध्ये अपिलार्थीस दि. ०५.१०.२००९ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले आहे. तथापि यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केला नाही. या मुद्यासंदर्भात त्यांनी दि. ०५.१०.२००९ रोजी सचिव, जगदंबा एज्युकेशन सोसायटी यांना उद्देशून सदर पत्र दिले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मते जगदंबा एज्युकेशन सोसायटीचे सचिव हेच अपिलार्थी आहेत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या पदनामास उद्देशून अपिलार्थीस माहिती दिली आहे परंतु या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०५.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेली कथित माहिती ही, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १२.०९.२००९ रोजी दिलेल्या अन्य माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात दिलेली आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे अनुमान आयोग दृढ करीत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मते त्रयस्थ पक्षाच्या जातीची प्रमाणपत्रे ही अपिलार्थी हे त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असताना त्यांनीच प्राप्त करुन घेतली होती.

यासंदर्भात त्रयस्थ पक्षाचा लेखी युक्तिवाद अपिलार्थीने आयोगास सादर केला असून यामध्ये श्री. तेलंग, सौ. मग्गीरवार व श्री. तवर या त्रयस्थ पक्षाने असे नमूद केले आहे की, त्यांच्या कायमस्वरुपी नेमणूकीचे आदेश त्यांना अपिलार्थीच्या हस्ते झाले असून त्यांच्या नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीच्या वेळी ही संपूर्ण कागदपत्रे त्यांनी अपिलार्थीस हस्तांतरित केल्यानंतर ते सेवेमध्ये रुजू झाले आहेत. अपिलार्थी हे अशाप्रकारची त्यांच्या विषयीची माहिती मागून विनाकारण त्रास देत आहेत. त्रयस्थ पक्षाचा हा मुद्दा लक्षात घेता व तसेच त्रयस्थ पक्षाविषयीची खाजगी माहिती प्राप्त करुन अपिलार्थी हे कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत व यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये काहीही स्पष्ट केलेले नाही, उलट ही माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम ८(१)(ञ)च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या जातीची प्रमाणपत्रे आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळू शकणार नाहीत, परंतु त्यांच्या मूळ अर्जातील माहिती अधिकार अधिनियमानुसार त्यांना देय असलेली श्री. तेलंग व मग्गीरवार यांनी दि. ०६.०७.१९९८ पासून ते दि. ३१.०८.२००७ पर्यंत पगारापोटी उचललेले अनुदान, श्री. उमाटे एन.एच. यांचा बंद केलेला पगार ज्या आदेशाने पारित केला त्या आदेशाची प्रत, श्री. शिंदे के.व्ही. यांच्या प्रस्तावाची शालेय शिक्षण समितीने केलेल्या ठरावाची प्रत आणि शाळेतील शिक्षकांचे जन्मदिनांक व ज्येष्ठता यादी, ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अनुशेष तक्ता या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अशाप्रकारे अनुशेष तक्ता त्यांच्या शाळेमध्ये ठेवला जात नाही. या मुद्यावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, गेली अनेक वर्षे शासनाच्या विविध कार्यालयामार्फत अनुशेष भरण्याची कार्यवाही सुरु आहे. संजय गांधी हायस्कूल,पुणेगाव यांना शासनाचे अनुदान प्राप्त होत आहे. त्यामुळे शासनाचे नियम हे त्यांना तंतोतंत लागू होतात. परंतु शाळेकडे नियमाप्रमाणे, शासनास अभिप्रेत असलेले अभिलेखे / रजिस्टर त्यांच्याकडे ठेवले जात

नाही.त्यामुळे अशा शिक्षण संस्थांना शिक्षणाधिकारी नियमित अनुदान कसे देतात, हे आयोगास कोडे आहे. या प्रकरणी शिक्षणाधिकारी नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी शिक्षण विभागाशिवाय इतर विभागातील अधिकाऱ्याच्या नेमणूकीची व्यवस्था करुन संजय गांधी हायस्कूल,पुणेगाव या शाळेला शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्यामार्फत सन १९९८ पासून दिल्या गेलेल्या अनुदानाची चौकशी करावी व या प्रकरणी दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी व त्याचप्रमाणे या शाळेकडे शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे अनुशेष रजिस्टर ठेवले जात नाही, ही बाब खरोखरीच गंभीर आहे, त्यामुळे या बाबतची तात्काळ चौकशी करुन दोषी व्यक्तींवर योग्य ती कारवाई करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि त्यांना देय असलेली माहिती याचे केलेले पृथक्करण व ही माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि.२१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली व वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यातील अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल अध्यक्ष, श्री. जगदंबा एज्युकेशन सोसायटी, पाथरड, ता.मुदखेड, जि.नांदेड यांना संबंधित मुख्याध्यापकावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष, श्री. जगदंबा एज्युकेशन सोसायटी, पाथरड, ता.मुदखेड, जि.नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २०-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तराव भुजंगराव सोनटक्के, मु. ब्राम्हणवाडा, पो. मुगर, ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संजय गांधी हायस्कूल, पुणेगांव, ता.जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, श्री जगदंबा एज्युकेशन सोसायटी,पाथरड, ता.मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१६

निर्णय दिनांक : २०.११.२००९

१. श्री. महालिंगप्पा विश्वनाथप्पा महाजन, :अपिलार्थी
रा.उदगीर, जि. लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
नगर परिषद कार्यालय,उदगीर,
जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उदगीर, जि.लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपिक,
नगरपरिषद कार्यालय,उदगीर,जि. लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी मुद्दाम फेटाळल्यामुळे व त्यांना मिळालेल्या चुकीच्या माहितीची दुरुस्ती करुन योग्य माहिती देण्याची विनंती नाकारल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील सादर केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पदनामासंदर्भात, "उच्च न्यायालयातील माझ्या निकालानंतर दि.

२९.११.२००३ रोजी मला सेवानिवृत्तीवेतन देण्यासाठी नगर परिषदेने दिलेल्या ठराव क्र. २२ प्रमाणे माझे पदनाम (ठरावाप्रमाणे व सेवानिवृत्तीच्या वेतनश्रेणीप्रमाणे) कर अधीक्षक का लिहिले जात नाही?" अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस नगर परिषद, उदगीर येथील सर्वसाधारण सभा दि.२९.११.२००३ रोजीच्या ठरावामध्ये त्यांच्या नावासमोर कर अधीक्षक या पदनामाचा उल्लेख नसल्यामुळे व सेवानिवृत्ती वेतन आदेशामध्ये कर अधीक्षक या पदाचा, असा उल्लेख केला नसल्यामुळे कर अधीक्षक लिहिले जात नाही, असे अपिलार्थीस कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.११.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या सेवानिवृत्तीविषयी प्रकरणी मा. उच्च न्यायालयाकडे अपील दाखल केले होते. यामध्ये मा. न्यायालयाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये अपिलार्थीच्या पदनामाचा कोठेही कर अधीक्षक असा उल्लेख नाही. तसेच उदगीर नगर परिषदेने दि. २९.११.२००३ रोजी घेतलेल्या ठरावाप्रमाणे श्री. महाजन यांचे सेवानिवृत्ती व वेतन निश्चिती केलेले आहे. यामध्ये जकात अधीक्षक /अधिकारी असा उल्लेख केलेला नाही. यामध्ये कोठेही कर अधीक्षक असा उल्लेख नगर

परिषदेकडून केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत मागणी केलेली माहिती, ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याखेच्या व्याप्ती बाहेरची आहे. त्यामुळे मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती, अधिनियमातील तरतुदीशी ती सुसंगत नसल्यामुळे, देय होत नाही. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक तो खुलासा केला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याइतपतच सीमित प्रक्रिया यामध्ये समाविष्ट आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबाबतची अथवा निर्णयाबाबतची कारणे विचारता येत नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महालिंगप्पा विश्वनाथप्पा महाजन, कर अधीक्षक (निवृत्त), "वरदान" रेल्वे स्टेशन रोड (डाक बंगला मार्ग), उदगीर, जि. लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, नगरपरिषद कार्यालय, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१७

निर्णय दिनांक : २०.११.२००९

१. श्री. बालाजी किशनराव गादगे, :अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
मुख्याध्यापक,
पंडीत दीनदयाळ उपाध्याय प्राथमिक विद्यामंदिर,
उदगीर, जि. लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०७.२००८ रोजीच्या सुनावणीमध्ये त्यांना दिलेल्या तोंडी आदेशाच्या विरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, पंडित दीनदयाळ उपाध्याय प्राथमिक विद्यामंदिर, उदगीर, जि. लातूर यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या संदर्भात काही माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे मागितली होती. तथापि हा

अर्ज स्वीकार करण्यास जन माहिती अधिकारी यांनी नकार दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०७.२००८ रोजी तोंडी आदेश दिले. हे आदेश अपिलार्थीस मान्य न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी त्यांच्या वकिलासह व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता आणि विशेषत: जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही लेखी आदेश पारीत केले नसल्यामुळे आणि तसेच हे आदेश पारित करताना जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही केली आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नसल्यामुळे, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी विचारात घेऊन, सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास या टप्प्यावर योग्य वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२४.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः २०-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बालाजी किशनराव गादगे,विकास नगर, देगलूर रोड,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, पंडीत दीनदयाळ उपाध्याय प्राथमिक विद्यामंदिर, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१८

निर्णय दिनांक : २०.११.२००९

१. श्री. साहेबराव देवराव पोटभरे :अपिलार्थी
   रा. माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
   नायब तहसीलदार (महसूल),
   तहसील कार्यालय, माजलगांव, जि. बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
   तहसीलदार,
   तहसील कार्यालय, माजलगांव, जि. बीड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असताना त्यांनी केलेले प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी नामंजूर केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,"दि. १९.११.२००७ रोजी तहसील कार्यालय, माजलगाव मधील दिलेल्या ८ मुद्यांचे निवेदनावर खुलासा देणेबाबत मागणी केली होती, तो खुलासा आज दि. १३.०४.२००८

पर्यंत खुलासा न मिळाल्यामुळे ते निवेदन सोबत जोडले आहे, त्या मुद्यांचा खुलासा पुढील कारवाईसाठी मागणी करीत आहे", अशा स्वरुपात माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सशुल्क माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली कथित माहिती ही, माहिती नसून त्यांनी तहसीलदार, माजलगाव यांच्याकडे दि. १९.११.२००७ रोजी दिलेल्या अर्जावर मुद्देनिहाय खुलासा मागितला आहे आणि तो खुलासा त्यांना प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करुन हवी आहे. तथापि ही बाब पूर्णत: प्रशासकीय आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीवरुन अपिलार्थीस निश्चित जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे, ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) च्या तरतुदींशी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थीस निश्चित कोणती "माहिती" हवी आहे, याचा खुलासा करण्यासाठी अपिलार्थी हे आज

रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. साहेबराव देवराव पोटभरे, रा. नाखलगांव, ह.मु. जंम्बोदिप निवास, नवीन काटवडगांव, मजरंथ रोड, माजलगांव, ता. माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१३
निर्णय दिनांक २०/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दामोधर शंकरराव घुगे,<br>रा. पांगरी, ता.जिंतूर, जि.परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>सेलू, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषी अधिकारी,<br>परभणी, जि.परभणी | | |

**निर्णय**

श्री. दामोधर शंकरराव घुगे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २०.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०८.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३१५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. दामोधर शंकरराव घुगे, मु.पो. पांगरी, ता.जिंतूर, जि. परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१४
निर्णय दिनांक  २०/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राऊत भाऊराव अप्पाराव,<br>रा. अम्बा, ता. परतूर, जि.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>प्राथमिक शाळा हातनूर केंद्र वालूर,<br>पो. हातनूर (व्हाया वालूर), ता.सेलू, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद कार्यालय, परभणी | | |

**निर्णय**

श्री. राऊत भाऊराव अप्पाराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०३.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि.०१.११.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ११६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. राऊत भाऊराव अप्पाराव, मु.पो. अम्बा, ता. परतूर, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८३८
निर्णय दिनांक २०/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पंडीत उर्फ बंडेराव व्यंकटराव सोनटक्के,<br>रा. पिंपळगांव, पो. शेखराजुर,<br>ता.पालम, जि. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, पालम, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय कार्यालय, परभणी. | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. पंडीत उर्फ बंडेराव व्यंकटराव सोनटक्के यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १३.०३.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १५.०५.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक १४.०६.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करुन, अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. पंडीत उर्फ बंडेराव व्यंकटराव सोनटक्के, रा. मु. पिंपळगांव, पो. शेखराजुर, ता.पालम, जि.परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०७

निर्णय दिनांक   २०-११-२००९

१ श्री. मुजिब दस्तगीर पठाण, : अपिलार्थी

मु. पो. खंडाळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड,

तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड,

तालुका जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागितलेली माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००१ ते २००४ या कालावधीतील जवाहर रोजगार योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजना कामाकरिता केलेल्या धान्य वाटपाच्या कुपना-संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या पंचायत समिती अंतर्गत या योजना अंमलबजावणी करतांना सन २००१ ते २००४ या कालावधीमध्ये ग्रामपंचायतीस ५० टक्के स्तरासाठी वर्षनिहाय किती नियतन होते व त्यापैकी किती धान्य प्राप्त झाले, त्यापैकी कोणकोणत्या ग्रामपंचायतींना कशाच्या आधारे किती धान्य नियतनापैकी वाटप केले त्याची ग्रामपंचायतनिहाय माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन या पत्राव्दारे अपिलार्थीस असे कळविले की, हे काम पाहणार नायब तहसीलदार श्री. ए. के. सोनवणे हे मयत झाल्यामुळे त्यांच्याकडील असलेला पदभार त्यांनी ठेवलेले अभिलेखे हे कोठे ठेवले आहे ते उपलब्ध होत नाहीत. सदरील योजनेचे नियतन हे पंचायत समिती / डी. आर. डी. ए. यांच्या निर्देशानुसार व पत्रानुसार धान्य वाटप करण्यात आलेले आहेत. सदर अभिलेखे त्यांच्या स्तरावर शोधण्याचे काम चालू आहे आणि अभिलेखे उपलब्ध होताच माहिती संकलीत करुन ती अपिलार्थीस पुरविण्यात येईल. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २२-०९-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस तात्काळ माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी , जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हवी असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, संबंधित जन माहिती अधिकारी ए. के. सोनवणे हे मयत झाल्यामुळे त्यांनी या प्रकरणाशी संबंधित अभिलेखे कोठे ठेवले आहेत  हे त्यांच्या कार्यालयास माहीत नसल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेणे चालू असून माहिती उपलब्ध होताच ती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे.  तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रथम प्रतिसाद पाहता हा प्रतिसाद नकारात्मकच जास्त असल्याचे प्रतीत होत आहे आणि या पुढील कालावधीमध्ये अपिलार्थीस त्यांच्या व्दितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या तारखेपर्यंत म्हणजे अंदाजे एक वर्ष दोन महिने उलटून गेल्यानंतरही  संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरवून, त्यांचे माहितीचा शोध घेण्याचे काम चालू आहे हे आज त्यांच्या युक्तीवादामध्ये केलेले विधान, किती फसवे आहे हे त्यांच्या कृतीव्दारे सिध्द करुन दिले आहे.  कोणत्याही प्रशासकीय यंत्रणेमध्ये एखादी व्यक्ती मयत झाली तरीही  त्या व्यक्तीला, ती कार्यरत असताना  विशेषतः नायब तहसीलदार या पदावरील व्यक्तीला त्यांचे काम करण्यासाठी सहायक नेमलेले असतात.  त्यामुळे जरी संबंधित व्यक्ती मयत झाली तरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी त्यांच्यावर येते.  केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी अपिलार्थीने मागणी केलेले अभिलेखे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होत नाहीत असे गृहीत धरले तरी, अपिलार्थीने ज्या विषयाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे  तेच विषय पंचायत समिती आणि संचालक, डी. आर. डी. ए. यांच्याशी संबंधित आहेत.  अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी

यांनी या प्रकरणी त्यांच्याशी किती वेळा संपर्क साधला होता किंवा कसे याची त्यांना आयोगाने विचारणा केली असता, त्यावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी नकारार्थी उत्तर दिले. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या सहायकाने अभिलेखे उपलब्ध नाहीत या एकमेव कारणाचा आधार घेऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही, हे वास्तव या घटनाक्रमाच्या अखेरीस उरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सहायकाने त्यांच्या स्तरावर कोणतेही सकारात्मक प्रयत्न देखील केलेले नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) नुसार, अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्यासाठी नायब तहसीलदार यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक हे जबाबदार होत आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणशिवाय वंचित ठेऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब जिल्हाधिकारी, बीड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सर्व संबधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या ज्या त्रयस्थ यंत्रणेशी संबंधित आहे त्यांच्याशी जन माहिती अधिकारी यांनी योग्य तो संपर्क साधून, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, बीड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सर्व संबधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुजिब दस्तगीर पठाण, मु. पो. खंडाळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०८

निर्णय दिनांक २०-११-२००९

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी
अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, देहेड, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अपेक्षित माहिती न देताच अपील निकाली काढण्यात आल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वातंत्र्य सेनानी साळूबा पाटीलबा बावस्कर रा. देहेड यांच्या वारसासंदर्भात

काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - साळुबा पाटीलबा बावस्कर यांना भाऊ किती, त्यांची संपूर्ण नांवे, पुतणे किती, त्यांची संपूर्ण नांवे, मुले किती, त्यांची संपूर्ण नांवे, मुली किती, त्यांची संपूर्ण नांवे, बहिणी किती, बहिणीच्या सासरच्या आडनांवासह गाव, तालुका व जिल्हा यासह संपूर्ण माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन असे कळविले की, साळुबा पाटीलबा बावस्कर यांच्या वारसाने ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देहेड यांच्याकडे वारसा प्रमाणपत्राची मागणी केली होती परंतु ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देहेड यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे व वारस ठरविण्याचे अधिकार नसल्याने अपिलार्थीस न्यायालयामार्फत सदर वारस प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर " संबंधिताचे नातेवाईक किती सार्वजनिक प्राधिकरणात येत नाहीत व त्यांचे नातेवाईक हे ग्रामपंचायत किंवा पंचायत समिती यांच्या नियमात येत नाहीत. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस ग्रामपंचायतकडून देता येत नाही " असा निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या स्वातंत्र्य सेनानीविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, ते स्वातंत्र्य

सेनानी किमान मौजे देहेड, तालुका भोकरदन या गावाचे रहिवासी आहेत असे जरी प्रमाणपत्र त्यांना दिले तरी चालू शकेल.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष श्री. साळुबा पाटीलबा बावस्कर यांच्या संदर्भात त्यांची खाजगी माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. एखाद्या व्यक्तीचे नातेवाईक किती, त्यांची नांवे वगैरे प्रकारची माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडे अशाप्रकारच्या नात्याच्या नोंदीचा उल्लेख करुन नियमित अभिलेख्यावर उपलब्ध करुन ठेवण्याचा प्रघात नाही. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मूळात देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, किमान श्री. साळुबा पाटीलबा बावस्कर हे मौजे देहेड या गावाचे रहिवासी आहेत असे जरी त्यांचे प्रमाणपत्र मिळाले तरी चालेल, असा आयोगासमोर युक्तिवाद केला. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्या या नवीन मुद्दयाचा विचाराधीन अपिलाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जात समावेश नसल्याने या माहितीबद्दल त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे योग्य त्या तरतुदीनुसार अर्ज करावा.

मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियामतील तरतुदीशी सुसंगत नसल्याने आणि मूळात ती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असण्याचे कोणत्याही प्रकारे संभवत नसल्याने व अपिलार्थीने आज रोजी त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेला मुद्दा विचारात घेता येत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, देहेड, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०९

निर्णय दिनांक २०-११-२००९

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, : अपिलार्थी
रा. ताडकळस, पो. सिपोरा (बाजार), तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मंडळ कृषि अधिकारी धावडा यांच्या कार्यक्षेत्रातील जानेवारी २००८ ते मार्च २००८ या कालावधीतील रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामाविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती व्यक्तिशः व टपालाव्दारे अशा दोनही माध्यमाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने विस्तृत व संदिग्ध माहिती मागविली असल्यामुळे ही माहिती काढण्यासाठी वेळ लागेल असे त्यांना कळविले. यानंतर दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी ४०६४ रुपये इतके शुल्क भरण्याचे अपिलार्थीस कळविले. या पत्रामध्ये उर्वरित माहिती काढणे चालू आहे आणि त्यासाठी आणखी खर्च वाढणार आहे व वेळ ही लागणार आहे असे अपिलार्थीस कळविले. यानंतर परत दिनांक ०४-०८-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रपये ४०६४ इतके भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०८-०८-२००८ रोजी रुपये ४०६४ इतके शुल्क तालुका कृषि अधिकारी, भोकरदन यांच्याकडे रोख भरले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-११-२००८ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली आहे. अपिलार्थीस माहिती दिल्याच्या पुराव्याप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचसही असलेली कागदपत्रे आयोगास सादर केली आहेत. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-११-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४०६४ इतके त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०८-०८-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०८-२००८ पर्यंत सशुल्क माहिती देणे त्यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे क्रमप्राप्त होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती अंतिमतः दिनांक १२-११-२००८ रोजी म्हणजे सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर तीन महिने इतक्या विलंबाने दिली आहे. या विलंबाचे समर्थन उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे केले की, अपिलार्थीने भरणा केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा उपयोग अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी वरिष्ठांकडून निर्णय घेण्यासाठी त्यांना अंदाजे ३ महिने इतका कालावधी लागला व वरिष्ठ कार्यालयाकडून आदेश प्राप्त

झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविली आहे. कृषि विभागातील अशा प्रकारच्या कार्यपध्दती संदर्भात, कृषि सचिवांचे वेगवेगळ्या निर्णयाव्दारे आयोगाने वेळोवेळी लक्ष वेधले आहे. परंतु अद्यापपर्यंत कृषि विभागाने अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यानंतर या शुल्काचा उपयोग माहिती देण्याकरिता करावा अशा सूचना शासनाकडून प्राप्त झालेल्या नाहीत. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दिनांक १२-०८-२००८ रोजी माहिती प्राप्त होणे हा त्यांचा हक्क होता. परंतु शासनाकडून वेळेत निर्णय न आल्यामुळे अपिलार्थीचा हा हक्क संबंधित विभागाकडून हिरावून घेतला गेला आहे, असे आयोगाचे मत आहे. अशा प्रकरणात कृषि अधिका-यांना आवश्यक त्या सूचना परिपत्रकाद्वारे देण्याचे सचिवांना आदेशीत करुनही त्यांनी अशा प्रकारच्या कोणत्याही सूचना कृषि विभागातील अधिका-यांना अद्यापपावेतो दिलेल्या नाहीत, हा कृषि खात्यातील शासन यंत्रणेचा दोष आहे, त्याला अपिलार्थी जबाबदार नाही. अपिलार्थीने शुल्क भरुनही त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थी हे अधिनियमातील कलम ७ (६) व ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती मिळण्यास पात्र होत असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना देण्यात आलेल्या माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ४०६४ इतके अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत परत करावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक १२-११-२००८ रोजी म्हणजे, त्यांनी आयोगाकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी व्दितीय अपील नोंदविल्यानंतर, प्राप्त झाली असल्याने व प्राप्त माहितीवर अपिलार्थीने त्यांचे कोणतेही लेखी भाष्य आयोगास कळविले नसल्यामुळे आणि तोंडी भाष्य करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नसल्याने, जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रुपये ४०६४ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, रा. ताडकळस, पो. सिपोरा (बाजार), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१०

निर्णय दिनांक २०-११-२००९

१ श्री. शेख रब्बानी मोहम्मद मुनीरोद्दीन, : अपिलार्थी
प्लॉट नं. ३, गुलशन महल, गुलशन मस्जीदजवळ,
जुने कलेक्टर ऑफिस कंपाऊंड, लेबर कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपायुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २०-११-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार

राहिली नसल्याने त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १८१०/२००८ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८१०/२००८, दिनांक १४-१०-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख रब्बानी मोहम्मद मुनीरोद्दीन, प्लॉट नं. ३, गुलशन महल, गुलशन मस्जीद जवळ, जुने कलेक्टर ऑफिस कंपाऊंड, लेबर कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८११

निर्णय दिनांक २०-११-२००९

१ श्री. चंद्रकांत नरहरी भांगे, : अपिलार्थी

पंजाब निवास, तहसील रोड, धारुर, तालुका धारुर,

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तालुका कृषि कार्यालय, धारुर, तालुका धारुर,

जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिनांक १६-०४-२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर त्यांना दिनांक ०३-०७-२००८ पर्यंत कोणतीही माहिती दिली नाही किंवा यासंदर्भात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही, म्हणून त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा

अधीक्षक कृषि अधिकारी, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर त्यांनी दिनांक २१-०७-२००८ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी हे तालुका कृषि अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील कृषि अधिकारी हे माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती घेण्याचे सूचित केले. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार केलेले प्रथम अपील जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड या चुकीच्या प्राधिकरणाकडे केले आहे. या प्राधिकरणाकडून अपिलार्थीस दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे तालुका कृषि अधिकारी हे अपिलीय अधिकारी असल्याचे कळविले आहे. परंतु प्रथम अपील अर्ज अपिलार्थीने तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार त्यांनी सरळ आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे अपील करण्यापूर्वी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तालुका कृषि अधिकारी, धारुर यांच्याकडे प्रथम अपील करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी आयोगाकडे सरळ व्दितीय अपील केले आहे. ही त्यांची चूक अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कार्यपध्दतीशी विसंगत असल्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील अवैध ठरत आहे. त्याचबरोबर आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत नरहरी भांगे, पंजाब निवास, तहसील रोड, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१२

निर्णय दिनांक २०-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अजय (भैय्या) ज्ञानेश्वर साळुंके,<br>शिवाजीनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, दिनांक २७-०८-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याची सूचना करुनही अद्यापपावेतो त्यांना माहिती मिळाली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे तुळजापूर शहरासाठी दिनांक ०१-०१-२००८ ते ३१-०५-२००८ या कालावधी-मध्ये शासनामार्फत मंजूर करण्यात आलेल्या केरोसीनबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सुर्यकांत ॲन्ड कंपनीला शासनामार्फत दिनांक ०१-०१-२००८ ते ३१-०५-२००८ या कालावधीमध्ये मिळालेले केरोसीन, सुर्यकांत ॲन्ड कंपनी मार्फत हॉकर्स विक्रेत्यांना केलेल्या केरोसीन वाटपाची माहिती, सदरच्या विक्रेत्याकडून कार्डधारकांना केलेल्या वाटपाचे रजिस्टर व पावतीपुस्तकाच्या सत्यप्रती व शासनाच्या नियमानुसार कार्डधारकांना एक व्यक्ती ४ लिटर, २ व्यक्ती ५ लिटर, ३ व्यक्ती ६ लिटर, ४ व्यक्ती ८ लिटर, ५ व्यक्ती १० लिटर, सहा व्यक्ती ११ लिटर व ७ व्यक्ती १४ लिटर असे वाटप होते का ? - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरुपाची असल्यामुळे त्यांना १५ दिवसांची मुदत मागितली व अपिलार्थीस दिनांक २८-०७-२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु या कालावधीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक २८-०७-२००८ व तदनंतर दिनांक २४-११-२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती अपेक्षिली होती. यापैकी मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी त्यांच्याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात मागणी केलेली माहिती, अधिनियमातील तरतुदीच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार अर्जदाराने माहिती मागितल्यास ती माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांची वैयक्तीक मते अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे हे अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याखेच्या व्याप्तीबाहेरचे आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित ३ मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. यातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०६-२००८ रोजी अर्ज केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे त्यांना तीस दिवसाच्या आत देणे भाग होते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती हस्तगत करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अपिलार्थीचे होते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी स्वतः किती वेळी उपस्थित राहिले याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही अथवा या मुद्दयावर तोंडी स्पष्टीकरण करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या अशाप्रकारच्या उपस्थितीबाबत कोणतीही नोंद उपलब्ध नाही.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिनांक २८-०७-२००८, आणि त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध असलेली माहिती दिनांक २४-११-२००८ रोजी त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती पुरविली आहे. यावरुन अपिलार्थीपासून मुद्दाम होऊन अथवा आवश्यक असलेली माहिती दुष्ट हेतूने जन माहिती अधिकारी यांनी दडविली असल्याचे आणि त्यांना माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केली असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नाही. या उलट त्रयस्थ पक्षाकडे माहितीचा पाठपुरावा करुन त्यांना दिनांक १९-११-२००८ रोजी माहिती प्राप्त होताच त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-११-२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परिणामी अपिलार्थीची संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोग मान्य करत नाही. या प्रकरणी अपिलार्थीस द्यावयाची उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१०-२००८ रोजी त्यांचे व्दितीय अपील नोंदविल्यानंतर दिनांक २४-११-२००८ रोजी पुरविली आहे. परंतु प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही अभिप्राय लेखी स्वरुपात आयोगास अद्यापपावेतो प्राप्त नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती पुरविल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस पूर्ण माहिती मिळाली असल्याने व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अजय (भैय्या) ज्ञानेश्वर साळुंके, शिवाजीनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०६

निर्णय दिनांक : २१.११.२००९

१. श्री.शेवाळे विजयकुमार मल्हारराव, :अपिलार्थी
रा.लोहारा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
डेपो मॅनेजर,
एस.टी. डेपो.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा नियंत्रक,
राज्य परिवहन विभागीय कार्यालय,
विभाग उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : आगार व्यवस्थापक,
राज्य परिवहन महामंडळ, उमरगा आगार,
जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन,उस्मानाबाद.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. अरुण मल्हारराव शेवाळे यांची नेमणूक तारीख व त्या तारखेला मिळणारा एकूण पगार आणि त्यांच्या नेमणूकीबाबतची छायाप्रत, अशी सन १९९९ ते २००० या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या वैयक्तिक अभिलेखाशी संबंधित नसल्यामुळे अधिनियमातील कलम ८(छ) (त्र) नुसार अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दि. २५.११.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस वैयक्तिक माहिती देता येत नाही, असे त्यांना तोंडी अवगत केले व तशी नोंद त्यांच्या कार्यालयाच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. १८.११.२००८ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर घेतली. अशाप्रकारे अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी हा सन १९९९ ते २००० असा दर्शविला आहे. या कालावधीमध्ये त्रयस्थ पक्ष श्री. अरुण शेवाळे हे त्यांच्या कार्यालयाच्या सेवेत रुजू झाले नव्हते. श्री. अरुण शेवाळे यांची एस.टी.मध्ये नेमणूक दि. २२.०५.२००१ मध्ये झाली असून अपिलार्थीने या कालावधीशी संबंधित माहिती मागितल्यास ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात ते अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०९.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन १९९९ ते २००० असा दर्शविला आहे. या कालावधीमध्ये श्री. अरुण शेवाळे हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या सेवेत रुजू झाले नव्हते, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि अपिलार्थीस अद्यापही जर त्रयस्थ पक्षाच्या नेमणूक आदेशाची आणि वेतनाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असेल तर त्यांनी, सन २००१ पासूनच्या पुढील कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळयाने अर्ज करुन मागवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाशी संबंधित जी माहिती हवी आहे, ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार आहे. ही माहिती उघड करण्यास त्रयस्थ पक्षाने हरकत घेतल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून नाकारली गेली आहे. यासंदर्भात स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी, या मुद्यातील वेतनाचा भाग हा अधिनियमातील कलम ४(१)(ख) मधील उपकलम (दहा) प्रमाणे, या माहितीचा प्रकार हा, स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची माहिती म्हणजेच, सार्वजनिक माहिती असा आहे. जर अपिलार्थीने आता कालावधी बदलून जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती स्वतंत्र अर्जान्वये मागितली तर ती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे देणे, हे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य असेल, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीचे नेमणूक पत्र ही देखील सार्वजनिक स्वरुपाची माहिती असल्यामुळे, जरी त्रयस्थ पक्षाने नेमणूक पत्राची प्रत अपिलार्थीस देण्याकरिता हरकत नोंदविली असली तरी, ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्यास ती, परत अपिलार्थीस

देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असणार नाही, याची जन माहिती अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कालावधीशी संबंधित आहे, त्या कालावधीशी संबंधित त्रयस्थ पक्षाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे, मूळात ती अस्तित्त्वात नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.शेवाळे विजयकुमार मल्हारराव, व्दारा- हॉटेल गजराज दरबार, बसवेश्वर चौक, मेन रोड, लोहारा, ता. लोहारा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, उमरगा आगार, ता.उमरगा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०४
निर्णय दिनांकः २१-११-२००९

१. श्री. राजकुमार माधवराव कोरेकर, : अपिलार्थी
रा.मंगरुळ, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तुळजापूर,
जि. उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील त्यांचे प्रतिनिधी श्री. एस.जी. कवडे यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २०.११.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलाच्यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे त्यांची आता कोणतीही तक्रार राहिली नाही. त्यामुळे ते

विचाराधीन द्वितीय अपील क्र. १९०४/०८ हे स्वखुषीने मागे घेत आहेत. या पत्रामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.१९०४/०८, दि.२१.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. राजकुमार माधवराव कोरेकर,रा.मंगरुळ, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर,जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०५
निर्णय दिनांकः २१-११-२००९

१. श्री. हरीभाऊ करबसप्पा कानडे व इतर, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक,भूमी अभिलेख कार्यालय, उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, तुळजापूर,
जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय,
उस्मानाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिशाभूल करणारे आणि समाधानकारक नसलेले उत्तर प्राप्त झाले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद करुन अपिलार्थीस चुकीची माहिती दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करावी आणि अपिलार्थीस विनाशुल्क माहिती देण्याचे आदेशित करावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २९.०३.२००८ रोजी अधीक्षक, भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांना उद्देशून लिहिलेल्या अर्जासंदर्भात, "आम्ही आपल्या कार्यालयास तारीख २९.०३.२००८ रोजी दिलेल्या अर्जाच्या छायांकित प्रत सोबत जोडली आहे. तरी आपणाकडून माझ्या अर्जाबाबत काहीच कळविले नाही. २५ दिवस उलटून गेले तरी कोणतीही चौकशी झालेली नाही तरी त्याबाबत कळविण्याची कृपा करावी",अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागवून त्यांच्या दि. २९.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या अर्जाची प्रत सोबत जोडली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी लेखी युक्तिवाद सादर केला.अपिलार्थीच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादावरुन आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास उद्देशून दि. २९.०३.२००८ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, अशाप्रकारची माहिती हवी होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०७.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम अपील करावे लागले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये, अपिलार्थीच्या दि. २९.०३.२००८ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी केलेली कार्यवाही अपिलार्थीस, या निर्णयाद्वारे अवगत करुन दिलेली आहे व अंतिमतः अपिलार्थीस त्यांच्या दि. २९.०३.२००८ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दि. २१.०५.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.तथापि ही माहिती अपिलार्थीस देत असताना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या अर्जाचा संदर्भ दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अद्यापपावेतो तरी जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागविली आहे, ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २९.०३.२००८ रोजीच्या अर्जाबाबत त्यांच्या कार्यालयाने दि. २५.०४.२००८ पर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. ही माहिती देत असताना अपिलार्थीचा दि. २९.०३.२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी अपिलार्थीने या

अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयावर इतर संबंधित प्राधिकरणांशी दि. २५.०४.२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती व यासंदर्भातील त्यांच्याकडील अभिलेख्यावरील उपलब्ध टिपणीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसात विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस उपसंचालक, भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उपसंचालक, भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरीभाऊ करबसप्पा कानडे व इतर, कासार गल्ली, नवीन कन्या शाळा, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०७
निर्णय दिनांकः २१-११-२००९

१. श्री. पुंडलीक रावसाहेब देशमुख, : अपिलार्थी
मु.पो.पार्डी(म), ता. अर्धापूर, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
श्री गंगामाता केंद्रीय निवासी माध्यमिक
आश्रमशाळा, खडकूत, ता.जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून दि. २८.१०.२००९ रोजी लिहिलेले व आयोगास दि. १९.११.२००९ रोजी प्राप्त झालेले पत्र सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यामुळे विचाराधीन

अपिलाची दि. २१.११.२००९ रोजी ठेवण्यात आलेली सुनावणी रद्द करण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीची विचाराधीन अपिलासंदर्भातील विनंती मान्य करुन, त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.१९०७/०८, दि.११.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पुंडलीकराव रावसाहेब देशमुख, मु.पो. पार्डी (म), ता.अर्धापूर, जि.नांदेड-४३१ ७०४.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गंगामाता केंद्रीय निवासी माध्यमिक आश्रमशाळा, खडकूत, ता.जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, टिळकनगर,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६
निर्णय दिनांक २१/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे,<br>रा.अहमदनगर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकीत्सक,<br>शासकीय रुग्णालय, धुळे. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्यचिकीत्सक व अधिक्षक,<br>सर्वोपचार रुग्णालय, धुळे | | |

**निर्णय**

श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १०.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ११२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी त्यांना अपघात झाल्यामुळे विहीत मुदतीत अपील दाखल करता आले

नसल्याचे कारण नमूद केले आहे. तथापि, दि. २०.०१.२००९ रोजी प्रथम अपील केल्यापासून दि. ०७.०३.२००९ पर्यंत कोणतेही आदेश अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झाले नसतांना त्यापुढील काळात अपील दाखल करणे शक्य असतांना ते दाखल केले नाही. त्यामूळे विहीत मुदतीनंतर प्रदिर्घ विलंबाबाबत दिलेले अपघाताचे कारण आयोगास संयुक्तीक वाटत नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्रीमती. रत्नमाला सुरेश बोरसे, स्मृती हौसिंग सोसायटी, आगरकर मळा, स्टेशनरोड, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७
निर्णय दिनांक २१/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुरळकर नागसेन राजाराम,<br>रा. नाडगांव, ता.बोदवड, जि.जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, रावेर, जि.जळगांव | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती कार्यालय, रावेर, जि.जळगांव | | |

**निर्णय**

श्री. सुरळकर नागसेन राजाराम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १०.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १९.०१.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ८२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. सुरळकर नागसेन राजाराम, मु.पो. नाडगांव (दादानगर), ता. बोदवड, जि.जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४८
निर्णय दिनांक २१/११/२००९

१ श्रीमती. अल्कादेवी लक्ष्मणराव आढाव, : अपिलार्थी
रा. अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.) तथा शिक्षणाधिकारी (वेतन पथक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

श्रीमती. अल्कादेवी लक्ष्मणराव आढाव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २१.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती. अल्कादेवी अल्कादेवी लक्ष्मणराव, पार्वती निवास, लोहार गल्ली, राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५८
निर्णय दिनांक २१/११/२००९

१ श्री. भगवान दिगांबर साळुंके, : अपिलार्थी
रा. चिंचोली, पो. उळूप, ता.भूम,
जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, भूम, जि. उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज प्रकल्प),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

श्री. भगवान दिगांबर साळुंके यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०९.०९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.१२.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. भगवान दिगांबर साळुंके, मु. चिंचोली, पो. उळूप, ता. भूम, जि. उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९११
निर्णय दिनांक २१/११/२००९

१ श्री. महंमद अकबर म.नवाज, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. महंमद अकबर म.नवाज यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १७.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १२.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २८.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. महंमद अकबर म.नवाज, घर नं. ५-१-२६५, नगर गल्ली, नांदेड, ता.जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९१२
निर्णय दिनांक २१/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सतीशकुमार रतनलाल वर्मा,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पोलिस आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>पोलिस आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. सतीशकुमार रतनलाल वर्मा यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५.०७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०७.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १७८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. सतीशकुमार रतनलाल वर्मा, विश्वासनगर, लेबरकॉलनी, फ्लॅट नं. एस.आर.टी. १९, हनुमान मंदिराजवळ, औरंगाबाद ४३१ ००१.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९१३
निर्णय दिनांक २१/११/२००९

१ श्री. बिरादार विजयकुमार गुणवंतराव, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. बिरादार विजयकुमार गुणवंतराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १३.०८.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १२.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १२५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बिरादार विजयकुमार गुणवंतराव, साई मंगल कार्यालयाच्या पूर्वेस, हडको, नांदेड, ता.जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९००

निर्णय दिनांक २१-११-२००९

१ श्री. प्रसाद एकनाथ खिस्ती, : अपिलार्थी

रंगारहट्टी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण,

जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,

तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांची, शेर खाँ यांचे घर ते गफूरभाई यांच्या दुकानापर्यंतच्या रस्त्याबाबतची मागणी, कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पैठण नगरपरिषद क्षेत्रात नगरपरिषदेतर्फे करण्यात आलेल्या ईमलीपार्क

परिसरातील शेर खाँ  यांच्या घरापासून ते गफूरभाई यांच्या दुकानापर्यंत तयार करण्यात आलेल्या सिमेंटच्या रस्त्याच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - रस्त्याचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, टेंडर, वर्क ऑर्डर, चेक नंबर, व दिलेली रक्कम - या मुद्दयांचा समावेश होता.  अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.  तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले.  तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही निर्णय न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातीतील तरतुदीशी सुसंगत आहे.  अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या-कडून  व्यक्तिशः मागितली आहे.  व्यक्तिशः माहितीची मागणी करुन अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी किती वेळा गेले याचा पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही.  तसेच यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आजपर्यंत निश्तिच कोणती कार्यवाही केली हे देखील त्यांच्या अनुपस्थिती-मुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.  त्यामुळे अद्यापपर्यंत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे गृहीत धरण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे  की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली

संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे अपिलार्थीस स्वतः ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करणे भाग आहे. या कालावधीनंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती उपलब्ध असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रसाद एकनाथ खिस्ती, रंगारहट्टी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०१

निर्णय दिनांक २१-११-२००९

१ श्री. दत्ता पंडितराव अडकिणे, : अपिलार्थी
व्दारा- पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थनगर, नांदेड रोड,
वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत सुनावणी न घेतल्यामुळे आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे व त्यांच्याशी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही पत्रव्यवहार न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अतिवृष्टीने झालेल्या घरांच्या व शेतीच्या पिकांच्या नुकसानीचा अंदाज घेण्यासाठी केलेल्या व्हिडीओ चित्रीकरणाच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - छायाचित्रकारास एकूण बील किती पास झाले त्याची साक्षांकीत प्रत, प्रत्येक सज्ज्याच्या तलाठ्याने दिलेल्या छायाचित्रीकरणाच्या कामाच्या दिवसाबाबतचा लेखी अहवाल, कॅमेरामनच्या बिलाची जबाबदारी कृषि अधिका-याची आहे काय, चित्रीकरण करणा-या कॅमेरामनला किती रोज देण्यात आला, कामाचे दिवस व नावांची यादी, चित्रीकरण करणा-या कॅमेरामनचे बील कोणत्या आधारा-वर देण्यात आले, चित्रीकरणाच्या सर्व सी.डी. कॅसेट आपल्या कार्यालयात जमा आहेत काय, एकूण संख्या - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-१०-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य हस्तांतरीत केली

आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक १५-११-२००८ रोजी निर्णय दिला असून त्यांच्या निर्णयानंतर दिनांक ०८-१२-२००८ रोजी त्यांनी अधिकची माहिती अपिलार्थीस परत व्यक्तिशः हस्तांतरीत केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः होऊन ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी किती वेळा उपस्थित राहिले याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच यासंदर्भात तोंडी स्पष्टीकरण करण्यासाठी देखील ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यास ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे व या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणामध्ये अशा प्रकारचे उत्तरदायित्व अपिलार्थीने पार पाडल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही हा त्यांचा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-१०-२००८ व दिनांक ०८-१२-२००८ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ५ व ६ मधील सी.डी .कॅसेटची संख्या या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्पष्टपणे अथवा दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्दयांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडे छायाचित्रीकरणाबाबतचा लेखी अहवाल तलाठयांनी पाठविलेला नाही. तसेच छायाचित्रकारांची

देयके जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या कार्यालयातून परस्पर अदा करण्यात आलेली आहेत. त्याच्या प्रती सध्या जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जर त्यांच्याकडे छायाचित्रीकरणाचा कोणताही अहवाल तलाठयांनी दिला नसेल तर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीस तसे कळवावे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे अपिलार्थीने कॅमेरामनचे बील कोणत्या आधारावर काढण्यात आले अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांनी कॅमेरामनच्या बिलाच्या प्रती जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या कार्यालयातून प्रथमतः प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात व जर जिल्हाधिकारी कार्यालयाने या बिलाच्या प्रती महालेखापाल, नागपूर यांना पाठविल्यामुळे उपलब्ध नसतील तर संबंधित कॅमेरामनची बीले जिल्हाधिका-यांनी अदा केलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कॅशबुकाच्या ज्या प्रतीवर नोंदविण्यात आली आहेत त्या कॅशबुकच्या पृष्ठांच्या प्रती त्यांना अपिलार्थीस देणे भाग आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ च्या मधील, अपिलार्थीने छायाचित्रीकरणाच्या सर्व सी.डी. कॅसेट आपल्या कार्यालयात जमा आहेत काय, या मुद्दयावर अपिलार्थीस माहिती देय नाही. कारण वर नमूद केल्याप्रमाणे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीने ज्या प्रकारे माहिती मागितली आहे त्या प्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. या मुद्दयातील 'सी.डी. कॅसेटची एकूण संख्या' ही माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, त्यांच्याकडे एकूण ४२ सीडीज, दोन व्हिडीओ कॅसेट जमा आहेत व ही माहिती ते अपिलार्थीस आयोगाने आदेश केल्याप्रमाणे देतील. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तीन आठवड्यांचा कालावधी लागेल, असे

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी संबंधित वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, मुद्दा क्रमांक ५ व मुद्दा क्रमांक ६ मधील सी.डी. कॅसेटची एकूण संख्या या मुद्दयावरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ५ व मुद्दा क्रमांक ६ मधील सी.डी. कॅसेटची संख्या ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्ता पंडितराव अडकिणे, व्दारा- पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थनगर, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वसमत, तालुका

वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०२

निर्णय दिनांक २१-११-२००९

१ श्री. किरण शंकरराव कांबळे (पत्रकार), : अपिलार्थी
व्दारा- आर. सी. थोरात, बँक अधिकारी यांचे घर,
वैभवनगर, तरोडा (बु.), नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा परिषद, प्राथमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद, प्राथमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेल्या शाळांना खेळणी साहित्य

खरेदीसाठी किती निधी देण्यात आला, प्रत्येक शाळेला किती निधी दिला, किती शाळांनी दर्जेदार खेळणी साहित्य खरेदी केले, त्या सर्व जिल्ह्यातील सर्व शाळांचे नांव व गाव, आणि शाळेच्या मुख्याध्यापकाचे नांव अशी सन २००७ ते २००८ या कालावधीशी संबधित माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, नांदेड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागामध्ये शासनाकडून शाळांना खेळणी पुरविण्यासाठी प्राप्त झालेल्या अनुदानाप्रमाणे या जिल्ह्यातील अनेक शाळांनी प्रत्यक्षात खेळणी खरेदी न करता बोगस बीले करुन शासनाच्या निधीचा गैरवापर केलेला आहे, जिल्ह्यातील एकत्रित संपूर्ण माहिती आणि शिक्षण विभागातील आम भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस. जी. चेडू, अधीक्षक हे हजर आहेत. त्यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. अपिलार्थीने मागणी

केलेली माहिती ज्या संचिकेत उपलब्ध आहे ती संचिका त्यांना उपलब्ध न होऊ शकल्यामुळे त्यांनी बरोबर कोणतीही कागदपत्रे आणली नाहीत असे आयोगास स्पष्टीकरण दिले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार असल्याने त्यांना ती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय आहे. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. पाटील, सध्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड या पदावर कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड (श्री. ए. एम. खान सध्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड सध्या हिंगोली जिल्हा परिषद येथे कार्यरत) यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देता त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई व कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. आज देखील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची नस्ती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत करुन दिले आहे. वास्तविक पाहता अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक २४ जुलै २००८ रोजी केलेला आहे आणि त्यांनी मागणी केलेली माहिती ही सन २००७-२००८ या कालावधीतील आहे, म्हणजेच ती जानेवारी २००८ ते २४ जुलै २००८ या कालावधीशी संबंधित आहे. हा कालावधी अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करण्याच्या कालावधीशी नजिकचाच आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत हे म्हणणे आयोगास संशयास्पद वाटते व त्यांच्या अशा प्रकारच्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेल्या त्यांच्या आक्षेपांना बळकटी प्राप्त होत आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून वितरीत होणाऱ्या निधीशी संबंधित असल्यामुळे आता

कोणत्याही परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना ही माहिती, आवश्यक वाटल्यास, ती दुस-या स्त्रोताकडून घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे त्यांना अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पाटील तत्कालीन उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड (सध्या शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद नांदेड या पदावर कार्यरत) यांनी अपिलार्थीस, कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय, त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून असद्‌हेतुने वंचित ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमा-तील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न दिल्याने ते अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीन्वये अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पाटील, (तत्कालीन उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड, सध्या शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद नांदेड या पदावार कार्यरत) यांना उपरोक्त प्रकरणी एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किरण शंकरराव कांबळे (पत्रकार), व्दारा- आर. सी. थोरात, बँक अधिकारी यांचे घर, वैभवनगर, तरोडा (बु.), नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. पाटील, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड (सध्या शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद नांदेड या पदावर कार्यरत) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०३

निर्णय दिनांक २१-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. राजकुमार माधव कोरेकर,<br>मु. पो. मंगरुळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>उस्मानाबाद पाटबंधारे विभाग, उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र प्राधिकरण, बीड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अर्धवट माहिती दिल्याबद्दल आणि त्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील तुळजापूर तालुक्यामध्ये सन २००७-०८ या कालावधी-मध्ये झालेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - सन २००७-०८ या कालावधीतील झालेल्या कामाचे प्रकार, काम झालेल्या गावाचे नांव, निविदेची तलावनिहाय यादी, पूर्ण व अपूर्ण कामाची संख्या, या कालावधीमध्ये किती व कुठल्या कॅनालमधील गाळ काढला आहे, लावलेल्या झाडांची संख्या, मोजमाप पुस्तकाची झेरॉक्स - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त झाली असावी असे अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या, त्यांनी अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र प्राधिकरण, बीड यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावरुन दिसून येते. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व अर्धवट माहिती दिल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतेही आदेश पारीत केल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केल्याचे आढळून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अर्धवट माहिती विलंबाने दिल्याबद्दल आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्याचे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांना कधी प्राप्त झाली व प्राप्त झालेली माहिती ही कशा प्रकारे चुकीची आणि अर्धवट आहे याचा कोणताही खुलासा, त्यांनी विचाराधीन अपील अर्जासोबत जोडलेल्या कागपत्रामध्ये केलेला नाही. अपिलार्थीने आयोगाकडे फक्त त्यांचा

व्दितीय अपील अर्ज व त्यासोबत माहितीसाठीचा प्रथम अर्ज आणि त्यावर त्यांनी दिनांक २६-०९-२००८ रोजी अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र प्राधिकरण, बीड यांना दिलेल्या प्रथम अपील अर्जाची प्रत एवढ्याच कागदपत्राच्या प्रती पुरविल्या आहेत. तसेच अशा प्रकारचा युक्तिवाद करण्यासाठी ते स्वत: अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. त्यामुळे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजकुमार माधव कोरेकर, मु. पो. मंगरुळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र प्राधिकरण, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९१४
निर्णय दिनांकः २३-११-२००९

१. श्री. महादेव भिमराव केंद्रे, : अपिलार्थी
 रा.भोजनकवाडी, ता.परळी, जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
 कृषि कार्यालय, परळी वैजनाथ,
 जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी,
 उपविभागीय कृषि कार्यालय, अंबाजोगाई,जि.बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
परळी वैजनाथ,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी,
परळी वैजनाथ,जि.बीड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०५.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे परळी तालुक्यातील त्यांच्या विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामांच्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - शेत तलाव, कंट्रोल बल्डींग, साईट नाला बल्डींग, सिसिटी या सर्व कामाचे सन २००७-२००८ मधील लेबर रिपोर्ट, लेबरधारकांच्या कामाची यादी व मंजूर झालेल्या कामाच्या अहवालाची प्रत तसेच कामाचे मस्टर, बील उचललेली रक्कम, थकित राहिलेल्या कामाची माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास प्रतिसाद म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २९.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे मंडळ कृषि अधिकारी, परळी-१, परळी-२ आणि शिरसाळा यांना अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून, या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील उपविभागीय कृषि अधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे केले होते. त्यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी, परळी वैजनाथ यांच्याकडे दि. ०७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर तालुका कृषि अधिकाऱ्याने कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे सकारात्मक प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील दि. २६.११.२००८ रोजी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही पुरविली नसल्याचे आयोगासमोर कबूल केले व पुढे असे स्पष्टीकरण केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असते. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती मिळवून देण्याकरिता त्यांनी वेळोवेळी मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे स्मरणपत्रे पाठवून देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती सादर न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. त्यांनी संबंधित सहायकांना अपिलार्थीस माहिती मिळवून देण्याकरिता स्मरणपत्रे कधी पाठविली, याची आयोगाने विचारणा केली असता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि. १३.०६.२००८, ३०.०६.२००८, २१.०७.२००८, १४.०८.२००८ व ०१.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात पाठपुरावा केला असल्याचे आयोगास सांगितले व यासंदर्भात आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला. संबंधित कर्मचाऱ्यांची नावे विचारली असता, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील (१) श्री. आर. के. घोलवे,मंडळ कृषि अधिकारी, परळी-१, (२) श्री. बी.डी. संपते,मंडळ कृषि अधिकारी,परळी-२, (३) श्री. ए.ए. सोनवणे,मंडळ कृषि अधिकारी,सिरसाळा, (४) श्री. एस.जी. पारधी,लेखा-२,तालुका कृषि कार्यालय,परळी वै.(५) श्री. के.एन. जोगदंड, तांत्रिक शाखा, तालुका कृषि कार्यालय,परळी वै. व (६) कुमारी के.एल. फड, एन.एच.एम.क्षेत्र सल्लागार हे कर्मचारी आहेत, असे आयोगास स्पष्ट केले.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस आता तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देऊ शकतील, असेही त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या शेवटी आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की,अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देणे हे त्यांचे कर्तव्य होते. तथापि या प्रकरणी कृषि विभागाच्या तालुका स्तरीय कार्यालयाची कार्यपध्दती लक्षात घेता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील संबंधित मंडळ कृषि अधिकारी आणि इतर कर्मचाऱ्याकडून ही माहिती प्रथम खात्री करुन नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागेल. त्याप्रमाणे त्यांनी दि. २९.०५.२००८ रोजी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे कार्यवाही केली आणि तदनंतर दि. १३.०६.२००८ ते दि. ०१.०९.२००८ या कालावधीमध्ये ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता संबंधितांच्याकडे पाच वेळा स्मरणपत्राद्वारे पाठपुरावा केला. परंतु अपिलार्थीस अपेक्षित माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध न करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी या प्रकरणाशी संबंधित ज्या सहायकांची नावे सांगितली आहेत ते, त्यांचे सर्व सहायक अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जबाबदार आहेत, असे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी त्यांच्या या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी व त्यांचे वर नमूद केलेले या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायकांना एकत्रित एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त

न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी यांचे सहायक जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक ((१) श्री. आर. के. घोलवे,मंडळ कृषि अधिकारी, परळी-१, (२) श्री. बी.डी. संपते,मंडळ कृषि अधिकारी,परळी-२, (३) श्री. ए.ए. सोनवणे,मंडळ कृषि अधिकारी,सिरसाळा, (४) श्री. एस.जी. पारधी,लेखा-२,तालुका कृषि कार्यालय,परळी वै.(५) श्री. के.एन. जोगदंड, तांत्रिक शाखा, तालुका कृषि कार्यालय,परळी वै. व (६) कुमारी के.एल. फड, एन.एच.एम.क्षेत्र सल्लागार) या सर्वांना एकत्रित एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक: २३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. महादेव भिमराव केंद्रे,रा.भोजनकवाडी, ता.परळी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,परळी वैजनाथ,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८४
निर्णय दिनांक २३/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोतीराम गयबू काळे,<br>रा. जानापुरी, पो. वेडपुरी,ता.लोहा, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, लोहा, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मोतीराम गयबू काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २०.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २५.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०७.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक २५.०८.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करुन, दि.३०.०८.२००८ पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ५६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, भाजपा किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष, मु. जानापुरी, पो. वेडपूरी एस.आर.टी, ता.लोहा, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५
निर्णय दिनांक २३/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मोतीराम गयबू काळे,<br>रा. जानापुरी, पो. वेडपुरी,ता.लोहा, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कंधार,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>कंधार, जि.नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मोतीराम गयबू काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २०.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १६.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०७.०८.२००८ रोजी पारित करुन, अनुदान उपलब्ध होताच अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ७४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, भाजपा किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष, मु. जानापुरी, पो. वेडपूरी एस.आर.टी, ता.लोहा, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८६
निर्णय दिनांक २३/११/२००९

१ श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वेडपुरी,ता.लोहा, जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**<u>निर्णय</u>**

श्री. मोतीराम गयबू काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २०.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १३.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, भाजपा किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष, मु. जानापुरी, पो. वेडपूरी एस.आर.टी, ता.लोहा, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८७
निर्णय दिनांक २३/११/२००९

१ श्री. दिलीपकुमार हिराचंद जैन, : अपिलार्थी
रा.जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.म., जळगांव भाग,
जळगांव

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.म., ओ व एम
सर्कल, जळगांव.

**निर्णय**

श्री. दिलीपकुमार हिराचंद जैन यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २३.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २८.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपकुमार हिराचंद जैन, १०८, भवानी पेठ, जळगांव, ता.जि. जळगांव.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६२
निर्णय दिनांक २३/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुनिल विठ्ठल चाबुकस्वार,<br>रा. पिंपळवाडी (पि.), ता.पैठण, जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>सर विश्वेश्वरैया अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २४.०१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, सर विश्वेश्वरैया अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २९.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत व अपिलार्थी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०६२ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनील विठ्ठल चाबुकस्वार, मु.पो. पिंपळवाडी (पि.), ता.पैठण, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, सर विश्वेश्वरैया अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी, आनंद प्लाझा, अमरप्रीत हॉटेल, सिग्नलजवळ, जालना रोड, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६३
निर्णय दिनांक २३/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गौतम मष्णाजी भोसले,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>महानगरपालिका आयुक्त कार्यालय,<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>पाणी पुरवठा व जल निःसारण विभाग,<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. गौतम मष्णाजी भोसले यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०४.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १५.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०५.०६.२००८ रोजी पारित करुन, सात दिवसामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सुचित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १०५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गौतम मष्णाजी भोसले, सीटू कामगार संघटना, नांदेड जिल्हा, एन.डी. ४२, जे. २-१८-३, सिडको, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६४
निर्णय दिनांक २३/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सूर्यभान मल्हारी कोळनुरे व इतर,<br>रा.उमरगा, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उमरगा,<br>जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

श्री. सूर्यभान मल्हारी कोळनुरे, श्री. आण्णाराव लक्ष्मण भोसले व श्री. राजशेखर धुळप्पा भोसगे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीनी दि. ११.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीनी प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सूर्यभान मल्हारी कोळनुरे व इतर, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उमरगा, ता.उमरगा, जि. उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९१८

निर्णय दिनांक २३-११-२००९

१ श्री. जिवन पुंडलिकराव कोटरंगे, : अपिलार्थी

मु. पो. उमरी (बा), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, मांडवी,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहायक वन संरक्षक (जंकासस), किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रासंबंधीत सन २००७-०८ या कालावधीतील चालू व पूर्ण झालेल्या एलबीएस व सीसीटी कामांची मंजूर रक्कम, धान्य, कामावर झालेला खर्च व मजुरांची

यादी, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जास्तीची माहिती सात दिवसात देण्यासाठी वनक्षेत्रपाल, मांडवी तथा जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व विशेषतः जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १९-०९-२००८ रोजी प्राप्त झालेली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण आहे त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. परंतु अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी व्दितीय अपील नोंदविल्यानंतर आज रोजी होत असलेल्या सुनावणीच्या दिनांकापर्यंत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे हे आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे तसेच

संबंधित कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि आज रोजी सुनावणीस अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर, माहिती दिली गेली असावी असे अनुमान काढण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असली तरी या प्रकरणी एक बाब अशी लक्षात येते की, अपिलार्थीच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जरी प्रथम प्रतिसाद दिला असला तरी, अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरवून त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सहायक वन संरक्षक (जंकासस), किनवट, जिल्हा नांदेड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सहायक वन संरक्षक (जंकासस), किनवट, जिल्हा नांदेड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जिवन पुंडलिकराव कोटरंगे, मु. पो. उमरी (बा), तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, मांडवी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (जंकासस), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२०

निर्णय दिनांक २३-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार,<br>मुख्य संपादक, महाराष्ट्र दर्पण,<br>राघवेंद्र अपार्टमेंट, दयानंदनगर, व्हीआयपी रोड, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), वन विभाग, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक वन संरक्षक (तेंदू), नांदेड वन विभाग, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी जाणुनबुजून टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील जानेवारी २००५ ते मार्च २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वन परिक्षेत्र

अधिकारी यांच्या कार्यालयास जानेवारी २००५ ते मार्च २००८ या कालावधीत प्राप्त झालेला एकूण निधी, तो निधी कोणकोणत्या योजनेवर व कामावर खर्च करण्यात आला याचे लेखी विवरण, यामध्ये भरण्यात आलेल्या मस्टर्सच्या सत्यप्रती, कोणकोणती कामे कोठे झाली, कामे कोणी केली, कामावर देखरेख करणा-या कर्मचारी अधिकारी यांची नांवे, मजुरांची नांवे आणि पत्ते व त्यांना देण्यात आलेल्या मजुरीच्या खात्रीलायक सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४०,३१० इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. परंतु अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे न भरता, ते जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यास तयार करण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करण्याकरिता दिनांक व वेळ उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली. यानंतर दिनांक १९-०७-२००८ रोजी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले व त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली. तथापि माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस सत्यप्रती देण्यात येतील असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यानंतर त्यांनी माहितीच्या सत्यप्रती पाहिजे असे सांगून ते तेथून निघून गेले व त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४०३१० हे अवाजवी असल्याने त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून पुरविण्यात येणा-या माहितीचा तपशील हवा आहे व हा तपशील प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून त्यांना कोणतीही दाद दिली गेली नाही व त्यांच्याशी कोणीही न बोलल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असून त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथमतः योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले होते. तथापि या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे भरण्याची कधीही तयारी दर्शविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९-०८-२००८ रोजीच्या दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. अपिलार्थीने आज केलेल्या युक्तिवादामध्ये म्हटल्याप्रमाणे ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा गेले, त्यांना खरोखरच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधितांनी माहिती देण्याचे नाकारले किंवा कसे हे आता आयोगास कोणत्याही सबळ पुराव्याअभावी समजून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे व ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत, हे पाहता, अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेली माहिती कार्यालयीन दिवशी पूर्वनियेजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन तपासावी व त्यातील त्यांना आवश्यक असणा-या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीच्या त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती आवश्यकतेप्रमाणे अपिलार्थीस सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार, मुख्य संपादक, महाराष्ट्र दर्पण, राघवेंद्र अपार्टमेंट, दयानंदनगर, व्हीआयपी रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), वन विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (तेंदू), नांदेड वन विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२१

निर्णय दिनांक २३-११-२००९

१ श्री. रुपेश बालुआप्पा मापारी, : अपिलार्थी
व्दारा- एस. एस. कातारे, 'माऊली' बिल्डींग, गणपती
मंदिरामागे, भाग्यनगर, जुना जालना,
तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता
(बांधकाम विभाग), जिल्हा परिषद, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,
जि.प. हिंगोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ आरेखक या पदाकरिता दिनांक २२-०६-२००८ रोजी घेतल्या गेलेल्या सर्व उमेदवारांचे लेखी परीक्षेतील नांवासहीत प्राप्त गुण, दिनांक ३०-०६-२००८ रोजी झालेल्या तोंडी मुलाखतीतील उमेदवारांचे नाव, आसन क्रमांक, प्राप्त गुण, मुलाखतीस उपस्थित पाच उमेदवारांच्या लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकीत प्रती, कनिष्ठ आरेखक या पदाला लागणारी शैक्षणिक अर्हता आणि त्यासंबंधी असलेला शासन निर्णय, नियुक्त उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व विशेष प्राधान्य दिले असल्यास त्याबाबत विहित अर्हतेबाबत छायांकीत प्रती, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही आणि त्यांच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही व या माहितीशी त्यांचा प्रत्यक्षतः संबंध असल्यामुळे त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता सोबत आणली असून त्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या उत्तरपत्रिका हा भाग वगळून उर्वरित माहिती समाविष्ट आहे व ती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही स्पष्ट केले की, अपिलार्थीने जरी त्यांच्या प्रथम अर्जामध्ये दिनांक ११-०८-२००८ असा दिनांक दर्शविला असला तरी हा अर्ज त्यांच्याकडे दिनांक २०-०८-२००८ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा हा अर्ज हिंगोली जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी पाठविला. यानंतर जिल्हा परिषदेने दिनांक २२-१०-२००८ रोजी अपिलार्थीस ग्रामविकास विभागाच्या दिनांक २३-०६-२००६ रोजीच्या निर्णयाप्रमाणे त्यांच्या उत्तरपत्रिकेची एक प्रत रुपये २०० इतक्या शुल्काची आकारणी करुन देऊ केली व अपिलार्थीशिवाय इतर उमेदवारांशी संबंधित मुद्दयावर माहिती देण्याचे नाकारले. या पत्राव्दारे अपिलार्थीस उर्वरित मुद्दयावरील उत्तरपत्रिकेच्या प्रती शिवाय सर्व माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०८-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक २०-०८-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुलाखतीस उपस्थित असलेल्या पात्र उमेदवारांच्या लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकीत प्रती या मुद्दयावरील माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीने कनिष्ठ आरेखक पदाकरिता लागणारी शैक्षणिक अर्हता व संबंधित शासन निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जिल्हा परिषदेकडील कनिष्ठ आरेखक या पदासाठी भरतीच्या परिपत्रकाची अथवा सेवानियमाची प्रत दिल्यास अपिलार्थीस या

मुद्दयावरील माहिती प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील नियुक्त उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हता नाकारण्याचे जिल्हा परिषदेचे पत्र चुकीचे आहे. निवड केलेल्या उमेदवाराची शैक्षणिक अर्हता ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना उघड करावी लागेल. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, या माहितीमध्ये कनिष्ठ आरेखक या पदासाठी सेवानियमाची आणि उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी सर्व कागदपत्रे त्यांनी अपिलार्थीस देऊ केली आहेत. अपिलार्थीस देऊ करण्यात आलेल्या माहितीमध्ये त्यांना लेखी परीक्षेतील गुण, तोंडी प्राप्त गुणांची प्रत देखील अपिलार्थीस द्यावी लागणार आहे, हे पाहता अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती ही माहिती वगळून उर्वरित सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील इतर पाच उमेदवारांच्या उत्तरपत्रिका हा भाग वगळता, उर्वरित मुद्दयांवरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रुपेश बालुआप्पा मापारी, व्दारा- एस. एस. कातारे, "माऊली बिल्डींग", गणपती मंदिरामागे, भाग्यनगर, जुना जालना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२२

निर्णय दिनांक २३-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पद्माकर सदाशिवसा विष्णू,<br>गवळी मोहल्ला,<br>जुना जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाची संचिका क्रमांक एस. की. एस. आर./५/७८, दिनांक १४-०२-१९७८ औरंगाबाद येथील दिनांक १२-१२-१९७७ च्या आदेशान्वये छबुसा सोनुसा विष्णू

यांचे अपील नामंजूर करण्यात आले आहे या संचिकेच्या पृष्ठ ०१ ते ४४ व आलेखाच्या नकला आलेख क्रमांक ७० चालान नं. ३७८/३७९/३८० ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन संबंधित संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१०-२००८ रोजी निणय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले आणि अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर-ही अपिलार्थीस ही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही पूर्वीच्या कालावधीशी संबंधित असून अपिलार्थीने मागणी केलेल्या कालावधीमध्ये जालना जिल्हा अस्तित्वात नव्हता, जालना जिल्हा १९८२ साली अस्तित्वात आला, त्यावेळी अभिलेखे जालना जिल्ह्याकडे हस्तांतरीत करण्यात आले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जुनी असल्यामुळे व या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांच्याकडे आता उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ही माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे नष्ट केली आहे किंवा कसे याबाबत आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, अशा प्रकारचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे पुरविणे भाग आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती उपलब्ध होण्यासाठी त्यांना सहाय्य करण्याच्या दृष्टीने प्रथम सादर कराव्यात. तदनंतर अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या औरंगाबाद येथील जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख या कार्यालयात उपलब्ध असल्यास त्याचा प्रथम शोध घ्यावा व ती माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जर ते उपलब्ध करुन देऊन शकले नाहीत तर सदरचे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर, आवश्यकता वाटल्यास, फौजदारी कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पद्माकर सदाशिवसा विष्णू, गवळी मोहल्ला, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११७/०८

निर्णय दिनांक २३.११.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती मनकर्णा बालाजी चव्हाण,<br>रा. भोसी, ता. जिंतूर, जि. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>जिंतुर, जि. परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सेलू , जि. परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना अद्यापपावेतो तहसीलदार जिंतूर यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळुन येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती सुशिला रामभाऊ जवादे राहणार वडाळी यांच्या सन १९९२ च्या जात प्रमाणपत्राची नोंद तहसीलदार जिंतुर येथे आहे किंवा नाही अशी माहिती व्यक्तिशः मागितली. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक

२०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका शोधण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले व त्यांचा प्रथम माहितीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सुचित केले. यानंतर जन माहिती अधिकारीने त्रयस्थ पक्ष यांचे जात प्रमाणपत्र नेऊन ते अपिलार्थीस देऊ केले असता अपिलार्थीने हे जात प्रमाणपत्र घेण्याचे नाकारले आणि या जात प्रमाणपत्राची नोंद त्यांच्याकडे असल्यासंदर्भातील पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला. परंतु जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्रयस्थ पक्षाचे जात प्रमाणपत्राचे नोंद रजिस्टर गहाळ झाली असल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष या दोघींनी एकाच वेळी अंगणवाडी सेविका या पदावर मुलाखत दिली असता श्रीमती सुशिला रामभाऊ जवादे यांची या मुलाखतीत निवड झाली होती. अपिलार्थीची अंगणवाडी सेविका या पदावर निवड होऊ न शकल्यामुळे त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली. त्रयस्थ पक्षाचे जात प्रमाणपत्र दिल्याची नोंद त्यांच्याकडील ज्या रजिस्टरमध्ये उपलब्ध होती ते रजिस्टर आता गहाळ झाले असल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकणार नाहीत. परंतु त्रयस्थ पक्षाच्या जात प्रमाणपत्रासंदर्भात ते परत चौकशी करुन

त्रयस्थ पक्ष श्रीमती सुशिला रामभाऊ जवादे यांचे जात प्रमाणपत्राच्या प्रकरणी पुन्हा नव्याने शोध सुरु करतील तसेच या पुढे त्रयस्थ पक्षाने दाखल केलेल्या जात प्रमाणपत्राची प्रत वैधता तपासणीसाठी दाखल केली जाईल, असे त्यांनी आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याप्तीमध्ये येत नसली तरी, व्यापक जनहित साध्य करण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये आयोगास आश्वासित केल्याप्रमाणे कार्यवाही केल्यास त्रयस्थ पक्षाने नोकरी मिळवितांना सादर केलेले प्रमाणपत्र वैध आहे किंवा कसे, याचा निर्णय होऊन अपिलार्थीचा माहिती मागण्याचा मूळ उद्देश सफल होईल, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या रजिस्टरमध्ये उपलब्ध होती, त्या रजिस्टरचा जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा नव्याने शोध घेऊन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत या रजिस्टरची छायांकित प्रत अपिलार्थीस विनामूल्य पूरवावी व जर या कालावधीमध्ये हे रजिस्टर त्यांच्याकडे उपलब्ध झाले नाही तर हे रजिस्टर जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी याच कालावधीमध्ये फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती मनकर्णा बालाजी चव्हाण, रा. भेसी ता. जिंतूर, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जिंतुर जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलु. जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१५/०८

निर्णय दिनांक २३-११-२००९

१ श्री. आबासाहेब विठ्ठलराव आब्दागिरे, (मयत) : अपिलार्थी
रा. जवळा (फकिर), ता. धारुर, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, धारुर, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमुद केले आहे की, त्यांनी ग्रामपंचायत जवळा (फकिर) येथील चालू कामाची माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित अपिलार्थी हे दिनांक ११.०४.२००९ रोजी मयत झाले आहेत व ग्रामसेवक यांनी त्या नात्याने तसे

मृत्यु प्रमाणपत्र आयोगाकडे सादर केले आहे. ही वस्तुस्थिती पाहता मूळ अर्जदार आता हयात नसल्यामुळे अपीलार्थीचे विचाराधीन अपील तथ्यहीन होत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १९१५/०८, दिनांक २६.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ मयत श्री. आबासाहेब विठ्ठलराव आब्दागिरे, यांचे वारसदार, रा. जवळा (फकिर), ता. धारुर, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१६/०८

निर्णय दिनांक २३.११.२००९

१ श्री. पंडीत सोपानराव टोमके, : अपिलार्थी
रा. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे
क्रमांक २, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधिक्षक अभियंता तथा प्रशासक लाभक्षेत्र विकास
प्राधिकरण, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. आणि या अर्जाद्वारे संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी अशी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने या अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिंगनापूर, बोखंड, ताडपांगरी, धसाडी, माळसोन्ना, सुरपिंप्री, पोखर्णी, येथील

चालू असलेल्या व पुर्ण झालेल्या कामाची काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाचे आदेश, शेडुल्ड बी, मोजमाप पुस्तिका, अंदाजपत्रक, व संपूर्ण नकाशाच्या नकला - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपिलार्थीस पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने त्यानी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. व तदनंतर या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी निर्णय दिला व अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १९.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली होती. तथापि अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सुचित केले. यानंतर त्यांच्या कार्यालयाच्या शिपायामार्फत दिनांक २३.१०.२००८ रोजी त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली असता अपिलार्थीने ही माहिती घेण्यासाठी नकार दिला व तदनंतर आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले.

जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये असेही आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची होती व ती त्यांच्या ७ उपविभागीय कार्यालयाकडून गोळा करुन अपिलार्थीस देण्याकरिता त्यांना वेळ लागला होता. अपिलार्थीने दिनांक १०.०७.२००८ रोजी माहितीसाठीचा प्रथम अर्ज करुनही, त्यामध्ये व्यक्तिशः माहिती अपेक्षित करुनही ते ही माहिती घेण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात

व्यक्तिशः उपस्थित राहिलेले नाही. आज देखिल अपिलार्थीने मागणी केलेली माहिती-( ३३६ पृष्ठ) त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थी त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिल्यास ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर अर्जदाराने व्यक्तिशः अपेक्षिली असली तर माहितीसाठीचा एकदा अर्ज केल्यानंतर या अर्जासंदर्भात पूढील सर्व घडामोडीची माहिती व मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकरी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करावी. जन माहिती अधिकरी यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे पुर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते या प्रकरणी अर्जदाराने अशा प्रकारे त्यांचे उत्तदायित्व पार पाडले असल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी ते आज आयोगासमोर उपस्थित नाही. या प्रकरणी अपिलार्थीचे त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठीचे वर्तन विसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नेऊन दिली असता प्रथम त्यांनी ही माहिती घेण्याचे नाकारले आणि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी दिलेल्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुन्हा माहिती देऊ केली असता जन माहिती अधिकारी यांच्या रजिस्टरवर ही माहिती अपूर्ण असल्याचे कारणे दर्शवून अपिलार्थीने या माहितीचा स्विकार केला नाही आणि आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या रजिस्टरवरील अभिप्रायामध्ये त्यांना कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही आणि त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांने देऊ केलेली माहिती अपूर्ण आहे, असे का वाटते, यासंबंधी कोणतेही लेखी विवेचन त्यांच्या कोणत्याही कागदपत्रावरुन केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देऊ केली असता, ही माहिती न वाचता माहिती

अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती न स्विकारण्याची कृती ही अपिलार्थीच्या मूळ अर्जात केलेल्या विनंतीशी पूर्णपणे विसंगत आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकाऱ्याने कोणत्याही टप्प्यावर नाकारले नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पंडीत सोपानराव टोमळे, रा. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे क्रमांक २, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता तथा प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२४

निर्णय दिनांक : २४.११.२००९

१. श्री. अशोक मोतीराव काकडे, :अपिलार्थी
रा. साबला, ता.केज, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जि. बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज,
जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिशाभूल करणारी,अर्धवट व चुकीची दिली गेल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०४.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे केज तालुक्यातील कानडी पाटील ते साबळा या रस्त्याच्या कामासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ०८.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर, अधीक्षक अभियंता हे जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी दि. ०६.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस उर्वरित माहिती पंधरा दिवसांत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर अपिलार्थीस दि. १५.०६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी दिल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. ०७.०४.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. ०७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दि. ०९.०५.२००८ रोजी विनामूल्य माहिती पुरविली व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०६.०६.२००८ रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १५.०६.२००८ रोजी उर्वरित माहिती विनामूल्य पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी किती वेळा गेले होते, यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती त्यांना अपुरी व चुकीची का वाटते याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाही व या मुद्यावर त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट व चुकीची माहिती मिळाली आहे, हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचा अपिलार्थीचा मुद्दा, या प्रकरणी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०९.०५.२००८ व १५.०७.२००८ अशा दोन टप्प्यामध्ये माहिती दिली असल्याने, सिध्द होत आहे. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रथम अपूर्ण माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे व त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कता बाळगून अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांकः २४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक मोतीराव काकडे,रा. साबळा, पो. लव्हुरी, ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१९

निर्णय दिनांक : २४.११.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मधुकर महादेव बागडे,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्रयस्थ पक्ष श्रीमती वैशाली मधुकर बागडे सहशिक्षिका, ओम प्राथमिक शाळा, एन -६ सिडको, औरंगाबाद यांचे ऑगस्ट १९९६ ते सप्टेंबर १९९८ या कालावधीत सेवासातत्य देऊन पगार काढण्याबाबत या विषयावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे आदेश क्रमांक /शिक्षण/प्रा.वि.३/१२१५/५०४३ मध्ये श्रीमती एस.आर. सुतार, श्रीमती के.डी. वाघमारे, श्रीमती एस. आर. गायकवाड, श्रीमती शेख शबाम, श्री. अवस्थी इत्यादी शिक्षकांचे खंड क्षमापित करण्याबाबतचे प्रकरण विनय मराठी प्रा.शा.संजयनगरच्या पध्दतीने कार्यवाही व्हावी.

या संदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन

माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्याद्वारे शिक्षकांच्या सेवासातत्याबाबत ऑगस्ट १९९६ ते सप्टेंबर १९९८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये - श्रीमती वैशाली मधुकर बागडे यांच्या सेवासातत्याची प्रत, श्री प्रदिप राठोड यांनी श्रीमती वैशाली मधुकर बागडे यांची ऑगस्ट १९९६ ते सप्टेंबर खंड क्षमापित करणेविषयी लिहिलेल्या टिपणीची प्रत व शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे आदेश जा.क्र. जि.प.औ. /शिक्षण/प्रा.वि. - ३/१२१५/५०४३/ २००५ ची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८.०७.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती सशूल्क देऊ केली. त्याप्रमाणे अपिलार्थीने ही माहिती दिनांक २०.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत केली. तथापि या पूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पुरविली गेली असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील दिनांक २२.०९.२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे खारीज केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, अपिलार्थीस त्यांची मुलगी श्रीमती वैशाली बागडे यांच्या सेवासातत्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून आदेश प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत, असे दिसून येते. या मुद्यासंदर्भात आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित असलेले शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, अपिलार्थीस त्यांनी

दिनांक २०.०९.२००८ रोजी व्यक्तिशः माहिती हस्तांतरीत केली असून अपिलार्थीने दिनांक २९.१०.२००९ रोजी त्यांना उद्देशून एक पत्र लिहिले असून या प्रकरणी त्यांची मुलगी श्रीमती वैशाली मधूकर बागडे यांनी ऑगस्ट १९९६ ते सप्टेंबर १९९८ या दोन वर्षाच्या कालावधीतील सेवासातत्य शिक्षणाधिकारी यांनी दिले असल्यामुळे त्यांची कोणतीही तक्रार शिल्लक राहिली नसल्याचे नमूद केले आहे व त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्याची या पत्रामध्ये अखेरीस विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी यांच्या युक्तिवादाचे अथवा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि. २०.०९.२००८ रोजी प्राप्त झाली आहे, तसेच अपिलार्थीने ज्या उद्देशाकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती, तो अपिलार्थीचा उद्देश देखील आता सफल झाला असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास उरलेले नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर मा. बागडे, रा. प्लॉट नं. ३१, सुजाता हौसींग सोसायटी, हर्सुल, मयुर पार्क रोड, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२०

निर्णय दिनांक २४.११.२००९

१. श्री. सुभाष मोतीलाल ढाकरे व श्री. वसंत विश्वनाथ शेजुळ, : अपिलार्थी
रा. झोडेगांव, पो.शिंगी,ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत झोडेगांव,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती
गंगापूर, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमुद केले आहे की, त्यांना आवश्यक माहितीपोटीचे शुल्क रु. १२७६/- इतके ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत झोडेगांव, तालुका गंगापूर, यांच्याकडे भरुनही त्यांना अद्यापपावेतो संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळुन येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०१.०१.२००६ ते २००८ पर्यंतच्या कालावधीची ग्रामपंचायत झोडेगांव खडक वाघलगावमार्फत एम.आर.ई.जी.एस.,भारत निर्माण

पाणी पुरवठा योजना, घरकूल योजना व वाटप केलेल्या निधीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या योजनेशी संबंधित हजेरीपट, मोजमाप पुस्तिका, जेथे काम केलेले आहे त्या शेतकऱ्यांची नावे, गट क्रमांक, शिवार, अंदाजपत्रक, संमतीपत्र, मजुरांचा पगार वाटपाचा तपशील-बँकेमार्फत की व्यक्तीशः, ताळेबंद पत्रक ,बँक स्टेटमेंट,सर्व खाते - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यकितशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे ऑगस्ट २००८ या महिन्यामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १२७६/- इतके भरले. अपिलार्थीस ग्रामपंचायतीने दिलेल्या पावतीवर दिनांकाचा स्पष्ट उल्लेख नाही. या पावतीवर फक्त महिना व साल इतके स्पष्टपणे वाचता येण्याजोगे असल्याचे आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीना ही माहिती गट विकास अधिकारी यांनी दिनांक २२.११.२००८ रोजी पुरविली आहे व ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ संबंधिताची सही असलेले पत्र त्यांनी आयोगास सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती आता प्राप्त झाली असावी, असे अनुमान आयोगातर्फे काढण्यात येत आहे. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ऑगस्ट २००८ मध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस गट विकास अधिकारी यांच्यामार्फत दिनांक २२.११.२००८ रोजी म्हणजेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर अंदाजे ३ महिना

इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थींना माहिती देण्यासाठी संबंधितांनी घेतलेला कालावधी हा अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रु. १२७६/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसात परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रु. १२७६/- इतके अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसात परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष मोतीलाल ढाकरे व श्री. वसंत विश्वनाथ शेजुळ, रा. झोडेगांव, पो.शिंगी,ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रूप ग्रामपंचायत झोडेगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२१

निर्णय दिनांक २४.११.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पी.एम. अवकाळे,<br>रा. जवखेडा, ता. जाफ्राबाद,<br>जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),<br>जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती अपूर्ण व चुकीची असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील समांतर आरक्षण/प्रवर्ग संवर्गनिहाय, वर्ग ३ व ४ ची संवर्गनिहाय पदनिर्मिती व पदभरती या संदर्भात शासन निर्णय दिनांक २२.०३.२००५ व १९.०८.२००५ नुसार दिनांक ३१.०३.२००८ पर्यंतची सविस्तर माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७.०५.२००८ रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण वाटल्यावरुन त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१)च्या तरतुदीनुसार दिनांक २८.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५.०९.२००८ रोजी निर्णय देऊन वर्ग ४ ची माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व त्याप्रमाणे त्यांनी वर्ग ४ ची माहिती अपिलार्थीस दिनांक १५.१०.२००८ रोजी व्यक्तिशः पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण व चुकीची वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २४.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०७.०५.२००८ आणि दिनांक १३.०५.२००८ रोजी माहिती देण्यासाठी तयार करुन ठेवली होती, ती माहिती अपिलार्थीने दिनांक १५.१०.२००८ रोजी हस्तगत केली आहे. अशी सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस परिपूर्णरितीने दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकरी यांच्याकडे दिनांक ०५.०७.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना ग्रामपंचायत कर्मचारी भरतीसंदर्भात माहिती मिळाली नसल्याचा जन अपिलीय अधिकारी यांच्यासमोर युक्तिवाद केला होता. या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा हा

मुद्दा मूळ अर्जामध्ये समाविष्ट नसल्याने, या मुद्याकरिता अपिलार्थीस नव्याने अर्ज करण्याचे सूचित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय बरोबर आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे त्यांना का वाटते, हे युक्तिवादाद्वारे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत. तसेच आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती कोणत्या मुद्यावर त्यांना अपूर्ण व चूकीची वाटते, याचा कोणताही उहापोह त्यामध्ये केलेला नाही. त्यामुळे आयोगास, अपिलार्थीचे आयोगाकडे द्वितीय अपील करण्यासाठीचे प्रयोजन, निश्चितपणे समजू शकत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २४.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पी.एम. अवकाळे, रा. जवखेडा ठेंग,पो.वरुड (खुर्द) ता. जाफ्राबाद, जि. जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२३

निर्णय दिनांक : २४.११.२००९

१. श्री. सानप कांतीराम अण्णाराव, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपजिल्हा निवडणूक अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,बीड

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.१०.२००८ रोजी प्राप्त झालेले, राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दिनांक २७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना अर्धवट व चुकीची माहिती देऊन संबंधितांनी त्यांचा मानसिक छळ केला असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे व या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील लिपीक श्री. बन यांच्याविरुध्द शिस्तभंगाची व दंडनीय कारवाई त्वरित करणे अगत्याचे आहे, असे आपले अभिप्राय नोंदविले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ऑक्टोबर, २००४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या वेळी त्यांनी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, वि.स.नि.चौसाळा या पदावर काम करुनही त्यांना जादा केलेल्या कामाचे मानधन अद्यापपावेतो मिळालेले नाही, ते देण्यात यावे, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६.०६.२००८ रोजी मूळ अर्जाद्वारे कोणत्याही अभिलेख्यांची मागणी केलेली नसल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०७.२००८ रोजी आपला निर्णय पारित करुन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.११.२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस ते सदरच्या पदावर कार्यरत असताना, निवडणूक कालावधीमध्ये पूर्ण वेळ काम केलेले नसल्यामुळे, मानधनास पात्र नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात अपिलार्थीस त्यांनी प्रथमत: दिनांक १७.०६.२००८ रोजी व तदनंतर दिनांक १६.११.२००९ रोजी परत कळवून अपिलार्थी जादा कामाचे मानधन घेण्यासाठी पात्र नाहीत असे त्यांना कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली कथित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात कोणतीही माहिती मागितलेली नाही. परंतु त्यांनी या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे निवडणूक काळातील जादा कामाच्या भत्त्याची / मानधनाची मागणी केली आहे. अशा विषयासंदर्भातील अर्जांना 'माहितीसाठीचा अर्ज' असे मानता येणार नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १७.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद हा अधिक समर्पक आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली कथित माहिती, अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीप्रमाणे स्पष्ट केलेल्या ‘माहिती’ या शब्दाच्या व्याप्तीबाहेरील असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सानप कांतीराम अण्णाराव, रा.विजयश्री निवास, मित्रनगर, ढाकणे यांचे किराणा दुकानाच्या पाठीमागे मु.पो.ता बीड, जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८९
निर्णय दिनांक २४/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ सौ. हौशाबाई भ्र. वाळीबा गावंडे,<br>रा.सोनेवाडी भोजापूर, ता.सिन्नर, जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, सिन्नर, जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, सिन्नर, जि.नाशिक | | |

**निर्णय**

सौ.हौशाबाई भ्र.वाळीबा गावंडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक १६.०७.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या

दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १३१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. हौशाबाई भ्र. वाळीबा गावंडे, मु.पो. सोनेवाडी भोजापूर, ता. सिन्नर, जि. नाशिक

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३७
निर्णय दिनांक २४/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.तावरे हरीभाऊ माधवराव,<br>रा.चिकनगांव, ता.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, अंबड, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, अंबड, जि.जालना | | |

**निर्णय**

श्री.तावरे हरीभाऊ माधवराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ११.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १७.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २०.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये दि. १५.०५.२००८ चा अपील अर्ज प्राप्त झाला परंतु मूळ माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नाही, म्हणून अपील निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील निकाली काढण्यासंबंधिचे जन माहिती अधिकारी यांचे पत्र हे अपिलीय अधिकाऱ्याने पाठविले नसल्यामुळे प्रथम अपिलावरील ओदश हाऊ शकत नाहीत. तथापि त्यांनी व्दितीय अपील हे प्रथम अपील दाखल करण्याच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत दाखल करणे आवश्यक होते. परंतु अपिलार्थी यांनी हे अपील प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.तावरे हरीभाऊ माधवराव, मु.पो. चिकनगांव, ता.अंबड, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८४१
निर्णय दिनांक २४/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.मच्छिंद्र अमृता फरताडे,<br>रा.मिरजगांव, ता.कर्जत, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>कर्जत, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषी अधिकारी,<br>कर्जत, जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

श्री. मच्छिंद्र अमृता फरताडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०७.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २३.११.२००५ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २८.१२.२००५ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १९० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मच्छिंद्र अमृता फरताडे, मु.पो. मिरजगांव, ता.कर्जत, जि.अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२५

निर्णय दिनांक २४-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय पंडितराव काळे,<br>काळे भवन, २३/११, पापविनाश रोड, महावीर चौक,<br>लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपजिल्हाधिकारी (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अपुरी व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जात आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून जिल्हाधिकारी, लातूर यांना दिनांक ११-०३-२००८ रोजी प्राप्त झालेल्या दिनांक ११-०३-२००८ रोजीच्या पत्रासोबत आलेल्या कागदपत्रांच्या नकला व या पत्रावर जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील अभिलेख्यावरील नोटींग शीटच्या व इतर पत्रव्यहाराच्या प्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०७-२००८ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील अंशत: मंजूर केले व अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०८-२००८ रोजी अपिलार्थीस काही माहिती दिली. प्राप्त माहिती ही अपुरी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमत: दिनांक २९-०५-२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली

तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे संचिकेतील नोटींगच्या प्रती अपिलार्थीस दिल्या गेल्या नव्हत्या. म्हणून अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. या नोटींगच्या प्रती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या निर्णया-व्दारे सूचित केले. प्रकरणाशी संबंधित अभिलेख्यामध्ये मूळात अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयातर्फे कोणतीही टिपणी तयार केली गेली नव्हती. त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस त्यांनी ही वस्तुस्थिती दिनांक २५-०८-२००८ रोजी कळविली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने राज्य निवडणूक आयोगाकडे केलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी मुख्याधिकारी हे निवडणूक अधिकारी या नात्याने सक्षम आहेत व तसेच याप्रकरणी अपिलार्थी कायद्यातील तरतुदीनुसार न्यायालयाकडे देखिल धाव घेऊ शकतात. अपिलार्थीच्या अर्जाची प्रत निवडणूक आयोगाकडून त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लगेचच या पत्राची प्रत मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर यांच्याकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविली आहे. त्यांनी करावयाची कार्यवाही या टप्प्यावरच संपली आहे. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस पूर्णपणे माहिती दिली आहे असे त्यांचे मत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जातील संपूर्ण माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. परंतु ही माहिती अपिलार्थीस अपुरी व दिशाभूल करणारी कशी वाटते या दोन मुद्दयाच्या पृष्ठ्यर्थ आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कोणताही वेगळा आक्षेप घेतला नाही किंवा ही माहिती दिशाभूल करणारी कशी आहे हा त्यांचा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी आज रोजी ते आयोगासमोर देखील उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर

वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय पंडितराव काळे, काळे भवन, २३/११, पापविनाश रोड, महावीर चौक, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२६

निर्णय दिनांक २४-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख अलिमोद्दीन महेताबसाब,<br>रा. देवणी (मुर्गी चौक), तालुका देवणी, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी,<br>तालुका देवणी, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी,<br>तालुका देवणी, जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी, तालुका देवणी, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०४-२००८ रोजी माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे ती माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने यानंतर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी तथा

तहसीलदार, देवणी श्री. सुर्यवंशी यांनी त्यांच्या अपिलाची कोणतीही दखल न घेतल्यामुळे विचाराधीन अपील त्यांनी आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एप्रिल २००१ ते मार्च २००८ या कालावधीतील देवणी येथील राष्ट्रीय सामाजिक अर्थ सहाय्य अनुदान योजनेच्या लाभार्थ्याची यादी धनादेशासह मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी त्यांच्या माहिती अर्जावरुन माहितीचा बोध होत नसल्याने व अपिलार्थीने स्पष्ट मुद्दयाची मागणी केली नसल्याने त्यांचा दिनांक १६-०४-२००८ रोजी अर्ज निकाली काढत असल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देवणी श्री. सुर्यवंशी यांच्याकडे दिनांक २०-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. उलट अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ज्या ज्या वेळी ते तहसीलदार, देवणी श्री. सुर्यवंशी यांना भेटत त्या त्या वेळी अपिलार्थीस योग्य ती वागणूक दिली नाही आणि पुस्तकीय भाषा आम्हाला शिकवू नका, तुम्हाला जे काय करावयाचे ते करुन घ्या, परत माहितीसाठी किंवा सुनावणीसाठी माझ्याकडे यावयाचे नाही परत आल्यास आपल्या विरुध्द कार्यवाही करण्यात येईल, अशी उध्दट, बेजबाबदारपणे भाषा वापरली असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना संबंधित तहसीलदार, देवणी श्री. सुर्यवंशी यांनी कशा प्रकारे वागणूक दिली हे आयोगास अवगत केले व अंतिमतः त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे, असे स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे ज्यावेळी माहिती मागितली होती त्यावेळी श्रीमती गर्गे नावाच्या नायब तहसीलदार जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होत्या. ते या पदावर नुकतेच बदलून आले असून श्रीमती गर्गे या आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही स्पष्ट केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली आठ वर्षाची माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून ही माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती गर्गे यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ प्रमाणे त्वरीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. या प्रकरणी त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाव्दारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. तथापि त्या आता नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून निवृत्त झाल्या असल्यामुळे त्यांच्यावर कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी (एकूण पृष्ठे ६६७) उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही उलट अपिलार्थीस

अपमानास्पद वागणूक देऊन तहसीलदार, देवणी श्री. सुर्यवंशी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब, जिल्हाधिकारी, लातूर यांना श्री. सुर्यवंशी यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची व कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे सूचविण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीस दिलेल्या अपमानास्पद वर्तणुकीची चौकशी जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांच्या स्तरावरुन करुन यापुढे जनसामान्यांशी वागतांना संबंधितांनी योग्य ती काळजी घ्यावी, अशा त्यांना सूचना देण्यात याव्यात, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख अलिमोद्दीन महेताबसाब, रा. देवणी (मुर्गी चौक), तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देवणी, तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२७

निर्णय दिनांक २४-११-२००९

१ श्री. कोरनुळे अंबादास व्यंकटराव, : अपिलार्थी
प्रसाद बुक सेंटर, कदम हॉस्पीटलसमोर, नांदेड-लातूर
रोड, शिवाजी चौक, अहमदपूर, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०

प्रमाणे शास्तीची कार्यवाही करुन ती शास्तीची रक्कम अपिलार्थीस प्राप्त करुन द्यावी आणि त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, तलाठी सज्जा मौजे सावरगांव (थोट) या गावच्या कार्यक्षेत्राअंतर्गत पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र दिलेल्या शेतक-यांच्या नावाच्या यादीच्या प्रतीबाबत मार्च २००४ ते जुले २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तलाठी सजा सावरगाव (थोट) यांच्या कार्यक्षेत्रात विहिरी व विंधन विहिरीस पाणी उपलब्ध प्रमाणपत्र दिलेल्या शेतक-यांची यादी, नदी पात्रातून पाणी उपलब्ध असलेल्या शेतक-यांना प्रमाणपत्र दिल्याची यादी, तलाठी सजा सावरगाव (थोट) कार्यक्षेत्रातील शेतक-यांनी महसूल भरलेल्या पावत्यांच्या प्रती व तलाठ्याकडे संबंधितांनी महसूल भरलेली रक्कम तहसील कार्यालयात भरल्याची छायांकीत प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र हे गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे ही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी देणे अपेक्षित आहे. शेतक-यांनी तलाठी सजा सावरगाव (थोट) यांच्याकडे भरलेल्या महसूली पावत्यांच्या प्रती व तसेच तलाठ्याने तहसील ऑफिसमध्ये भरलेल्या महसूल पावत्यांच्या प्रती त्यांनी बरोबर आणल्या असून त्या ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे प्रतिसाद देणे अनिवार्य होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना देण्यासंदर्भात, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पहिल्या दोन मुद्दयावरील माहिती जर खरोखरच गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संबंधित होती तर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही या प्रकरणी केल्याचे आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली देय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. या सर्व प्रकारास संबंधित नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अहमदपूर हे जबाबदार असल्याने आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जरी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या कार्यालयाशी संबंधित असली तरीही, ही माहिती नायब

तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अहमदपूर यांनी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरवावी लागेल.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण चार मुद्दयांपैकी मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांनी संबंधित अधिका-याशी संपर्क साधून त्यांच्या कार्यालयाकडून हस्तगत करुन घ्यावयाची आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः जाऊन ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेणे क्रमप्राप्त होते. या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता किती वेळा संपर्क साधला या बाबतचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जोडलेला नाही. तसेच आज सुनावणीस देखील ते उपस्थित नाहीत, ही बाब देखील प्रकर्षाने नोंदवून घेण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत न पाठवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग केला आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांनी अपिलार्थीस, प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर, सात दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (दिनांक २२-०७-२००८ रोजी तहसील कार्यालय, अहमदपूर येथे कार्यरत असलेले नायब

तहसीलदार) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव महसूल यांना संबंधीत जन माहिती अधिकारी (दिनांक २२-०७-२००८ रोजी तहसील कार्यालय, अहमदपूर जिल्हा लातूर येथे कार्यरत असलेले नायब तहसीलदार) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कोरनुळे अंबादास व्यंकटराव, प्रसाद बुक सेंटर, कदम हॉस्पीटलसमोर, नांदेड-लातूर रोड, शिवाजी चौक, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२८

निर्णय दिनांक २४-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अंबादास रामराव आझादे,<br>घर क्रमांक १०३५, सिध्दार्थनगर, आसेगांव रोड,<br>वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगरपरिषद, वसमतनगर, तालुका वसमतनगर,<br>जिल्हा हिंगोली | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, वसमतनगर,<br>तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लेखापाल, नगरपरिषद कार्यालय, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या अर्जाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १९९८ चा संदर्भ व १९८६ साली सिध्दार्थ मा. व. स. सं. म. वसमत चे ले आऊट मंजूर नकाशे मंजूरीप्रमाणे घाण पाणी विल्हेवाट. १) सर्वे नंबर ११९/१, ११९/२ व ११९/३ मधील प. त. वसमत वि. प. क्र. १८, दिनांक १६/३/९८ प्रमाणे सौ. वत्सला आझादे यांचे एकूण २) शेती सर्वे नंबर मधील सांडपाण्याची विल्हेवाट. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-१०-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून त्यांचे प्रथम अपील खारीज केले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी श्री. इलीयाज अहमदखाँ अजीजखाँ हे उपस्थित आहेत. त्यांना या प्रकरणासंबंधात कोणतीही माहिती असल्याचे आयोगास आढळून आले नाही. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती आवश्यक आहे याचा अर्थबोध कोणासही

होणे शक्य नाही. या अर्जामध्ये नमूद केलेल्या मिळकतीच्या संदर्भात न्यायालयामध्ये वाद चालू असून अपिलार्थीस सौ. वत्सला आझादे यांच्या नावाने असलेला प्लॉट नामांतर करुन हवा आहे. परंतु दोनही पक्ष न्यायालयात गेले असल्यामुळे अद्यापपावेतो नामांतर झाले नाही आणि सांडपाण्याच्या विल्हेवाटीबाबत आरसीसी नालीचे बांधकाम अंशतः करण्यात आलेले आहे. उर्वरित नालीचे बांधकाम नगरपरिषद सभागृहाच्या मान्यतेनंतर करण्यात येईल असे अपिलार्थीस दिनांक २५-०७-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याचा कोणताही बोध होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंबादास रामराव आझादे, घर क्रमांक १०३५, सिध्दार्थनगर, आसेगांव रोड, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगरपरिषद कार्यालय, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२९

निर्णय दिनांक २४-११-२००९

१ श्री. मिलींद वसंतराव वानखेडे, : अपिलार्थी
घर नं. ४-८-४८, सिध्देवर मंदिराजवळ,
सिध्दनाथपुरी, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग,
महानगरपालिका, नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महानगरपालिका,
नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्रमांक ५४ मधील आमदार निधीतून घेतलेल्या बोअर व पाईपलाईनच्या कामासंदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन मधील मागणी केलेली माहिती " बोअर-च्या पाण्याचे घरामध्ये कनेक्श्न देता येते का " या अंशतः मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. मात्र बोअरचे कनेक्शन घेण्याबाबत महानगरपालिकेचे काही नियम असतील तर त्याची प्रत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होते. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली आहे किंवा कसे हे आयोगास संबधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सोपे आणि व्याप्ती मर्यादित आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक ३ मधील अपिलार्थीस अनुज्ञेय नसलेला भाग वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिलींद वसंतराव वानखेडे, घर नं. ४-८-४८, सिध्देवर मंदिराजवळ, सिध्दनाथपुरी, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महानगरपालिका, नांदेड. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महानगरपालिका, नांदेड. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३०

निर्णय दिनांक २४-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जी. एस. रायबोळे,<br>मुख्य संपादक, सा. धुमाकूळ,<br>सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामविस्तार अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा (खु.), तालुका जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तरोडा (खु.) ग्रामपंचायत कार्यालयातर्फे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्त्याच्या बाजूला वृक्षलागवड या योजनेअंतर्गत केलेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या

मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले.परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला आहे व पोस्टाची पोचपावती त्यांनी आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेली आहे. यावरुन हे दोनही अर्ज जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांनी सुनावणी घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा (खु.), तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२२

निर्णय दिनांक २४-११-२००९

१ श्री. रामचंद्र बाबुरावजी पानवाले, : अपिलार्थी
रा. परतूर , जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय परतूर,
जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद परतूर,
जि. जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : लिपिक, नगर परिषद, परतूर, जि. जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने असे स्पष्ट केले की, ते नगर परिषदेचे कर्मचारी असून त्यांच्यावर विभागाने चौकशी सुरु केली होती. या चौकशीचे प्रकरणी त्यांना काही माहिती आवश्यक असल्याने ती माहिती त्यांनी नगर परिषदेच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन मागितली होती. तथापि ही चौकशी आता संपली असून त्यांना नगर परिषदेने पुन्हा सेवेमध्ये रुजू करुन घेतले आहे. त्यामुळे आता त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता नाही, तसेच त्यांना ही माहिती नगर परिषदेकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर विनामूल्य प्राप्त झाली आहे. त्यामुळे ते विचाराधीन अपील मागे घेऊ इच्छित आहेत. अपिलार्थीने त्यांच्या अशाप्रकारच्या तोंडी विनवणीबरोबरच आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २४.११.२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून त्यामध्ये विचाराधीन अपील ते स्वखूषीने मागे घेत आहेत असे नमूद करुन ते रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८२२/०८, दिनांक १३.१०.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामचंद्र बाबुरावजी पानवाले, साठेनगर परतूर, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा लिपिक, नगर परिषद, परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद, परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४६

निर्णय दिनांक : २५.११.२००९

१. श्री. राम गोरखनाथ पार्वे, :अपिलार्थी
राा.चिंचखेड, ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २,
जालना.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

विद्यमान जन माहिती अधिकारी : उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना.

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि.२५.११.२००९ रोजीचे पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यामुळे विचाराधीन अपील ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन सदर अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्यामुळे, अपिलार्थीची विचाराधीन अपिलासंदर्भातील त्यांची विनंती मान्य करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.१८४६/०८, दि.०१.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २५-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राम गोरखनाथ पार्वे, मु.पो.चिंचखेड, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४७

निर्णय दिनांक : २५.११.२००९

१. श्री. औचरमल भगवान तात्याराम, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : महसूल सहायक,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष : श्री.नारायण रावकाजी खंडाळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून सदर अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या असमाधानकारक उत्तराने आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, - त्रयस्थ पक्ष श्री. नारायण रावकाजी खंडाळे यांचा गट क्रमांक १७५

वळदगांव (पंढरपूर), सरकारी गायरान जमिनीतील २० गुंठे जमीन चित्रपटगृहासाठी दिलेल्या ९९ वर्षांच्या भाडेपट्टाकराराची सत्यप्रत - ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची प्रत संचिकेत उपलब्ध नसल्याचे व त्यामुळे अपिलार्थीस कराराची प्रत देता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९.०७.२००८ रोजी निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांचा शोध घेण्याचे आणि ही माहिती त्यांच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध आहे किंवा कसे हे पहावे व माहिती उपलब्ध असल्यास ती अपिलार्थीस पुरवावी व नसल्यास, माहिती अभिलेख्यामध्ये उपलब्ध नाही, असे अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी, अपिलार्थी आणि त्रयस्थ पक्ष हे सर्व आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचा आपला युक्तिवाद आयोगासमोर केला. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने या प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २४७ नुसार अपील केले असता अपिलार्थीचे अपील

अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४.११.२००६ रोजीच्या निर्णयाद्वारे अमान्य केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील या जमिनीशी संबंधित अभिलेख्यामध्ये उपलब्ध न होऊ शकल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती नस्तीमध्ये उपलब्ध नाही, असे कळविले.

त्रयस्थ पक्ष श्री. नारायण रावकाजी खंडाळे यांनी असा युक्तिवाद केला की, सरकारी गायरान जमिनीतील २० गूंठे जमीन ९९ वर्ष भाडेपट्टाकरारावर त्यांना जिल्हाधिकारी यांनी दिल्याबद्दलच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध आहेत.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीस या प्रकरणी, जन माहिती अधिकाऱ्यांकडून गट क्रमांक १७५ वळदगांव (पंढरपूर) या सरकारी गायरानातील २० गुंठे जमीन चित्रपटगृहासाठी ९९ वर्ष दिल्याचा भाडेपट्टा करारच मूळात झालेला नाही, अशी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हवी आहे परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या भाडेपट्टा कराराची प्रत त्यांच्याकडील संचिकेत उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, या जमिनीच्या मालकी हक्कासंबंधी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष या दोन्ही पक्षामध्ये वाद असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी गट क्रमांक १७५ वळदगांव येथील या जमिनीच्या ७/१२ च्या उताऱ्याची व त्यावरील फेरफाराची नक्कल प्रत शोधून त्या प्रतीवरुन अपिलार्थीस कशाप्रकारे माहिती देता येईल, हे पहावे. या प्रकरणी अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की,त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित अभिलेख्यांची तपासणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत वेगळा अर्ज करुन करावी व त्यातून त्यांना न्यायालयीन

कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती त्यांनी काढून घ्याव्यात, म्हणजे त्यांचा माहिती मागण्याचा मूळ उद्देश सफल होण्यास मदत होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः (दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत) उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. औचरमल भगवान तात्याराम, रा. भिमनगर,भावसिंगपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४८

निर्णय दिनांकः २५.११.२००९

१ श्री. पांडुरंग दिगंबर चौधरी, रा. औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी विलंब केल्यामुळे आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना दिनांक १४.०३.२००६ रोजी जय भवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय

औरंगाबादचे माध्यमिक विभागाच्या एकूण कार्यभारावर माध्यमिक शिक्षकांना मान्यता दिल्यानंतर ४.२५ तास शिल्लक राहतात, याबाबत दिलेल्या पत्राची/प्रमाणपत्राची प्रत मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी जय भवानी विद्यामंदीर औरंगाबादच्या मुख्याध्यापकाकडून साक्षांकित स्वरुपात उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. तथापि हा प्रतिसाद अपिलार्थीस मान्य न झाल्याने त्यांनी दिनांक २८-०३-२००८ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. २२.०५.२००८ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आजही त्यांना आवश्यकता आहे, असे आयोगास अवगत केले व तसेच आता माहिती प्राप्त झाल्यास ती विलंबाने प्राप्त झालेली माहिती आहे असे त्यांचे तोंडी अभिप्राय त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे व्यक्त केले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे,जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता व्यक्तिशः किती वेळा उपस्थित राहिले या संदर्भातील एखादा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय, याची आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थीने त्यास नकारार्थी उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या वेळी त्यांच्या कार्यालयात माहितीची मागणी केली होती त्यावेळी श्री. खालीक नावाचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे जन माहिती अधिकारी म्हणून या कार्यालयात कार्यरत होते. त्यांनी दिनांक १३.०६.२००८ रोजी या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होत नाही, असे पाहिल्यानंतर त्यांनी स्वत: विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात जाऊन, अपिलार्थीस हव्या असलेल्या प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करुन घेतली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त होणे गरजेचे आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी किती वेळा व्यक्तिशः उपस्थित राहिले या संदर्भातील कोणताही पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध नाही.

आज रोजी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असून, या कथित माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी पुर्णपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसाच्या आत सांक्षाकित करुन विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पूर्वनियोजित

वेळी व्यक्तिशः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, वास्तविक पाहता उपलब्ध असावयास हवी, तथापि ही माहिती त्यांच्याकडील अभिलेख्यामध्ये उपलब्ध नसल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २१.०५.२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.औरंगाबाद यांच्या कार्यालयातील या माहितीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या लिपीकावर आहे ते लिपीक, निश्चितपणे जबाबदार असल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे. माहिती अधिकाऱ्यास अर्जदाराने मागणी केलेली माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतूद आहे. हे पाहता, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायकांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसाच्या आत साक्षांकित स्वरुपात विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचाऱ्यांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडूरंग दिगंबर चौधरी, रा.एन-११-ए-८/४,सुदर्शननगर,हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४९

निर्णय दिनांक : २५.११.२००९

१. श्री. सुरेश गंगाराम बनकर, : अपिलार्थी
रा. ताडकळस, ता.भोकरदन,जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तालूका कृषी कार्यालय,
भोकरदन, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
भोकरदन, जि. जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन, जि.जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क भरण्यासाठी ते तयार असूनही जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ करुन माहिती दडविण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करुनही त्यांनी सुनावणी न घेतल्यामुळे, अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जुन - जुलै २००८ या कालावधीतील

मराठवाडा पाणलोट मिशनअंतर्गत त्यांच्या कार्यालयातर्फे उचलण्यात आलेल्या निधीबाबतची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात एक कोटी छत्तीस लाख रुपये प्राप्त झाले, त्याचे पासिंग रजिस्टर, आवक-जावक नंबर, मंजूर इस्टिमेटची प्रत, कोणाला पैसे वाटले, त्याच्या पावत्या, ट्रॅक्टरचे नंबर (सत्यप्रती) - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३०५०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्यामुळे अपिलार्थीस माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. प्रत्यक्षात माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४.१०.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपेक्षित माहिती दिली. तथापि माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मराठवाडा पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एकाच गावामध्ये, त्या गावातील पाणलोट समितीमार्फत राबविला जातो, या समितीचे अध्यक्ष त्या गावाचे सरपंच अथवा सभेने सूचविलेले

ग्रामस्थ यापैकी एक असतात. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही या समितीकडे उपलब्ध असल्यामुळे त्या समितीकडून माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०४.१०.२००८ रोजी, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे, विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.१०.२००८ रोजी माहिती दिल्याबद्दल आणि ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची पोचसही असलेला पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला आहे. दिनांक ०४.१०.२००८ रोजी माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने दिनांक २४.१०.२००८ रोजीच्या अपील अर्जामध्ये त्यांना माहिती प्राप्त झाल्याबद्दल आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उल्लेख केल्याचे आयोगास आढळून येत नाही.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडविण्याचा प्रयत्न केला व जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही एवढेच अभिप्राय दिलेले आहेत. वास्तविक पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः जाऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घेणे हे येथे अभिप्रेत आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने फक्त त्यांच्या दिनांक २२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे निधी (शुल्क) भरण्यास ते तयार आहेत, असे कळविले आहे. परंतु हे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही भरले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली नाही, असे नमूद केले आहे. तथापि या प्रकरणी जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६.०९.२००८ रोजी सुनावणी झाल्याचे व अपिलार्थीस दि. १०.०९.२००८ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे कळवूनही अपिलार्थी सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याचे आयोगास आढळून आले आहे. ही तारीख देखील अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करण्यापूर्वीची (दि. २४.१०.२००८ पूर्वीची) आहे, हे पाहता, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जातील नमूद केलेल्या बाबी आणि या बाबीशी संबंधित वास्तव यामध्ये आयोगास विसंगती आढळून येत आहे. ही विसंगती स्पष्ट करण्यासाठी अपीलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २५.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश गंगाराम बनकर, रा. ताडकळस, पो. सिपोरा (बाजार),ता.भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषी कार्यालय, भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३८
निर्णय दिनांक २५/११/२००९

१ श्री. गणेश रमेश कुलकर्णी, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
देवगिरी नागरी सहकारी बँक लि.,
हेड ऑफिस, केशरसिंगपुरा, औरंगाबाद

१ जन अपिलीय अधिकारी, :
मुख्य कार्यालय, देवगिरी नागरी सहकारी बँक लि.,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १४.०८.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, देवगिरी नागरी सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, केशरसिंगपुरा, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास संबंधित बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या बँकेस लागू होत नसल्याने अपिलार्थीस हवी असलेली माहिती ते अपिलार्थीस पुरविण्यास असमर्थ असल्याचे त्यांना कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने मुख्य कार्यालय, देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यानंतरही जन माहिती व अपिलीय अधिकारी

यांच्याकडून माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत व देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित बँकेचे संबंधित अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०३८ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश रमेश कुलकर्णी, व्दारा-अॅड.पी.डी. काळे, फ्लॅट नं.१३, योगराज कॉर्नर, कल्पतरु हौसिंग सोसायटी, पुंडलिक नगर रोड, गारखेडा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, देवगिरी नागरी सहकारी बँक लि., हेड ऑफिस, केशरसिंगपुरा, अदालत रोड, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी, मुख्य कार्यालय, देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३९
निर्णय दिनांक २५/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख अहेमद इब्राहिम,<br>रा.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>धारासूर मर्दिनी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, उस्मानाबाद | : | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ३१.०५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, धारासूर मर्दिनी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०८.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी दि. ०१.०८.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्यांच्या दि. ०४.०८.२००८ रोजीच्या आदेशान्वये सात दिवसांत अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित संस्थेस आदेशित केले

असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि यानंतरही मुदतीत माहिती न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी पतसंस्था व्यवस्थापक व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित पतसंस्था व्यवस्थापक व जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ मधील तरतुदीनुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०३९ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अहेमद इब्राहिम, रा. सांजावेस गल्ली, उस्मानाबाद, ता.जि. उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, धारासूर मर्दिनी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४०

निर्णय दिनांक २५/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. श्रीराम नारायणराव धापसे,<br>मु.पो. पाली, ता.जि. बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य अवसायक,<br>दि लातूर पिपल्स को-ऑप बँक लि. लातूर | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, लातूर | : | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०५.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २८.०१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्य अवसायक, दि लातूर पिपल्स को-ऑप बँक लि., लातूर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी कोणताही निर्णय दिला नाही. तथापि यानंतर संबंधित बँकेने त्यांच्या दि. १८.०४.२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस काही माहिती पाठविली. परंतु सदर माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन व

प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू नसल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०४० /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीराम नारायणराव धापसे, मु.पो. पाली, ता.जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य अवसायक, दि लातूर पिपल्स को-ऑप. बँक लि. लातूर, व्दारा- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मुख्य इमारत, सरव्यवस्थापक यांचे कार्यालय, लातूर, ता.जि. लातूर.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८५२

निर्णय दिनांक २५-११-२००९

१ श्री. शेख नईम शेख लाल, : अपिलार्थी
नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०९-२००८ पर्यंत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. सुरेश नामदेव अंबुलगेकर व श्री. नंदकिशोर वसंतराव नाईनवाड यांच्या जातीच्या प्रमाणपत्रासंदर्भात एकूण २८० कागदपत्रे जी लखीना पॅटर्नमध्ये १९८३ मध्ये नष्ट केली होती त्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नष्ट केलेल्या अभिलेख्यामध्ये कोणकोणती कागदपत्रे नष्ट करण्यात आली, नष्ट करतांना वरिष्ठांना सादर केलेली टिपणी आणि वरिष्ठांच्या घेतलेल्या परवानगीची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अपिलार्थी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीस, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या अर्जास त्यांनी कधी प्रतिसाद दिला याची आयोगाने विचारणा केली असता, त्यांना आयोगास कोणताही खुलासा करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे वरील परिच्छेदात नमूद केलेले वर्तन व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी

केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसाच्या आत देय होत आहे. परंतु या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत तर कोणताही प्रतिसाद दिला नाहीच परंतु अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे किंवा कसे यासंदर्भात काहीही कळविले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी तर माहिती अधिका-यावरही कडी करुन अपिलार्थीच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही. महसूल विभागातील क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची, प्रत्यक्षात अंमलबजावणी करतांना कशा प्रकारे अवहेलना करत आहेत याचे हे सम्यक दर्शन संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणातील वर्तनातून होत आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे माहिती अधिकाराची उपेक्षा केल्याचे आयोगास प्रतीत होत आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८५३

निर्णय दिनांक २५-११-२००९

१ श्री. मिटकरी सुदाम किसन, : अपिलार्थी
रा. कन्हेरवाडी, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, भूम, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही व उपविभागीय अधिकारी यांच्या निर्णयाचे काहीही पालन झाले नाही किंवा आजपर्यंत कसलीही कार्यवाही झाली नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " स. नं. १००, ११०, १११, १३४, १३५, १३६ १४३ व न. नं. १२ च्या फाळणी पत्राच्या नकला, फेर नंबर २५० ची नक्कल " अशी सन १९७४-७५ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५० इतके त्यांना स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा कळंब येथे चलनाव्दारे भरणा करुन चलन सादर केल्यानंतर अपिलार्थीस माहिती हस्तगत करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १५-०४-२००८ रोजी रुपये १५० या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा कळंब येथे केला. आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले आणि जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता असल्याचे आयोगास स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण दोन मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ मधील फाळणीपत्राच्या नकला ही माहिती अपिलार्थीस तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडून प्राप्त होऊ शकेल व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही जुन्या कालावधीशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात ही माहिती आता आढळून येत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जर तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयाशी संबधित होती तर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत अधिनियमातील ६ (३) (एक) नुसार पुरविणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशी कोणतीही कृती केली नाही. परंतु अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५० इतके भरण्याचे मात्र त्यांना कळविले आहे. या अर्जात अपिलार्थीस १५ पृष्ठाकरिता १५० रुपये इतक्या शुल्काची आकारणी जन माहिती अधिकारी यांनी केलेली आहे. त्यावरुन आज रोजी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असावी असे अनुमान काढण्यास हरकत नाही. या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हेच जबाबदार असल्याचे आता सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना आवश्यक

वाटल्यास, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कळंब यांच्याकडून प्रथम प्राप्त करुन घ्यावी व नंतर ती अपिलार्थीस या आदेशामध्ये पुढे नमूद केल्याप्रमाणे विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे फेर क्रमांक २५० ची नक्कल ही माहिती मागितली आहे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडेच असणे त्यांचा नियमित कार्यभार पाहता, अभिप्रेत आहे. जमिनीचा फेर या प्रकारचे अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा कायमस्वरुपी असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस फेर नंबर २५० ची नक्कल उपलब्ध करुन द्यावी लागेल. जर या फेर नंबरची नक्कल त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचा-याकडे उपलब्ध झाली नाही तर त्यांनी हे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर होती त्यांच्यावर शिस्तभंग अथवा फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करावी, असे त्यांना येथे आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलले शुल्क रुपये १५० इतके त्यांना परत करावे लागेल. या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क स्वीकृत करुनही तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती शोभा जाधव (सध्या तहसीलदार, शिरुर अनंतपाळ तहसील कार्यालय येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती न पुरवून अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. प्रकरणी सिध्द होत आहे. सबब महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती शोभा जाधव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे त्या त्यांच्या सर्व सहाय्यकांवर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रुपये १५० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत परत करावे.

४. महसूल आयुक्त, औरगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिटकरी सुदाम किसन, रा. कन्हेरवाडी, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८५४

निर्णय दिनांक २५-११-२००९

१ श्री. पंढरी रामा व्हगे, : अपिलार्थी

मु. पो. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, गांधी चौक, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा पोलीस अधीक्षक, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक यांना त्यांच्या जीवनाशी संबंधित माहिती मागवून देखील त्यांनी ती माहिती अपिलार्थीस न दिल्याने अपिलार्थीने पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जास देखील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना पोलीस अंमलदार, पोलीस स्टेशन किनगांव यांच्या सहीने दिनांक १४-०८-२००८ रोजी पत्र पाठवून पोलीस अधीक्षक, लातूर यांनी त्यांच्या अपील अर्जाची सुनावणी घेतली व ही सुनावणी घेत असतांना अपिलीय अधिका-याने त्यांच्या प्रतिनिधीला दालनात येऊ दिले नाही आणि त्यांना अपमानास्पद वागणूक दिली व

अंतिमतः जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घातले त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" दि. २७/५/२००८ रोजी रात्री ८-३० च्या सुमारास कु. सोनाबाई संभाजी व्हगे हिचा घरात घुसुन विनयभंग केला होता. त्या प्रकरणाची चौकशी दिनांक १६/७/२००८ रोजी आपल्या कार्यालयात करण्यात आली. त्यामध्ये साक्षीदार व माझी नात कु. सोनाबाई सून शांताबाई व इतर साक्षीदारांच्या जवाब घेण्यात आले. मुळ फिर्यादी कुटुंब प्रमुख मी असूनही माझा जवाब घेण्यात येत नव्हता. मी मागणी केल्याने घेतला गेला. आरोपी हा पोलीस असल्यामुळे व मला व माझ्या सुनेला लिहिता वाचता येत नाही व माझी नात अल्पवयीन आहे. आपली भुमीका संशयास्पद असल्यामुळे या जवाबाच्या छायांकीत प्रती साक्षांकीत करुन २४ तासाच्या आत मला देण्यात याव्यात."

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०७-२००८ रोजी माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा, माहिती अधिकार अधिनियमामध्ये कलम ७ (१) प्रमाणे माहिती देण्याचा विहित केलेला कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००८ रोजी सुनावणी घेतली व सुनावणीच्या दिवशी अपिलार्थीने त्यांची काही तक्रार नसल्याचे नमूद केल्यावरुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपील निर्णयाच्या एक दिवस पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे माहिती देण्याचे नाकारले. अशा प्रकारे अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून, प्रथम

अर्ज व प्रथम अपील केल्यानंतरही प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०७-२००८ रोजीच्या अर्जात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित होती. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर आणि प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु या दोनही अधिका-यांनी अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. या प्रकरणात अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देऊन निर्णय देणे हे आवश्यक होते.

या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी लक्षात घेऊन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त

झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अथवा कलम १८ नुसार तक्रार सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पंढरी रामा व्हगे, मु. पो. अंधोरी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, गांधी चौक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८५५

निर्णय दिनांक २५-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते,<br>(ग्रा.प.सदस्य पांगरी), दिवाणी न्यायालय क. स्तर, परळी<br>वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी<br>वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून न दिल्यामुळे, जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ व या कामी त्यांना सहाय्य करणा-या पुरवठा विभागातील अधिका-यांना अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे शास्ती लावावी आणि कलम २० (२) प्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे पांगरी, तालुका परळी वैजनाथ येथील स्वस्त धान्य / रॉकेल दुकाना-संदर्भातील पर्यायी व्यवस्थेची, लाभार्थ्यांची यादी व संचिकेच्या प्रती अशी मोठी व्याप्ती असलेली माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने ही माहिती दिनांक ०१-०१-२००६ ते १९-०३-२००८ या कालावधीशी संबंधित मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित नायब तहसीलदार यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे ही माहिती त्यांच्या ज्या सहायकांकडे असणे अभिप्रेत होते त्या सर्व सहायकांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०५-२००८ रोजी निर्णय देऊन संबंधित दुकानदारांकडून माहिती घेऊन ती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी त्यांच्याकडील माहिती अपिलार्थीस दिनांक ११-०४-२००८ रोजी पुरविली

असून या प्रकरणाशी संबंधित सर्व नस्त्या त्यांनी अपिलार्थीस दाखविल्या असून त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती ते त्यांच्याकडून विनामूल्य घेऊन गेले आहेत. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांना कोणताही पुरावा आयोगास सादर करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असली तरी, मोठया प्रमाणात आहे. अपिलार्थीच्या या अर्जामधील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपैकी काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे, हे तहसील कार्यालयाची अन्नधान्य वितरणा-संदर्भातील कार्यपध्दती पाहता, अभिप्रेत आहे. तथापि असे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केलेली माहिती सर्व दुकानदारांकडून मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांची अशा प्रकारची कृती म्हणजे, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे असे समजण्यास हरकत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक २४-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २९-०५-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता यामध्ये जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परळी वैजनाथ यांनी देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्याचे आदेशित केले आहे. हा निर्णय देत असतांना जन अपिलीय अधिका-याने त्यांच्याकडील जन माहिती अधिकारी व सहायक यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कोणती माहिती दिली आहे याची शहानिशा केल्याचे आयोगास आढळून येत नाही. कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०४-२००८ रोजी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, त्यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयातील चलन व चलनाच्या प्रती खरोखरच दिल्या आहेत किंवा कसे याचा कोणताही बोध होत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी पांगरी येथील स्वस्त धान्य

दुकानाची चौकशी केली असता त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या चौकशी अहवालाप्रमाणे ए. पी. एल. व बी. पी. एल. लाभार्थी बोगस असल्याचे त्यांना आढळून आले असल्याचे नमूद केले आहे या बोगस लाभार्थ्यांची यादी अपिलार्थीने मागितली होती. या मुद्दयावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे स्पष्ट केले की, ए. पी. एल. व बी. पी. एल. याद्या मूळात केल्या नव्हत्या. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती मूळात त्यांच्याकडे अस्तित्वात नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या उर्वरित मुद्दयावरील माहिती ही संबंधित दुकानदाराकडे असणे अभिप्रेत असल्यामुळे ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना संबंधित दुकानदारावर अवलंबून राहावे लागत आहे. सबब तहसीलदार, परळी वैजनाथ यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी हस्तांतरीत करुन घेऊन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमाक ६ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या स्वस्त धान्य दुकानाची पर्यायी व्यवस्था या विषयावरील पाच संचिकांच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या नाहीत. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या याद्या १५६८ इतक्या पृष्ठांच्या असून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण ३१३६ रुपये इतक्या खर्चाच्या झेरॉक्स त्यांना काढाव्या लागतील. या झेरॉक्स काढण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे अनुदान उपलब्ध नाही. तेव्हा यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित नस्त्याची तपासणी तीस दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन करावी व त्यामध्ये त्यांना अत्यावश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, (ग्रा.प.सदस्य पांगरी), दिवाणी न्यायालय क. स्तर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८५६

निर्णय दिनांक २५-११-२००९

१ श्रीमती जयश्री दुर्गादासराव नेरळकर, : अपिलार्थी
व्दारा यक्रंस निवास, अंबावेस, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी न घेतल्यामुळे अपिलार्थी आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्या आहेत व पुढे, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर कार्यवाही करावी व अपिलार्थीस सत्य माहिती देण्याचे त्यांना आदेशित करावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रार निवारण समिती, विद्यापीठ, औरंगाबाद यांनी विद्यापीठ अधिनियम १९९४ अन्वये प्रकरण क्रमांक VII नुसार प्राप्त तक्रार अर्जावर संबंधित संस्थेने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात एकूण ९ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०८-२००८ रोजी ठेवलेल्या सुनावणीसाठी उपस्थित राहू शकत नसल्याचे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना पत्र लिहिले आणि तदनंतर वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचा दिनांक ०७-०५-२००८ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी प्राप्त झाला असून या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटते. त्यामुळे अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती आणि अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती यांचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक १, ४, ५, ७ आणि मुद्दा क्रमांक ८ व ९ मधील " खुलासा" हा भाग वगळता व मुद्दा क्रमांक २ आणि ३ मध्ये लेखी खुलासा हे अंशतः भाग वगळता उर्वरित मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाची कारणे, स्पष्टीकरणे अथवा यासंदर्भात खुलासा अशा स्वरुपाची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील " माहिती " या शब्दाच्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती देय होत नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३, ८ व ९ मधील लेखी खुलासा हा अंशतः भाग वगळता उर्वरित भाग आणि मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित संपूर्ण माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय होत आहे. यातील मुद्दा क्र. ६ वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे असे आढळून येत आहे. परंतु ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय असतांना देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ती माहिती लेखा विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची सूचना दिली होती. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. लेखा विभाग हा माहिती अधिकारी यांच्या प्राधिकरणाचा एक अविभाज्य भाग असल्याने जन माहिती अधिकारी यांनी लेखा विभागातून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरविणे अभिप्रेत आहे. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील क्रमांक ६ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी हेतुतः माहिती दडविल्याचे अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे

नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील क्रमांक ६ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती जयश्री दुर्गादासराव नेरळकर, व्दारा यक्रंस निवास, अंबावेस, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६४

निर्णय दिनांक २५-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे,<br>मु. पो. लिंबोणी बाग, गणपती मंदिराजवळ,<br>विठ्ठल रुक्मीनी मंदिराजवळ, तांबरी विभाग, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>उपकेंद्र, उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>उपकेंद्र, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे विद्यापीठाशी संबंधित प्रचंड व्याप्ती असलेली काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र, उस्मानाबाद यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र, उस्मानाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे, मु. पो. लिंबोणी बाग, गणपती मंदिराजवळ, विठ्ठल रुक्मीनी मंदिराजवळ, तांबरी विभाग, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ १८५०/०८ व १८५१/०८
निर्णय दिनांक २५-११-२००९

१ श्री. दामोधर भिकाजी मदन, : अपिलार्थी
रा. केळीगव्हाण, ता. बदनापुर, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.१०.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले क्रमांक १८५०/०८ व १८५१/०८ ही आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपिलांची सुनावणी आज दिनांक २५.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या एकाच माहितीकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे तीन वेगवेगळे अर्ज एकाच दिवशी सादर केले आहेत. यापैकी एका अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक २५.०५.२००७ रोजी केलेल्या द्वितीय अपील अर्जावर

सुनावणी घेऊन या संदर्भात आयोगाने आपले आदेश दिनांक १०.११.२००८ रोजी (अपील क्रमांक १७५०/०७) पारित केले असून या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात आले आहे. हे पाहता, अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८५०/०८ व १८५१/०८ फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दामोधर भिकाजी मदन, रा. केळीगव्हाण, ता. बदनापुर, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८५९

निर्णय दिनांक २६.११.२००९

१ श्री. रावसाहेब किसनराव कोतकर, : अपिलार्थी
रा. सिल्लोड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी ,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

त्यांचा दिनांक १०.०९.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज दिनांक १९.०९.२००८ रोजी सादर केला. तथापि प्रथम अपील करुनही त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०५.१२.२००७ रोजी दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकरी यांनी केलेली कार्यवाही अशा स्वरुपाची माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११.०९.२००८ रोजी प्रथम अपील अर्ज सादर केला. या अपील अर्जावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक ०७.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. हे पत्र अपिलार्थीस दिनांक २१.१०.२००८ रोजी प्राप्त झाले, परंतु या आधीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले होते.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतीही माहिती देऊ केली नाही. या माहितीची त्यांना आवश्यकता असून, ही माहिती जर त्यांना वेळेत दिली असती तर त्यांना पुढे आर्थिक फायदा झाला असता, परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न देऊन लावलेल्या विलंबामुळे त्यांची आर्थिक हानी झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २४.०३. २००८ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक ०१.०४.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या प्रकरणाची तत्कालीन सद्यस्थिती अपिलार्थीस अवगत करुन दिलेली आहे. अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०१.०४.२००८ रोजी पत्र पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, हे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे मूळ अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अपिलार्थीचे आहे. या मुद्यावर अपिलार्थीस त्यांच्याकडे, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः किती वेळा गेले व या संदर्भात त्यांच्याकडे काही पुरावा आहे किंवा कसे याची आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थीने असा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना दिनांक ०५.१२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे केलेल्या विनंती अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेली कार्यवाही अशा प्रकारची माहिती मागविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, विभागीय आयुक्तांकडून औरंगाबाद जिल्हा परिषदेकडे सदरचा अर्ज दिनांक १२.१२.२००७ रोजी पाठविला गेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने विभागीय आयुक्तांकडे केलेल्या दिनांक ०५.१२.२००७ रोजीच्या विनंती

अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, अपिलार्थीचा दिनांक ०५.१२.२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यापासून ते अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तदतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २४.०३.२००८ पर्यंत केलेल्या प्रथम अर्जाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीमध्ये, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संदर्भीत विषयावर वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेला पत्रव्यवहार आणि या विषयासंदर्भात त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या सर्व संबंधितांच्या टिपण्या व अभिप्रायांच्या प्रती, ही होय. अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केली नसल्याचे आज रोजीच्या सुनावणीमध्ये स्पष्ट होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हवी असल्याने त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून या कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी व्यक्तिशः उपस्थित राहून ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस माहिती देताना दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस हस्तांतरीत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रावसाहेब किसनराव कोतकर, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६०

निर्णय दिनांकः २६.११.२००९

१ श्री. अंबादास विठोबा नागरगोजे, : अपिलार्थी
रा. परळी वैजनाथ, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष भू संपादन अधिकारी,
जायकवाडी प्रकल्प,जिल्हाधिकारी कार्यालय,बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, बीड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०८.२००८ रोजी निर्णय देऊन त्यांचे प्रथम अपील मंजूर केले व अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही त्यांना त्यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी आणि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती देण्याचे आदेशित करावे, अशी विनंती आयोगास अंतिमतः केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, बीड यांच्याकडे मौ. मांडेखेल, ता. परळी वै. जि. बीड शिवारातील गट क्र.१७१ मध्ये संपादित केलेल्या पाझर तलावाच्या जमिनीबाबत मोबदला वाटपासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "मौजे मांडेखेल, ता.अंबाजोगाई सध्याचा ता. परळी वैजनाथ, जि.बीड येथील ग.नं. १७१ मध्ये असलेल्या पाझरतलावाच्या संचिकेच्या झेरॉक्स प्रत व या पाझर तलावामध्ये गेलेल्या जमीन मालकांना दिलेला मोबदला वाटपाची माहिती, चेक क्र., दिनांक, मोबदला रक्कम, वाढीव रक्कम" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली असून त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९८५ ते दि. ०५.०६.२००८ असा होता.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिला गेल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०७.२००७ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अपर जिल्हाधिकारी, बीड तथा जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली परळी तालुक्यातील ग.क्र.१७१ मधील शिवारातील पाझर तलावाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होऊ शकणार नाही. कारण त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये परळी तालुक्याचा समावेश नाही. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती व ती माहिती दुसऱ्या प्राधिकरणाशी संबंधित आहे, असे जर जन माहिती अधिकारी यांचे मत होते, तर त्यांनी त्यावेळी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत का पाठविला नाही, याची आयोगाने विचारणा केली असता, उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हे कोणतेही उत्तर देऊ शकले नाहीत. त्यांनी या मुद्यावर असे भाष्य केले की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी या पदावर श्री. एस.टी.कावळे हे अधिकारी कार्यरत होते. जन माहिती अधिकारी यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांच्या कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे त्यांना आढळून आले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामध्ये परळी तालुक्यातील ग.क्र.१७१ मधील पाझर तलावाची संचिका जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे म्हटले आहे. तथापि ही संचिका खरोखरीच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याची माहिती अपिलार्थीस कोणत्या स्त्रोताकडून प्राप्त झाली, यासंदर्भात त्यांनी कुठलाही खुलासा त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये केला नाही अथवा हा खुलासा तोंडी सादर करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस या पाझर तलावाविषयी विचारणा केली असता, त्यांनी अशाप्रकारचा

पाझर तलाव परळी तालुक्यामध्ये ग.क्र.१७१ मध्ये असल्याचे मान्य केले. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो कोणत्याही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही, तेव्हा अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी जरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित नसली तरीही या पाझर तलावाविषयी संबंधित शासकीय यंत्रणेकडून अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी प्राप्त करुन घेऊन ती उपलब्ध करुन द्यावी. हा पाझर तलाव कोणत्या योजनेतून झाला आहे, त्या योजनेमध्ये जमीन धारकास मोबदला देण्याची तरतूद आहे किंवा कसे, याचाही त्यांनी उल्लेख करुन नंतर अपिलार्थीच्या मूळ अर्जाची संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही न करुन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी ते पूर्णपणे जबाबदार होत आहेत.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन प्रथमतः अधिनियमातील कलम ७(१) च्या व कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीचा भंग केला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयीन सहाय्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी हे सर्वजण अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना

सहाय्य करणारे त्यांचे कार्यालयीन सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत शीघ्र टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. कावळे, सध्या निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंबादास विठोबा नागरगोजे, व्दारा- ॲड. परमेश्वर रंगनाथ गित्ते, दिवाणी न्यायालय, परळी वैजनाथ, जि. बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भू संपादन अधिकारी,जायकवाडी प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६१

निर्णय दिनांक: २६.११.२००९

१ श्री. संदीप बाबूराव कुलकर्णी, रा.परभणी. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे. : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.०३.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक ०३.१०.२००७ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दि. १५.१०.२००७ रोजी प्राप्त झाला, त्या अन्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भात सन १९९४ ते दि. ०३.१०.२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -

अनुकंपा तत्त्वावर नेमल्या गेलेल्या उमेदवारांचे संपूर्ण नाव, नियुक्ती दिलेले वर्ष व पद आणि ज्यांनी उमेदवाराच्या वडिलास / पतीस ज्यांनी नियुक्ती दिली होती, त्या अधिकाऱ्याचा हुद्दा -या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोठया प्रमाणात असल्याने ही माहिती कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी अपिलार्थीस पाहता येईल, असे त्यांना कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.१२.२००७ रोजी अपिलार्थीस उद्देशून एक पत्र दिले. या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दि. १८.१२.२००७ रोजी त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. २०.११.२००९ रोजी स्पीड पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ९४ सालापासूनची असल्यामुळे, ही माहिती त्यांना मोठया प्रमाणात असल्याचे त्यावेळी वाटले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. १५.१०.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी दोन

वर्षे व एक महिना इतका कालावधी घेतलेला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.११.२००९ रोजी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेले सर्व मुद्दे समाविष्ट आहेत, असे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे ही माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी प्रश्न फक्त जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती विलंबाने पुरविल्याचा आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीवरुन त्यांच्या कार्यालयाने सन १९९४ ते २००७ या कालावधीमध्ये एकूण ६३ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी दिल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती फक्त चार पृष्ठांची असून अपिलार्थीस दिलेल्या माहितीच्या आकारमानावरुन ही माहिती मोठया प्रमाणात आहे, असे कोणीही म्हणू शकणार नाही. केवळ माहिती तेरा वर्षांशी संबंधित आहे, म्हणजे ती मोठया प्रमाणात आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना वाटण्याचे कोणतेही कारण आयोगास या प्रकरणी आढळून येत नाही. याचबरोबर अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये विनंती केलेल्या माध्यमाद्वारे माहिती न पुरविता ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहण्याचे सूचित करण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा गैर आणि चुकीची आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दि. २३.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस दि. १०.१२.२००७ रोजीचे पत्र लिहून ही माहिती दि. १८.१२.२००७ रोजी पाहण्यासाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत कळविले. जन अपिलीय अधिकारी यांना देखील ही माहिती मोठया प्रमाणात आहे, असे का वाटावे, हे देखील येथे एक कोडे आहे. मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जी माहिती मागितली आहे, ती तयार झालेली माहिती जरी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावेळी बघितली असती तरी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्याचे आदेशित करणे हे त्यांना सहज शक्य होते. तथापि त्यांनी देखील माहिती अधिकाऱ्याप्रमाणेच भूमिका घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एक प्रकारे टाळले आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही.

यातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती हवी असल्याचे मूळात स्पष्ट केले होते. तथापि एवढे असूनही केवळ चार पृष्ठांची माहिती ही जन माहिती अधिकारी यांना मोठया प्रमाणात वाटल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती पाहण्यासाठी सूचना दिल्या, ही जन माहिती अधिकारी यांची कृती देखील अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याची वृत्तीच स्पष्ट करते. त्यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संचालक (आरोग्य सेवा), मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.११.२००९ रोजी स्पीड पोस्टाने व सुसंगत माहिती पाठविली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात या प्रकरणी आयोगास असे आढळून येत आहे की, मूळात माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिनियमामध्ये प्रत्येक टप्प्यावर विहित केलेला कालावधी अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु माहिती अधिकारांतर्गत माहिती अर्जदारास वेळेत उपलब्ध करुन देण्याच्या वरील तत्त्वाचे उल्लंघन उपसंचालक कार्यालयाकडून या प्रकरणात वेळोवेळी झाल्याचे या प्रकरणी आढळून आले आहे. अपिलार्थीस माहिती पाठविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.११.२००९ रोजी पत्र लिहिले होते. तथापि हे पत्र पोस्टात टाकण्यासाठी त्यांच्याकडील जावक लिपीकाला चार दिवस लागले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.१०.२००७ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने लिहिलेले पत्र प्रत्यक्षात संबंधित जावक लिपीकाने दि. २९.१०.२००७ रोजी पाठविले आहे. तसाच प्रकार अपिलार्थीच्या दि. २३.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात, प्रत्यक्षात दि. ०७.१२.२००७ रोजी पत्र

लिहूनही ते प्रत्यक्षात देण्यासाठी दि. १०.१२.२००७ ही तारीख उजाडली आहे. हे पाहता उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्या कार्यालयास अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीचे महत्त्व फारसे पटलेले दिसत नाही. तसेच अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देणे अपेक्षित असताना या संदर्भात अपिलार्थीस यासंदर्भातील पत्र माहिती अधिकाऱ्यानेच लिहिलेले आहे, हे पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाचे निःसंशयपणे उल्लंघन केलेले आहे, असे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी स्वतः सुनावणी घेऊन यासंदर्भात त्यांच्या सहीनेच जन अपिलीय अधिकारी या नात्याने इतःपर आदेश पारित करावेत. सचिव (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय,मुंबई यांच्या निदर्शनास जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाची अशाप्रकारची कार्यपध्दती येथे आणून देण्यात येत असून यासंदर्भात त्यांनी उपसंचालक यांना मंत्रालयीन स्तरावरुन आवश्यक त्या सूचना द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संचालक (आरोग्य सेवा), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संदीप बाबूराव कुलकर्णी, सी-९३, 'रमाई', ममता कॉलनी, कारेगांव रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, प्रादेशिक मनोरुग्णालय आवार, ठाणे (पश्चिम) ४०० ६०४ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, प्रादेशिक मनोरुग्णालय आवार, ठाणे (पश्चिम) ४०० ६०४ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक (आरोग्य सेवा), ५ वा मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय, मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६२

निर्णय दिनांक: २६.११.२००९

१ श्री. विजय सितारामपंत खारकर, : अपिलार्थी
रा. सेलू जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा प्रकल्प अधिकारी,
जिल्हा नागरी विकास यंत्रणा, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १२.१०.२००८ पर्यंत माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे परभणी जिल्हयातील सर्व नगर पालिकांना शासनाकडून प्राप्त होणारा निधी व कामाच्या संदर्भात सन २००१ ते मार्च २००८ या कालावधीतील काही माहिती

टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व प्रकारचा प्राप्त झालेला निधी, जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रशासकीय मान्यता दिलेल्या रकमा, अनुदानातील दरापेक्षा जास्त दराचा कालावधी स्वीकारल्यामुळे नगर पालिकाना अदा केलेली जास्तीची रक्कम, अनुदानाच्या प्रशासकीय आदेशानुसार काम न करता १० टक्के काम कमी करुन १०० टक्के बीले अदा केलेल्या रकमेची नगरपरिषदनिहाय माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून एका विशिष्ट परिपत्रकामध्ये नगरपालिकानिहाय माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना पाठविली. तथापि अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील विभागीय उपआयुक्त यांना उद्देशून केले होते, तथापि या प्रकरणी विभागीय उपआयुक्त, औरंगाबाद यांची नेमणूक झाली नसल्यामुळे विभागीय आयुक्त कार्यालयाने अपिलार्थीचे प्रथम अपील संबंधित अपर जिल्हाधिकारी, परभणी आणि मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत यांच्याकडे पाठविले. तथापि या प्रकरणी त्यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, नगर परिषद सोनपेठ यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नाही आणि नगर परिषद पाथरी यांच्याकडून त्यांना चुकीची माहिती प्राप्त झाली असल्याचे आयोगास अवगत केले व या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे पुढे

स्पष्ट केले. सोनपेठ व पाथरी वगळता उर्वरित सर्व नगरपालिकांकडून त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, नगर परिषद जिंतूर, गंगाखेड, सेलू, पाथरी व पूर्णा यांनी अपिलार्थीस अनुक्रमे दि. ०३.१०.२००८, २३.०९.२००८, ०३.११.२००८, ०७.१०.२००८ व दि. २२.११.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस सोनपेठ नगर परिषदेने माहिती देणे बाकी असून पाथरी नगर परिषदेने अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांना चुकीची वाटत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस ज्या नगर परिषदेकडून माहिती अपेक्षित आहे, त्या सर्व नगर परिषदा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मधील तरतुदीनुसार स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहेत. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांकडे स्वतंत्रपणे अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी लागेल. तसेच या सार्वजनिक प्राधिकरणाचे मुख्याधिकारी हे त्या नगर परिषदेचे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. या परिस्थितीत अपिलार्थीने जिल्हयाधिकाऱ्याकडे प्रथम अर्ज व नंतर विभागीय उपआयुक्तांकडे प्रथम अपील करणे, ही त्यांची कृती चुकीची आहे. अपिलार्थीस आता फक्त सोनपेठ नगरपरिषदेकडून माहिती प्राप्त होणे बाकी आहे आणि पाथरी या नगर परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती त्यांना चुकीची वाटत आहे. अपिलार्थीच्या या मुद्याचा विचार करता मुख्याधिकारी, नगर परिषद, सोनपेठ आणि मुख्याधिकारी, नगर परिषद, पाथरी यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, जो त्यांना विभागीय आयुक्त कार्यालयाकडून दि. २०.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाला आहे, त्यावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

संबंधित मुख्याधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे नगरपरिषदनिहाय स्वतंत्रपणे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद सोनपेठ व मुख्याधिकारी, नगर परिषद, पाथरी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१२.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय सितारामपंत खारकर, आदर्श नगर, १८, “पितृकृपा”, सेलू, ता. सेलू जि.परभणी
२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास यंत्रणा, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, सोनपेठ, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पाथरी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी
६.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६३

निर्णय दिनांक: २६.११.२००९

१ श्री. महेश तुळशीराम कदम : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यास तीन दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेश दिले असताना देखील त्यांना माहिती न पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. सांगवी (मार्डी), सांगवी (काटी), वडगाव (देव) व वडगाव (लाख) या ग्रामपंचायतीमध्ये नेमणूक दिल्या गेलेल्या कंत्राटी ग्रामसेवकाशी संबंधित जून २००४ ते जून २००८

या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०००/- इतके भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०९.२००८ रोजी अंतिम सुनावणी ठेवून त्याच दिवशी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्यानंतर अपिलार्थीने गट विकास अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ११.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना संपूर्ण माहिती मिळाली असून या पत्रामध्ये प्राप्त माहितीवर त्यांचे समाधान झाले आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याने त्यांचा अर्ज निकाली काढावा, अशी या पत्रामध्ये गट विकास अधिकाऱ्यास विनंती केली आहे. परंतु यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे कारण दर्शवून राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व  जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीची त्यांना दि. २२.०८.२००८ व ११.०९.२००८ रोजी प्राप्त झालेली दोन पत्रे आयोगास सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाल्याचे कबूल केल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील एकूण ८

मुद्यांपैकी मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अशाप्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात, "तपासणी केली असल्यास त्याच्या "टिपणी" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कदम महेश तुळशीराम, आनंद नगर, हडको, मु.पो. तुळजापूर, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६५
निर्णय दिनांक २६/११/२००९

१ श्री. शिवदास दामोधर शहाणे, : अपिलार्थी
रा. अंबड, जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती (सिंचन विभाग), लघुपाटबंधारे
उपविभाग, अंबड, जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, सिंचन विभाग, जालना

**निर्णय**

श्री. शिवदास दामोधर शहाणे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ३१.०१.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१७.०३.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक १६.०७.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ४७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे, मु.पो. नुतन वसाहत, ठाकुर नगर, अंबड, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०४१
निर्णय दिनांक  २६/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. किशोर भिकनसिंग राजपूत,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित,<br>शिवज्योती कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, औरंगाबाद | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २९.०७.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या अर्जास सदर बँकेच्या माहिती अधिकाऱ्याने दि. ०६.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देता येणार नाही, असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६.०८.२००८ रोजी प्रथम

अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी दि. ०६.०९.२००८ रोजी सुनावणी घेऊन दि.०८.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशान्वये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत परिपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे व्यवस्थापक, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, औरंगाबाद यांना आदेशित केले. तथापि यानंतरही हवी असलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम, २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०४१ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नविन औरंगाबाद, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्यादित, शिवज्योती कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८४३
निर्णय दिनांक २६/११/२००९

१ श्री. गाडेकर महेशकुमार विष्णू, : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
नगर परिषद, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा गृह निर्माण समिती, जिल्हाधिकारी
कार्यालय, लातूर

**निर्णय**

श्री.गाडेकर महेशकुमार विष्णू यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०८.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ३१.०७.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२३.११.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गाडेकर महेशकुमार विष्णू, लाड गल्ली, गणपती चौक, लातूर, ता.जि. लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८४४
निर्णय दिनांक २६/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गाडेकर महेशकुमार विष्णू,<br>रा. लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित<br>प्राथमिक व माध्यमिक शाळा, लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव / उपाध्यक्ष,<br>महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर | | |

**निर्णय**

श्री.गाडेकर महेशकुमार विष्णू यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २२.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.०३.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०५.०४.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गाडेकर महेशकुमार विष्णू, लाड गल्ली, गणपती चौक, लातूर, ता.जि. लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६४

निर्णय दिनांक २६-११-२००९

१ श्री. सय्यद जहिरोद्दीन कादरी, : अपिलार्थी
खाजानगर, गल्ली नं. १५,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा समाजकल्याण अधिकारी (तथा पोलीस उप अधीक्षक,
दक्षता पथक), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, बी-२६,
सिडको एन-४ व्दारा जय भवानी नगर, शिवाजी महाराज
पुतळ्याजवळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा समाजकल्याण अधिकारी (तथा पोलीस उप अधीक्षक,
दक्षता पथक), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, बी-२६,
सिडको एन-४ व्दारा जय भवानी नगर, शिवाजी महाराज
पुतळ्याजवळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस) विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १. श्रीमती आसिका बेगम

२. श्रीमती सईदा बेगम

३. अब्दुल अहमद मुसा

४. श्रीमती समीना बेगम

५. श्रीमती अफसरी बेगम

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले असता त्यांच्या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक ०६-०८-२००८ रोजी प्राप्त झाला, त्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, क्रिसेंट शिक्षण संस्था संचलीत औरंगाबाद येथील पाच कर्मचा-यांचे जातीचे प्रमाणपत्र तसेच त्यांच्या कार्यालयामार्फत केलेल्या जाती पडताळणी प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये श्रीमती आसिका बेगम, श्रीमती सईदा बेगम, श्री. अब्दुल अहमद मुसा, श्रीमती समीना बेगम व श्रीमती अफसरी बेगम या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन संबंधित संस्थेने त्रयस्थ पक्षाच्या जाती पडताळणीचा प्रस्ताव त्यांच्या कार्यालयास पाठविला नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-१०-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०७-११-२००८ रोजी पारीत केले. या सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांनी उपस्थित राहण्याचे सूचित करुनही अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६-०९-२००८ रोजी पुरविली असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी, सर्व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीच्या केलेल्या मूळ अर्जामध्ये क्रिसेंट शिक्षण संस्थेच्या कर्मचा-यांची फक्त नांवे दिली आहेत. या संस्थेने त्यांचे जात पडताळणीचे प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे कोणत्या संदर्भाने पाठविले त्याचा कोणताही उल्लेख या अर्जामध्ये केलेला नाही. तरी त्यांनी त्यांच्याकडील आवक रजिस्टरवरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेतला असता संबंधित त्रयस्थ पक्षांचे जात पडताळणी प्रस्ताव त्यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याचे त्यांना संबंधित अभिलेखावरुन आढळून आले व तसे त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कळविले देखील आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती संदर्भहीन आहे. या अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. क्रिसेंट शिक्षण

संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदरचे प्रस्ताव कधी पाठविले याचा कोणताही संदर्भ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे दर वर्षी अंदाजे २०,००० इतक्या जात पडताळणी प्रमाणपत्राच्या वैधतेसंदर्भात कार्यवाही केली जाते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा प्रस्ताव अभिलेख्यात फक्त नावावरुन शोधणे जिकिरीचे काम आहे. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या नावावरुन संबंधित त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील प्रस्ताव त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाले आहेत किंवा कसे याचा शोध घेतला. परंतु त्रयस्थ पक्षासंदर्भात अशा प्रकारचे प्रस्ताव प्राप्त झाले नसल्याचे त्यांना आढळून आले आहे. हे संदर्भ देण्यासाठी अथवा जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज देखील आयोगासमोर उपस्थित नाहीत. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संदर्भहीन माहिती व ती देखील मोघम स्वरुपाची असल्याने व पर्यायाने ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या पार्श्वभूमीवर अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद जहिरोद्दीन कादरी, खाजानगर, गल्ली नं. १५, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस) विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६६

निर्णय दिनांक २६.११.२००९

१ श्री. व्यंकट गोविंदराव पवार, : अपिलार्थी
रा. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक
संचालनालय, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक
संचालनालय, पुणे

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. त्रयस्थ पक्ष बी.टी.गोरे सहशिक्षक, नरेंद्र आर्यविद्यालय, आपसिंगा यांच्या प्रकरणी त्यांच्या कार्यालयात दिनांक ०७.०५.२००८ रोजी घेलेल्या सुनावणीच्या इतिवृत्तीची व

सुनावणीनंतर घेतलेल्या निर्णयाची / कार्यवाहीची प्रत, मागितली होती. तथापि यापैकी त्यांना फक्त सुनावणीसाठी इतिवृत्ताची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली असून या इतिवृत्ताप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली, असेही त्यांना अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ७ मे २००८ ते २७ मे २००८ या कालावधीशी संबंधित अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक २२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६.०९.२००८ रोजी आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १९.०९.२००८ रोजी अशा इतिवृत्तीची प्रत प्राप्त झाली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अेर्जातील माहितीपेक्षा एकच मुद्यावरील माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक पुणे यांच्याकडे दिनांक २८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. शिक्षण संचालक यांच्या नेहमी प्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडे तसे प्रलंबित ठेवून परिणामी अपिलार्थीस त्यांच्याकडील मूळ अर्जातील उर्वरित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये विचारणा केलेल्या सुनावणी प्रकरणी त्यांनी संचालनालयामार्फत दिनांक २६.०२.२००९ रोजी सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे श्री. बी.टी.गोरे यांच्या वाढीव पदास मंजूरी देण्याबाबत प्रस्तावीत केले असून, या प्रस्तावाची प्रत श्री. बी.टी. गोरे यांना तसेच श्री. व्ही. जी. पवार अपिलार्थी, यांना देखील अग्रेषित करण्यात आलेली आहे. यावरुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या सुनावणीच्या कार्यवाही संदर्भात अपिलार्थीस अवगत केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत केलेल्या मूळ अर्जातील प्रादेशिक परिच्छेदात जे बदल असून या प्रकरणाशी संबंधित आवश्यक ती कारवाई त्यांनी केली आहे. तथापि त्यांची ही कृती बरोबर नाही, कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर केलेली कार्यवाही याचा अर्थ उपरोक्त प्रकरणी श्री बी.टी.गोरे यांच्या संदर्भात शिक्षण संचालक यांच्या कार्यालयात दिनांक ०७.०९.२००८ रोजी घेतलेल्या सुनावणीनंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५.०६.२००८ रोजीपर्यंतच्या कालावधीतील या प्रकरणाशी संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहारची प्रत व त्यांच्याकडील अभिलेख्यावरुन टिपणीची प्रत, असा उल्लेख आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रकरणी त्यांच्या अपीलावर जर मार्गी लावून त्यांची प्रत अपिलार्थीस दिली असेल तर शिक्षण संचालकाकडे दिनांक ०७.०५.२००८ रोजी झालेल्या सुनावणीनंतर त्यांनी केलेली कारवाई असे त्यास मानता येणार नाही. सबब जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी (बी.टी.गोरे) यांच्या या प्रकरणी दिनांक ०७.०५.२००८ ते २५.०६.२००८ या कालावधीमध्ये या प्रकरणाशी संबंधित इतर प्राधिकरणाकडे केलेल्या पत्रव्यवहाराची व या संदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्याची याच कालावधीतील सर्व टिपणीच्या प्रती, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

आयोगास या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक २५.०६.२००८ रोजी केला होता. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२.०६.२००८ रोजी प्राप्त झाला. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१.०८.२००८ रोजी अगर तत्पूर्वी सशुल्क माहिती देणे त्यांना अनुज्ञेय आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास मुळात प्रथम प्रतिसाद अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीतीपेक्षा २१ दिवस इतक्या विलंबाने दिला असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (६) च्या तदतुदीप्रमाणे विनामूल्य देय होत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी या प्रकरणी माहितीपोटीचे स्विकारलेले शूल्क रु. ३८ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत परत करावे, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

३. अपील मान्य करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या सुनावणी न घेतलेल्या निर्णयाच्या कारवाईची प्रत, ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. व्यंकट गोविंदराव पवार, मराठवाडा शिक्षक संघ, समतानगर, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६८

निर्णय दिनांक २६-११-२००९

१ सौ. मंगल हिरालाल घुमरे, : अपिलार्थी

मु. पो. कोळगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

त्रयस्थ पक्ष : नूतन कोळेश्वर विद्यामंदिर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न होऊ शकल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नूतन कोळेश्वर विद्यामंदिर, कोळगांव, तालुका गेवराई या माध्यमिक

शाळेच्या इमारत भाडे व स्थलांतराबाबत एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या शाळेच्या इमारतीच्या भाड्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने सन १९८४-८५ पासून आजपर्यंत वर्षनिहाय शाळेच्या इमारत भाड्यापोटी किती रक्कम अदा केली, इमारत मालकाचे नांव व त्यांना दिलेले वर्षनिहाय भाडे व सदर शाळा एका इमारतीमधून दुस-या इमारतीमध्ये स्थलांतर करतांना घेतलेल्या परवानगी आदेशाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुख्याध्यापक, नूतन कोळेश्वर विद्यालय, कोळगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांच्याकडे मागणी करुन या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली होती. तथापि सदर पत्र प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अशा प्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागवूनही या

प्रकरणी उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जाची प्रत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. मूळात शिक्षणाधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून शाळेच्या इमारतीच्या भाड्यास दरवर्षी संबंधित शाळांना अनुदान देखील दिले जात असते. तसेच अशा भाड्याच्या शाळेचे स्थलांतर करतांना देखील शिक्षण विभागाच्या सक्षम प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त होणे आवश्यक असते. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असावयास हवी होती. परंतु अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती स्वतःच्या कार्यालयात शोधण्याच्या ऐवजी जन माहिती अधिकारी यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे या माहितीची विचारणा केली. त्यांची ही कृती त्यांच्या कार्यालयाच्या माहिती व्यवस्थापनामधील त्रूटीचे निर्देशक आहे असे येथे म्हटल्यास वावगे होणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या अपील अर्जावर

कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची सचिव (शालेय शिक्षण) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. मंगल हिरालाल घुमरे, मु. पो. कोळगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६१

निर्णय दिनांक २६-११-२००९

१ श्री. भरत सटवाजीराव खंडेराय, : अपिलार्थी
नाईकवाडी गल्ली, बिलोली, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती आणि तीही विलंबाने दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष कै. सटवाजीराव संभाजीराव खंडेराय व इतर कर्मचा-यांच्या संदर्भात आस्थापना विषयक बाबींची विस्तृत स्वरुपाची माहिती एकूण दहा मुद्दयाव्दारे, व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली व जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती सात दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०९-२००८ रोजी अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०९-२००८ रोजी सर्व माहिती विनामूल्य हस्तांतरीत केली आहे. यापेक्षा कोणतीही जास्त माहिती त्यांच्याकडे नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने व अपूर्ण माहिती मिळाल्याने विचाराधीन

अपील सादर केले आहे. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता यावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा उपस्थित झाले याचा कोणताही लेखी पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत अथवा तदनंतर आयोगास सादर केलेला नाही. तसेच यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस अपूर्ण माहिती प्राप्त झाल्यासंदर्भात असे नमूद करण्यात येत आहे की, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणत्या मुद्दयावर माहिती देणे बाकी आहे याचा खुलासा त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये केला आहे. परंतु अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ ते १० संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०९-२००८ रोजी दिल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे दोनही मुद्दे निकाली निघत असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भरत सटवाजीराव खंडेराय, नाईकवाडी गल्ली, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८५८

निर्णय दिनांक २६.११.२००९

१ श्री. गणेश भिमराव ढासलेकर, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य अभियंता, ओ अँड एम झोन,
विद्युत भवन, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य अभियंता, ओ.अँड एम. झोन,
विद्युत भवन, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीअंतर्गत त्यांनी दिनांक २५.०७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांनी माहिती न दिल्याने अपिलार्थीने दिनांक ०९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन

अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५.०६.२००५ पुर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांची आणि ६ जुन नंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या सर्व कार्मचाऱ्यांची कर्तव्ये जबाबदाऱ्या, कार्यभार, या मुद्यासंदर्भात माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १२२ इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र पाठविल्याचा पुरावा आयोगास सादर केला, या पुराव्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र दिनांक २५.०८.२००८ रोजी पाठविल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे शुल्काचा भरणा न करता दिनांक ०९.०९.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास उद्देशून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२.०९.२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे माहिती अधिकाऱ्याने कळविलेले शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरुन प्रथम माहिती प्राप्त करुन घ्यावी, तदनंतर प्रथम अपील करावे अशी लेखी सूचना दिली होती. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अस्तित्वात असतांना व नंतर या मंडळाचे कंपनीमध्ये विभाजन झाल्यानंतर त्यांच्याकडे जुन्या व नव्या कर्मचाऱ्यांच्या जबाबदारीमध्ये अथवा कार्यभारामध्ये कोणताही फरक पडला नाही. तसेच त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठी अर्ज करतेवेळी विद्युत कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा कार्यभार निश्चित केला गेला नव्हता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्याने दिनांक २२.०८.२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्यासाठी सूचित केले होते. तथापि केवळ अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या दिनांक २५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी दिनांक २२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अधिनियमातील कलम ७ (१) द्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचे हे पत्र त्यांनी दिनांक २५.०८.२००८ रोजी या ३१ व्या दिवशी, माहिती देण्याची कलम ७ (१) मधील ३० दिवसांची मुदत टळून गेल्यानंतर, पाठविले आहे. त्यामुळे सहाजिकच जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २२.०८.२००८ रोजीचे प्रथम प्रतिसादाचे पत्र अवैध ठरत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस, अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार, अपिलार्थीने मागणी केलेल्या माध्यमाद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी लागेल.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य या प्रकरणी विहित कालावधीत बरोबर बजावले होते. तथापि त्यांच्याच प्राधिकरणातील संबंधित कार्यालयातील जावक शाखेने अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी दिलेल्या

उत्तराचे पत्र हे ३ दिवस उशिराने पोष्टाने पाठविले आहे. या दिरंगाईस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित जावक लिपिक जबाबदार आहेत. त्यामुळे अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास आलेल्या खर्चाची जबाबदारी संबंधितांच्यावर निश्चित करुन आवश्यक वाटल्यास त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पूरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश भिमराव ढासलेकर, द्वारा, एन-२,एल-३/९/२, सिडको, श्रीरामनगर मुकूंदवाडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, औरंगाबाद परिमंडळ, विद्युत भवन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय, विद्युत भवन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६७

निर्णय दिनांक २६.११.२००९

१ श्री. लक्ष्मीकांत भगवानराव दडके, : अपिलार्थी
रा. पाथरी, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती, मानवत, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती, मानवत, जि. परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती,मानवत, जि. परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना तालुका आरोग्य अधिकारी यांनी असमाधानकारक माहिती दिली असल्याने आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जासोबत अपिलार्थीने एक वेगळा अर्ज केला असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती

अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे टाळले असल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्या अर्जासोबत जोडलेल्या दिनांक ०९.०६.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या प्रथम अर्जाच्या प्रतीबरोबर त्यांच्या कथित दिनांक ०९.०६.२००८ रोजीच्या अर्जाची प्रत जोडलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार दिनांक १८.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे मुळात दाखल झाले नसल्याने या अपील अर्जावर त्यांनी निर्णय देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे आयोगास अवगत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे कथित प्रथम अपील दाखल केल्यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी तालुका आरोग्य अधिकारी तालुका मानवत यांच्याकडून अपिलार्थीच्या कथित दिनांक ०९.०६.२००८ रोजीच्या अर्जाची प्रत आयोगाने मागवून घेतली व तिचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने श्री. कृष्णा भगवानराव चौधरी, तालुका आरोग्य अधिकारी यांना उद्देशून हा अर्ज केला असून या अर्जामध्ये त्यांनी ३ वेगवेगळया पत्रांचे संदर्भ देऊन या पत्राद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस खुलासेवार देण्यात यावी, अशी विनंती केली आहे. तथापि यावरुन अपिलार्थीने माहिसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित निश्चित कोणती माहिती आहे याचा कोणताही बोध आयोगास होत नाही. या अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना माहिती देण्याची विनंती केली

आहे. अशा प्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेली "माहिती" नसल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मीकांत भगवानराव दडके, रा. पाथरी, ता.पाथरी, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, मानवत, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, मानवत, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३
निर्णय दिनांक २७-११-२००९

१ श्री. बापू शिवराम लोंढे, : अपिलार्थी
रा. माका, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नेवासा, जि.अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नेवासा, जि.अहमदनगर
प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत माका,
ता.नेवासा,जि. अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १९.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष श्री. गोरक्षनाथ हरीभाऊ घुले यांची घरपट्टी व पाणीपट्टीची थकबाकी व थकबाकीची रक्कम भरलेली तारीख व पावतीची झेरॉक्स प्रत अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा यांना उद्देशून केला होता. त्यांनी सदर अर्ज अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे दि. २१.०५.२००९ रोजीच्या

पत्राव्दारे, या माहितीशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, माका ता. नेवासा यांच्याकडे पाठविला व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०६.२००९ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नेवासा तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशा नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि अपिलार्थी उपस्थित आहेत

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी त्यांनी आयोगास अशी स्पष्ट केली की, त्रयस्थ पक्ष हे माका ग्रामपंचायतीचे सरपंच असून त्यांच्याकडे थकबाकी असतानाही ते सरपंच झाले व थकबाकीसंदर्भात आपल्यावर कारवाई होऊ शकते याची कल्पना आल्यानंतर सरपंच झाल्यावर त्यांनी थकबाकी भरली. अशी प्रकरणे, व्यापक जनहितार्थ, उघड करण्यासाठी त्यांना त्यांनी मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय दिला नाही. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी, संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सुनावणीची नोटीस पाठवूनही, ते उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने जरी त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागविली असली तरी, ते यातून कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, हे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे असे आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची माहिती असल्याने ती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होईल व त्याद्वारे कलम ८(१) च्या कोणत्याही तरतुदींचा भंग होणे संभवत नसल्याने, ती उघड करण्यास हरकत नसावी. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत माका, ता.नेवासा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असूनही त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती यांनी टाळले आहे. अपिलार्थीने ज्या वेळी माहितीची मागणी केली त्यावेळी श्री. ए.के. म्हस्के नावाचे ग्रामसेवक हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. ते सध्या पंचायत समिती, शेवगाव येथे ग्रामसेवक या पदावर कार्यरत आहेत. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर अनुपस्थित आहेत. सबब श्री. ए.आर. म्हस्के, ग्रामसेवक तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती त्यांना देण्याची तयारी न दर्शविता, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास,

अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी श्री. दहिफळे सध्याचे ग्रामसेवक व गट विकास अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर सुनावणीसाठी विनापरवानगी अनुपस्थित राहिल्यामुळे व त्यांचा कोणीही प्रतिनिधी सुनावणीसाठी न पाठविल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. ए.आर.म्हस्के (सध्या पंचायत समिती, शेवगाव अंतर्गत कार्यरत) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार

यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: २७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. बापू शिवराम लोंढे, मु.पो. माका, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,माका, ता. नेवासा, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, माका, श्री. ए. आर. म्हस्के, (सध्या पंचायत समिती, शेवगाव जि.अहमदनगर येथे कार्यरत ) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (मार्फत : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगांव, जि. अहमदनगर) ( नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नेवासा, जि.अहमदनगर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४
निर्णय दिनांक २७-११-२००९

१ श्री. नालकुल बाबासाहेब जाधव, : अपिलार्थी
रा. चिचोंडी पाटील, ता.जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
राज्य परिवहन,आष्टी आगार,
जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, बीड विभाग,
बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : आगार प्रमुख,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
आष्टी आगार, जि.बीड

त्रयस्थ पक्ष : वाहक श्री. लटपटे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि या अपील अर्जामध्ये त्यांनी माहितीपोटीचे भरलेले शुल्क रु. १३२०/- इतके त्यांना परत करण्याबाबत आणि अपूर्ण माहिती दिल्यामुळे संबंधितांच्यावर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे सन २००६ पासूनच्या कालावधीतील आष्टी आगाराच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण १६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १३२०/- इतके राज्य परिवहन आष्टी आगार यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. ०४.०५.२००९ रोजी शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०५.२००९ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय दि. २९.०५.२००९ रोजी दिला. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाचा मुद्देनिहाय आढावा घेतला असून या सुनावणीच्या दिवशीच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त झाल्याचे प्रथम अपीलाच्या निर्णयावरुन दिसून येते. तथापि संपूर्ण माहिती न मिळाल्यामुळे व या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही काही मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस त्यांनी द्वितीय अपील अर्ज करेपर्यंत मिळाली नसल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १२ च्या संदर्भात दिलेली माहिती खोटी आहे व मुद्दा क्र. १५ व १६ ची माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. ही माहिती जन माहिती अधिकाऱ्याने प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी

अपिलार्थीस दि. ३०.०५.२००९ पर्यंत देण्याचे मान्य करुनही त्यांना ती अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही. मुद्दा क्र. ११ च्या संदर्भात माहिती खोटी कशी आहे हे आयोगाने अपिलार्थीस विचारले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी दिलेली माहिती आज त्यांच्यासोबत आणली नसल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीच्या विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती वा अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारणपणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली होती. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना वेळेत माहिती मिळाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्ञात करुन घेऊन आणि त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्या शुल्काचा भरणा करुन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्याचे कर्तव्य हे अपिलार्थीचे होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०५.२००९ रोजी, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०५.२००९ रोजीच्या पत्रामध्ये सूचित केल्याप्रमाणे रु. १३२०/- इतक्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला. अपिलार्थीस शुल्क भरण्यासाठी लिहिलेल्या पत्राचा दिनांक व अपिलार्थीने प्रत्यक्षात शुल्क भरल्याचा दिनांक यामधील कालावधीचा फरक लक्षात घेता अपिलार्थीस ही माहिती दि. ०८.०५.२००९ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण स्वरुपात व सशुल्क देय होत होती. अपिलार्थीकडे, ते दि. ०४.०५.२००९ ते दि. ०८.०५.२००९ या

कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली असे मानता येणार नाही, उलट अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०५.२००९ ते ०८.०५.२००९ या कालावधीत उपस्थित न राहून त्यांचे उत्तरदायित्त्व वेळेत पार पाडले नसल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरुनही त्यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली, असा मुद्दा उपस्थित केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २९.०५.२००९ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, या निर्णयामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १०, १४,१५ व १६ या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस दि. ३०.०५.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केल्याचे सुनावणीच्या इतिवृत्तावरुन दिसून येते. यापैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. १० व १४ च्या संदर्भात माहिती मिळाली आहे. मुद्दा क्र. १४ च्या संदर्भातील माहिती खोटी असल्याचा अपिलार्थीचा आक्षेप आहे. या मुद्यावर अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी या मुद्यावर, 'निरंक' अशी माहिती दिली आहे, ते बरोबर आहे. या माहितीस खोटी माहिती असे आवश्यक त्या सबळ पुराव्या अभावी सिध्द करता येणार नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून खोटी माहिती मिळाल्याचा मुद्दा देखील निकालात निघत आहे. अपिलार्थीने आजच्या युक्तिवादामध्ये त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १५ व १६ च्या संदर्भातील माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे नमूद केले आहे. या मुद्यावर आयोगास असे आढळून आले आहे की, या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस दि. ३०.०५.२००९ पर्यंत देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी कबूल करुनही, अपिलार्थीस या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेली नाही या अपिलार्थीच्या विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी उपस्थित नाही. हे पाहता अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १५ व १६ च्या संदर्भातील माहिती अद्यापपावेतो दिली गेली नाही, असा आयोग निष्कर्ष काढत आहे.

अपिलार्थीकडून संपूर्ण माहितीपोटीचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस संपूर्ण माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कर्तव्य आहे. तथापि या प्रकरणी दि. २५.०५.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांनी, त्यांच्याकडून संपूर्ण माहितीचे शुल्क प्राप्त करुन घेऊनही त्यांना प्रथमतः संपूर्ण माहिती न देता अपूर्ण माहिती दिली, हे मात्र या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस ही माहिती विहित कालावधीमध्ये जन माहिती यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून त्यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांच्याकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १३२०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत परत करावे व या कालावधीमध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १५ व १६ च्या संदर्भातील माहिती विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी, असे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याचे कबूल करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती दिली नाही, त्यांनी अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीचा भंग केल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बीड विभाग,बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १५ व १६ संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी तसेच याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु. १३२०/- इतके त्यांना परत करावे.

३. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बीड विभाग यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. नालकुल बाबासाहेब जाधव,रा. चिंचोडी पाटील, ता.जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, आष्टी आगार, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, बीड विभाग,बीड या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५
निर्णय दिनांक २७-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख मुनीर फकीरसाहब धडवाई,<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सिटी ऑफीसर,<br>अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमी अभिलेख,<br>अहमदनगर | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने समाधानकारक उत्तर दिले नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अहमदनगर शहरातील एकूण ३७ सिटी सर्व्हेनंबर व मालकीहक्कासंदर्भात अनेक मुद्यांद्वारे खुलासेवजा माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात काही माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम

१९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले आणि अपिलार्थीस त्यांनी माहितीसाठीच्या अर्जाद्वारे ज्या मिळकतीच्या मालकीहक्कासंदर्भात आक्षेप उपस्थित केले आहेत त्या मिळकतीच्या संदर्भात सर्व धारीका(संचिका) व नोंदवहया अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हा निर्णय मान्य न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या एकूण युक्तिवादावरुन त्यांना त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या ३७ सिटी सर्व्हेनंबरच्या मालकीहक्काच्या नोंदीमध्ये झालेल्या फरकाबद्दल व सदर फरक कसा झाला, यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, या सर्व सिटी सर्व्हेक्रमांकाच्या मालकीहक्कासंदर्भात १९११ साली चौकशी झाली होती व या चौकशीअंती काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे काही सिटी सर्व्हेनंबरवर अपिलार्थी यांचे नाव आढळून येत नाही. अपिलार्थीस त्यांचे नाव का आढळून येत नाही, यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित आहे. अपिलार्थीने ज्या मुद्यावर दावा उपस्थित केला आहे, तो मुद्दा हा दिवाणी न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी दिवाणी न्यायालयाकडे जाणे योग्य राहिल, असे त्यांचे म्हणणे आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या आजोबांच्या सर्व मिळकतीवर ज्या व्यक्तींची नावे लावण्यात

आली आहेत, त्यांचा कायदेशीर हिस्सा आहे का ? व या सारख्या आणखी बोगस वारसांची नावे लावली आहेत का ? या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित आहे, असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची प्रचंड व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, सार्वजनिक सुटी वगळून कोणत्याही कामकाजाच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून संबंधित सर्व अभिलेख्यांची तपासणी करावी,जेणेकरुन त्यांच्या मनात असलेल्या शंका दूर होऊ शकतील. या अभिलेख्यांच्या तपासणीमध्ये अपिलार्थीस ज्या कागदपत्रांच्या प्रती घेणे आवश्यक वाटते, त्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तात्काळ सशुल्क पुरवाव्यात, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना असेही सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या सर्व ३७ मिळकतीसंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सन १९११ साली केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रती व इतर तदनुषंगीक सर्व अभिलेखे त्यांनी अपिलार्थीस या कालावधीमध्ये पाहणीसाठी पूर्वनियोजित वेळी उपलब्ध करुन द्यावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या सर्व ३७ मिळकतीसंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सन १९११ साली केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रती व इतर तदनुषंगीक अभिलेखे अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत पूर्वनियोजित वेळी पाहणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत व या

अभिलेख्यांतील ज्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस हव्या असतील, त्या प्रती त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये सशुल्क पुरवाव्यात.

**अहमदनगर**
**दिनांकः २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शेख मुनीर फकीरसाहब धडवाई, व्दारा- अब्दुल कादर शेख अहमद, घर नं. ५२६८, कासमखानी मस्जिद, कलेक्टर ऑफिसजवळ, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६
निर्णय दिनांक २७-११-२००९

१ श्री. विठ्ठल रंगनाथ देशमुख, : अपिलार्थी
रा.जवळे कडलग, ता.संगमनेर,
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, संगमनेर, जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, संगमनेर,
जि.अहमदनगर.

त्रयस्थ पक्ष : श्री. भिमा गणपत पारधी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना तहसीलदार यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. भिमा गणपत पारधी यांनी सन १९९० ते १९९१ या कालावधीमध्ये सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"प्रतिज्ञापत्र १९९० ते १९९१ यावर्षी श्रीयुत भिमा गणपत पारधी यांना दिलेले आहे त्या प्रतिज्ञापत्राची मूळ नक्कल व त्याची तारीख देण्यात यावी आपण दिलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे उपविभागीय अधिकारी साहेब पाटबंधारे विभाग धुळेवाडी यांनी श्रीयुत भिमा गणपत पारधी या इसमाचा सर्वीस पुस्तकात वयाची नोंद करुन घेतली आहे. मा. तहसीलदारसाहेब यांनी दिलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन हया इसमाची वयाची सर्वीस पुस्तकात नोंद करावी,असा आदेश दिला होता. आदेश नसेल तर आपण नोंद करणारा अधिकारी व कर्मचारी यांच्यावर काय कार्यवाही करणार व दिलेले प्रतिज्ञापत्राची पहाणी चौकशी करावी व आपण वरील सर्व माहितीच्या २००५ च्या कलमाने द्यावे. वय ठरवायचा अधिकार हे गट विकास अधिकारी यांनाच आहे असे समजले."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र नोंदणीकृत डाकेद्वारे पाठविले होते. तथापि अपिलार्थी त्यांच्या निवासस्थानी न आढळल्याने सदर पोस्टमन सात वेळा जाऊनही, अपिलार्थीने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर ते उपलब्ध न झाल्याने, अपिलार्थीस या पत्राची तामिली झाली नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. ०६.०५.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि हा निर्णय मान्य न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्षा उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली त्रयस्थ पक्षाच्या प्रतिज्ञापत्राची मूळ नक्कल त्यांच्याकडे उपलब्ध नाही. कारण त्यांच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार त्यांच्या समोर केल्या जाणाऱ्या प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत त्यांच्याकडे ठेवली जात नाही. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित कार्यवाही ही त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने आणि अशी कार्यवाही करण्याकरिता त्यांना कोणतेही अधिकार नसल्याने त्यांनी या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०२.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे रजिस्टर्ड पोस्टाने पुरविली होती. परंतु संबंधित पोस्टमनला अपिलार्थी त्यांना दिलेल्या पत्त्यावर पोस्टमन सात वेळा जाऊनही आढळून आले नाहीत. यानंतर त्यांनी अपिलार्थीस या पत्राची प्रत त्यांच्याकडील तलाठयामार्फत देण्याचा देखील प्रयत्न केला होता. परंतु तलाठी हे अपिलार्थीने नमूद केलेल्या पत्त्यावर दोन वेळा जाऊनही त्यांना अपिलार्थी हे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर आढळले नाहीत. तलाठयाने तसा पंचनामा देखील केलेला आहे. या पंचनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पुरेसा सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये, तहसीलदाराच्या समोर दिलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे त्रयस्थ पक्ष, श्री. भिमा गणपत पारधी यांनी त्यांच्या सेवापुस्तिकेत त्यांच्या वयाची नोंद करुन घेतली आहे व ही नोंद खोटी आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे, त्यामुळे ही नोंद करणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार, अशी माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. मूळात त्रयस्थ पक्षाच्या जन्मतारखेची नोंद घेणे हे काम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यकक्षेत येत नाही आणि नोंद घेणारे अधिकारी देखील त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील नाहीत.त्यामुळे जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जन माहिती अधिकाी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०२.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य वाटतो. तथापि अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या शपथपत्राची नक्कल हवी असल्यास त्यांनी त्रयस्थ पक्ष ज्या कार्यालयात नोकरीस आहेत, त्या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियमानुसार स्वतंत्र अर्ज करावा, असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही भाग जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नाही आणि उर्वरित भागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे देय नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. विठ्ठल रंगनाथ देशमुख,रा.जवळे कडलग, ता.संगमनेर,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, संगमनेर, जि.अहमदनगर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७
निर्णय दिनांक २७-११-२००९

१ श्री. शेख अनिस बुढन, : अपिलार्थी
रा. श्रीरामपूर,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी,
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे एमएच-१५-बीएन-३६८ या मारोती व्हॅन गाडीच्या आर.सी.बुकची प्रत अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४७/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय

अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व प्रत्यक्षात माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास असा खुलासा केला की, त्यांना एमएच-१५,बीएन-३६८ या क्रमांकाच्या गाडीच्या आर.सी.बुकची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आर.सी. बुकाची प्रत उपलब्ध करुन न देता इतर माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्याची तयारी त्यांच्या दि. १५.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दर्शविली होती. परंतु या माहितीचा त्यांना कोणताही उपयोग होणार नसल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे या शुल्काचा भरणा संबंधितांकडे केलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक अथवा या प्रकरणी नेमणूक केलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः निर्णय देणे संयुक्तिक राहील असे आयोगास वाटते. त्यामुळे अपिलार्थीच्या दि. २१.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२१.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांकः २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शेख अनिस बुढन, नेवासा रोड, सागर फोटो, मु.पो.ता. श्रीरामपूर,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८
निर्णय दिनांक २७-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ,<br>रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>क्षेत्र व्यवस्थापक,<br>एम.आय.डी.सी. नागापूर, अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>एम.आय.डी.सी., पुणे-३ | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खोटी माहिती प्राप्त झाल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी दिशाभूल करणारी सुनावणी घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२२.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण दहा मुद्यांद्वारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली.

तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०६.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि यासंदर्भात कोणतेही आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी पारीत न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. २,५,६ व ९ च्या संदर्भात पुरविलेली माहिती खोटी आहे. या पृष्ठयर्थ त्यांनी आयोगाकडे त्यांना प्राप्त झालेली ही माहिती खोटी कशी आहे याबद्दल लेखी युक्तिवाद सादर केला व आयोगास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,- "अहमदनगर औद्योगिक क्षेत्रातील एन-२४ या भूखंडाचा लिलाव झाला असल्यास त्यासंदर्भात वर्तमानपत्रातून जाहीरात देण्यात आली होती का?"- अशी माहिती मागविली आहे व मुद्दा क्र.३ द्वारे - "जाहीरात दिली असल्यास कोणत्या वर्तमानपत्रातून व केव्हा, त्याची तारीख व दिवस " अशी माहिती मागविली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस भूखंडाच्या लिलावाबाबत दैनिक सकाळ व लोकमत दि. ०९.१०.२००३ मध्ये बातमी प्रसिध्द करण्यात आल्याची अपिलार्थीस माहिती दिली आहे. तथापि अपिलार्थीस या दोनही वर्तमानपत्राच्या दि. ०९.१०.२००३ रोजीच्या सी.डी.वरुन असे अवगत झाले

आहे की, अहमदनगर येथील औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील एम-२४ या भूखंड लिलावाची जाहिरात या दोनही वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेली नाही. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस दै. सकाळ व लोकमत दि. ०९.१०.२००३ च्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द झालेल्या लिलावाच्या जाहीरातीची सत्यप्रत पुरवावी. मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे विसंगत आहे. मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील श्री. पटवा हे केव्हापासून नगर कार्यालयात कार्यरत आहेत व त्यांची बदली झाली आहे काय, अशी माहिती मागितली होती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये श्री. पटवा हे केव्हापासून कार्यरत आहेत, या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. मात्र श्री. पटवा यांच्या बदलीसंदर्भातील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण श्री. पटवा यांची कधी बदली झाली आहे का? - अशाप्रकारची माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागता येणार नाही.कारण अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील पटवा हे कर्मचारी केव्हा पासून नगर कार्यालयात कार्यरत आहेत, याबाबतची माहिती देणे क्रमप्राप्त आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ मध्ये असे नमूद केले आहे की, एम.आय.डी.सी.च्या अहमदनगर कार्यालयातील भ्रष्टाचारी कर्मचारी व अधिकारी यांनी अनधिकृतपणे श्री.तळपे व कांडेकर यांची एजंट म्हणून नेमणूक केली आहे, आणि त्यांची एजंट म्हणून नेमणूक केल्याच्या पुराव्यापृष्ठयर्थ अपिलार्थीने काही कागदपत्रे जोडली आहेत. या

कागदपत्रांचे अवलोकन करता श्री. तळपे व कांडेकर यांना एम.आय.डी.सी चे भूखंड वाटप झाल्याचे दिसून येते. परंतु यावरुन एम.आय.डी.सी.ने त्यांना अनधिकृतपणे नेमलेले एजंट आहेत, असे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या युक्तिवादातील मुद्दा क्र. ६ हा फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २४.०१.२००९ व दि. २४.०२.२००९ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयामध्ये नगर येथील न्यायालयातून किंवा वकीलाकडून अहमदनगर औद्योगिक क्षेत्रातील M-२४ बाबत नोटीस आली आहे का ? अशी माहिती मागविली आहे. ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी असल्यामुळे ती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. असे असतानाही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयास कोणत्याही वकीलाकडून नोटीस प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे. यासंदर्भात अपिलार्थीने नगर येथील वकील श्री. ए.ए.शेख यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दि. २४.०१.२००९ रोजी पाठविलेल्या नोटीसची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास रजिस्टर्ड पोस्टाद्वारे प्राप्त झाल्याची त्यांच्या कार्यालयाची पोचसही व पोस्टाची पावतीची प्रत आयोगास सादर केली आहे. या प्रतीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास वकील श्री. शेख यांच्या कार्यालयातून पाठविलेल्या नोटीसची प्रत दि. २७.०१.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा मुद्दा की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ शी संबंधित माहिती खोटी पुरविली आहे, हा सिध्द होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेऊन आपला निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती यांचे अशाप्रकारे पृथक्करण करावे लागत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अपील अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सुनावणी घेऊन निर्णय देण्याचे त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जन अपिलीय अधिकारी यांना सूचित करावे व याचबरोबर या प्रकरणी

संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश पारित न करुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती पुरविल्याचे येथे सप्रमाण सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पुरविलेल्या माहितीपैकी काही भाग हा खोटा असल्याचे सप्रमाण सिध्द झाले असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५ व ९ शी संबंधित संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३,५ व ९ शी संबंधित देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः २७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकूंदनगर), औरंगाबाद रोड, अहमदनगर, जि.अहमदनगर ४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र व्यवस्थापक, एम.आय.डी.सी., नागापूर, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डी.सी. पुणे-३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.आय.डी.सी., उद्योगसारथी, महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९
निर्णय दिनांक २७-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विजय मल्लय्या दिकोंडा,<br>रा. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी, जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जळगाव | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार, जळगाव
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जळगाव
त्रयस्थ पक्ष : श्रीमती सिंधूबाई काळू जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष श्रीमती सिंधूबाई काळू जाधव यांनी विशेष मागास प्रवर्गाअंतर्गत प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जासोबत सादर केलेल्या त्यांच्या अर्जा/कागदपत्रांच्या प्रती आणि सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या सी.बी.सी.-१०/२००६/सी.आर.-१५/एव्हीके-५ दि. ५ जून, २००६ ची साक्षांकित प्रत - अशी माहिती

नोंदणीकृत टपालाने मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज उपविभागीय अधिकारी, जळगाव यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तहसीलदार, जळगाव यांच्याकडे उपलब्ध असल्याने त्यांनी अपिलार्थीचा दि. ०५.०२.२००९ रोजीचा अर्ज तहसीलदार, जळगाव यांच्याकडे, दि. ११.०२.२००९ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला. या अर्जावर तहसीलदार, जळगाव यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केली नाही वा अपिलार्थीच्या अर्जास कोणत्याही इतर प्रकारे प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दि. २५.०५.२००९ रोजी निर्णय देऊन तहसीलदार, जळगाव यांना सात दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. परंतु यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही अथवा अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जळगांव यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, लोकसभा निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे, ही माहिती विहित मुदतीत अपिलार्थीस ते देऊ शकले नाहीत.आता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा प्राधान्याने शोध घेऊन अपिलार्थीस एक महिन्याच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्यात येईल. अपिलार्थीने ज्या वेळी माहितीसाठीचा अर्ज केला होता, त्यावेळी श्री. गणेश मरकड नावाचे अधिकारी

तहसीलदार, जळगाव या पदावर कार्यरत होते तसेच आताही ते या पदावर कार्यरत आहेत, अशी त्यांनी आयोगास कल्पना दिली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, एक बाब या ठिकाणी अशी स्पष्ट होते की, दि. ०५.०२.२००९ रोजीचा अर्ज जो, ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याकडे दि. ११.०२.२००९ रोजी प्राप्त झाला, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. एवढेच नव्हेतर अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्याने दि. २५.०५.२००९ रोजी तहसीलदाराला सात दिवसांचे आत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले तरीही आजतागायत, म्हणजे नऊ महिन्याचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात काहीच कळविले गेले नाही, ही बाब माहिती अधिकार अधिनियमाची निश्चितपणे पायमल्ली करणारी आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधी दि. ०५.०१.२००८ असा दिला आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाला उपविभागीय अधिकारी, जळगाव यांनी दि. ०५.०१.२००८ रोजी दिलेले जातीचे प्रमाणपत्र क्र. ७१२/२/२००७ ची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही फार जुन्या कालावधीशी संबंधित होती, असे दिसून येत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागितली असली तरीही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कुठलाही प्रत्यवाय नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य व साक्षांकित स्वरुपात नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे त्रयस्थ पक्षाला दिलेल्या जात प्रमाणपत्राच्या संदर्भात त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती आणि दुसऱ्या मुद्यावरील माहिती म्हणजे सामाजिक न्याय विभागाच्या दि. ०५.०६.२००६ च्या शासन आदेशाची प्रत, ही होय. सामाजिक न्याय विभागाकडील आदेशाची प्रत जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी, अपिलार्थीच्या अर्जाची प्रत तहसीलदार व सामाजिक न्याय विभागाच्या स्थानिक जन माहिती अधिकाऱ्याकडे पाठविणे या प्रकरणी अधिक उचित राहिले असते. परंतु अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचा दिनांक व द्वितीय अपील अर्जाचा दिनांक यामधील व्यपगत झालेला कालावधी पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या दोनही मुद्यावरील माहिती, वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.जन माहिती अधिकारी यांना जर सदर अभिलेखे तीस दिवसांच्या आत उपलब्ध न झाल्यास संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यावर होती, त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप आणि माहितीशी संबंधित कालावधी लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती न पुरविण्यासाठी कोणतेही समर्थनीय कारण मूळात अस्तित्त्वात असू शकत नाही, अशी आयोगाची खात्री आहे. त्यामुळे अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती प्राप्त न होण्यासाठी एकमेव जन माहिती अधिकारी हेच जबाबदार नसून या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक कर्मचारी/अधिकारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, ते सर्वजण नि:संशयपणे जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक कर्मचारी/अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत

कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग करुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून त्यांना प्रदिर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याने या सर्वांवर एकत्रित एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास,या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी हेतूपुरस्सर टाळले असल्याचे त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी हे या मुदतीत आयोगास खुलासा सादर करतील याची खात्री करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व साक्षांकित स्वरुपात नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.
३. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांकः २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. विजय मल्लय्या दिकोंडा, प्लॉट नं.१४, वरद विनायक कॉलनी, कलानगर मागे, गुलमोहर रोड,सावेडी, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जळगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी ( नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जळगाव या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०
निर्णय दिनांक २७-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एल.एस.कोल्हे,<br>रा.कोपरगाव, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,<br>पुणे | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,<br>पुणे | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयात दि.१२.०५.२००९ रोजी प्राप्त झालेले, औरंगाबाद येथील कार्यालयात दि. ०४.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याबद्दल आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२८.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे या संस्थेमार्फत घेतल्या जाणाऱ्या संगणक प्रमाणपत्र परीक्षेसंदर्भात एकूण ११ मुद्यांद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) आपले कार्यालयीन प्रमुखाचे नाव व Designation.

२) आपले कार्यालयीन माहिती अधिकारी यांचे नाव, Designation.

३)आपले कार्यालयीन अपिलीय अधिकारी यांचे नाव,पत्ता, Designation.

४) आपले कंट्रोलिंग Authority कोण आहे.

५) आपले कार्यालयीन कोणती कामे होतात.

६) आपण MSCIT हया परिक्षा MSCIT च्या घेतात व MSCIT Computer Courses घेण्याकरिता Permition देतात. त्या करिता कोणते नियमावली आहे. त्याचे नियमावलीची झेरॉक्स हवे.

७) आपले कार्यालय Govt. undertaking आहे का,असल्यास MSCIT हा अभ्यासक्रम वेगवेगळया Institute घेतला जातात, ती संस्थेस MSCIT हा शिकवण्याकरिता जी परवानगी देतात. त्यावर देखरेख करण्याकरिता आपणाकडे काही नियम आहेत का? असल्यास त्याची झेरॉक्स देणे.

८) MSCIT हा Compuer चा अभ्यासक्रम किती कालावधीचा/किती तासाचा प्रतेक दिवसी घ्यावा,हयाला शिकवण्याकरिता जे प्रशिक्षक असतात त्याची पात्रता काय? त्यांना पगार किती द्यावा/त्यांना किती तास काम करावे. हयाची नियमावली प्रत देणे.

९) MSCIT हया Computer Courses जी फीस आहे ती किती आहे व जर एखादी Institute फीस घेऊन शिकवत नसेल/प्रशिक्षत Staff नसेल तर अशा Institute विरोधात आपण काही करतात का?

१०) कोपरगावमध्ये MSCIT किती संस्था आहे/हयावर कोणाचे नियंत्रण आहे. हा कोर्स किती वयापर्यंत करता येतो.

११) MSCIT Institute काढण्याकरिता काय काय आवश्यक आहे. "

अपिलार्थीच्या या अर्जास महाराष्ट्र ज्ञान महामंडळ,मर्यादित,पुणे येथील जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले.त्यांनी देखील अपिलार्थीच्या अपील अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून, ती प्राप्त होणे त्यांचा हक्क असूनही; आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे, वंचित ठेवले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील

परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती मागविली आहे ते प्राधिकरण हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय असून शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे ते महामंडळ आहे. शासनाचे महामंडळ असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज)च्या तरतुदीप्रमाणे सदर महामंडळ हे 'सार्वजनिक प्राधिकरण' होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आणि संयुक्तिक आहे. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे या संस्थेने अद्यापपावेतो माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूकी केल्या आहेत किंवा कसे, हे संबंधितांच्या आजच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (ख) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने घोषित करणे अभिप्रेत असलेली माहिती आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित , पुणे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या महामंडळाच्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता त्यांच्या कार्यालयाच्या जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची प्रथमतः नेमणूक करावी आणि त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

या आदेशानंतर अपिलार्थीची त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना मुदतीत प्राप्त न झाल्याची अथवा अपूर्ण वा चुकीची माहिती प्राप्त झाल्याची तक्रार आल्यास, अधिनियमातील कलम १९(८) (क) मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळावर आयोगास कारवाई करावी लागेल, याची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचा अनुक्रमे माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज खरोखरीच केला आहे किंवा कसे, यासंदर्भात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित या संस्थेच्या पोचपावतीची अथवा कार्यालयाचा शिक्का असलेली प्रत आयोगास सादर केलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित या संस्थेकडे प्राप्त झाला नसेल तर त्यांना अपिलार्थीस ही माहिती सशुल्क पुरविता येईल व प्राप्त झाला असल्यास हीच माहिती नि:शुल्क मिळण्यास अपिलार्थी पात्र होतील, असेही या आदेशाद्वारे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर**
**दिनांक: २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. एल.एस.कोल्हे, इंदिरा पथ,कोपरगाव,ता. कोपरगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,पुणे इंटर नॅशनल कन्व्हेंशन सेंटर, 'ए' विंग, ५ वा मजला, सेनापती बापट मार्ग, शिवाजीनगर,पुणे-४११ ०१६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,पुणे इंटर नॅशनल कन्व्हेंशन सेंटर, 'ए' विंग, ५ वा मजला, सेनापती बापट मार्ग, शिवाजीनगर,पुणे-४११ ०१६यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य ज्ञान महामंडळ मर्यादित, इंटर नॅशनल कन्व्हेंशन सेंटर, 'ए' विंग, ५ वा मजला, सेनापती बापट मार्ग, शिवाजीनगर,पुणे-४११ ०१६.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१
निर्णय दिनांक २७-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अभिजीत सी. पुप्पाल,<br>रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी<br>समिती, नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>नाशिक. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या सदस्यांच्या संदर्भातील शिस्तभंग कार्यवाहीविषयी काही माहिती मागितली होती. ही माहिती दि. ०१.०१.२००१ ते ०३.०२.२००९ या कालावधीशी संबंधित होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा श्री. एस.ए.शेवाळे यांच्याकडे प्रथम अपील

केले. या अपील अर्जावर त्यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०५.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला नि- र्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक: २७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. अभिजीत सी. पुप्पाल, ३०१, आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६२
निर्णय दिनांक २७-११-२००९

१ श्री. अरुण सोपान वाबळे, : अपिलार्थी
रा.गुहा, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, राहुरी, जि.अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, राहुरी, जि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गणेगाव, कणगर येथील जवाहर विहीर योजनेसंदर्भात त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०४.२००८ ते दि. २०.०५.२००९ या कालावधीशी संबंधित एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज कक्ष अधिकारी, पंचायत समिती, राहुरी यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कक्ष अधिकाऱ्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी दि. २९.०७.२००९ रोजी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत उपअभियंता, जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग राहुरी यांच्याकडे पाठविली. त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर दि.

०३.०८.२००९ रोजी कार्यवाही करुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने दि. ११.०८.२००९ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थी ही माहिती दि. १३.०८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेऊन गेले. परंतु मध्यंतरीच्या कालावधीत अपिलार्थीने दि. १३.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) तरतुदींनुसार प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नसल्याचे व त्यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने दि. ११.०८.२००९ रोजी आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. १३.०८.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांनी पूर्ण माहिती दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सहा मुद्यांद्वारे मागितलेल्या माहितीपैकी, त्यातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने, "---------- आजपर्यंत त्यांच्या खात्यातील रक्कम का वर्ग केली नाही?"- अशा अर्थाची जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित पाचही मुद्यांवर अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०८.२००९ रोजी, अपिलार्थीकडून रु.८/- इतके शुल्क स्वीकारुन त्यांना सुसंगत माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्याचा दिनांक १८.०५.२००९ असा आहे व अपिलार्थीस माहिती दिनांक १३.०८.२००९ रोजी प्राप्त झाली आहे. या कालावधीशी संबंधित कागदपत्रे तपासली असता, त्यामध्ये असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने पंचायत समितीच्या कक्ष अधिकारी यांच्याकडे मूळात दि. १८.०५.२००९ रोजी माहितीसाठीचा मूळ अर्ज केला असता, त्यांनी हा अर्ज संबंधित उपअभियंता यांच्याकडे दि. २९.०७.२००९ रोजी म्हणजेच दोन महिने अकरा दिवस इतक्या विलंबाने पाठविला आहे. त्यामुळे अपिलार्थीस विलंबाने माहिती तर प्राप्त झालीच परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना अपेक्षित माहिती देण्यासाठी त्यांना रु.८/- इतके शुल्क भरावे लागले. या संपूर्ण घटनाक्रमात अपिलार्थीस विलंबाने माहिती मिळण्यास संबंधित पंचायत समितीचे कक्ष अधिकारी जबाबदार ठरत आहेत अपिलार्थीस पंचायत समितीकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याने, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.८/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात कक्ष अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे विहित केलेल्या मुदतीपेक्षा संबंधितांकडे विलंबाने पाठविल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १३.०८.२००९ रोजी आवश्यक ती सुसंगत माहिती प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्विकारलेले शुल्क रु.८/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

३. संबंधित कक्ष अधिकारी, पंचायत समिती, राहुरी श्री. एन.के.घोडके यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. अरुण सोपान वाबळे,रा.गुहा, ता.राहुरी, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, राहुरी, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर /१६३
निर्णय दिनांक: २७.११.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | श्री. सय्यद मुश्ताक अहमद सय्यद राजासाहेब | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांची संस्था बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० च्या अंतर्गत नोंदणी झालेली संस्था असून माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी त्यांच्या संस्थेस लागू नसल्याने श्री. सय्यद मुश्ताक अहमद सय्यद राजासाहेब यांनी त्यांच्या संस्थेकडे केलेल्या मूळ अर्जावरील प्रथम अपिलाच्या संदर्भातील जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी दि. ०७.१०.२००८ रोजी संबंधितास माहिती देण्यासंदर्भात दिलेल्या निर्णयाविरुध्द विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, विचाराधीन प्रकरणी श्री. सय्यद मुश्ताक अहमद सय्यद राजासाब, रा.अहमदनगर यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार अध्यक्ष, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या दि.०१.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या न्यु लॉ कॉलेज, अहमदनगर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांविषयी काही

माहिती मागितली होती. संबंधित संस्थेच्या माहिती अधिकाऱ्याने, त्यांच्याकडील दि. २७.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती त्यांच्या संस्थेकडे ठेवली जात नसल्याने ती देता येत नसल्याचे कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने श्री. सय्यद मुश्ताक अहमद सय्यद राजासाब, रा.अहमदनगर यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे दि. १४.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दि. ०७.१०.२००८ रोजी निर्णय देऊन संबंधित मूळ अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे संबंधित संस्थेस आदेशित केले. तथापि सदर आदेश संस्थेस मान्य नसल्याचे कारण दर्शवून, संस्थेच्या अध्यक्षांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचे प्रतिनिधी व श्री. सय्यद मुश्ताक अहमद सय्यद राजासाहेब उपस्थित आहेत.

या प्रकरणातील अपिलार्थी म्हणजेच मूळ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्था, अहमदनगर यांनी असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ त्यांच्या संस्थेस लागू होत नसल्याने सहायक धर्मादाय आयुक्त यांचा दि. ०७.१०.२००८ रोजी दिलेला निर्णय रद्द करण्यात यावा.

वरील घटनाक्रम अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, श्री. सय्यद मुश्ताक अहमद सय्यद राजासाहेब यांनी त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज दोन वेगवेगळया प्राधिकरणाकडे केले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हे दोनही अधिकारी एकाच प्राधिकरणाशी संबंधित असणे भाग आहे. सहायक धर्मादाय आयुक्त, हे फक्त त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दिलेल्या निर्णयावरील प्रथम

अपिलासंदर्भात, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी म्हणून निर्णय देऊ शकतात. विचाराधीन प्रकरणी त्यांचा संबंधित संस्थेशी, एकच सार्वजनिक प्राधिकरण या नात्याने काहीही संबंध नाही, हे पाहता, सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दि. ०७.१०.२००८ रोजी पारित केलेले, विचाराधीन अपील प्रकरणातील, प्रथम अपील अर्जासंदर्भातील आदेश रद्दबातल करण्यात येत आहेत. श्री. सय्यद मुश्ताक अहमद सय्यद राजासाहेब यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना जर विचाराधीन प्रकरणातील संस्थेसंदर्भात माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीस अनुसरुन मूळ अर्ज करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचे दि. ०७.१०.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांकः २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. अध्यक्ष, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२. श्री. सय्यद मुश्ताक अहमद सय्यद राजासाहेब, घ.नं. ७३२८/५१८०, राजासाब नलवाडे यांचा वाडा, जुना बाजार रोड, पंचपीर चावडी, अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४
निर्णय दिनांक २७-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संतोष आंबादास साळवे,<br>रा. नान्नज, ता.जामखेड,<br>जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>जैन सोशल फेडरेशन संचलित, आनंद ऋषीजी<br>हॉस्पीटल, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध होऊ न शकल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जैन सोशल फेडरेशन संस्था संचलीत आनंद ऋषीजी हॉस्पीटल, अहमदनगर यांच्याकडे २००७-२००८ या कालावधीशी संबंधित, त्यांच्या हॉस्पीटलमध्ये आतापर्यंत किती दारिद्रयरेषेखालील व गरीब रुग्णांना दाखल केले गेले, त्या लोकांना शासन नियमाप्रमाणे मोफत औषधोपचार देण्यात आले होते काय, देण्यात आले असल्यास, रुग्णांचे नाव,पत्ते तसेच माफ केलेल्या बीलाची संकीर्ण प्रत, अशी माहिती

मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन यासंदर्भात पिवळया रेशन कार्डाची प्रत त्यांनी मूळ अर्जास जोडली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित इस्पितळाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी देखील या अपील अर्जावर निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.११.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जैन सोशल फेडरेशन संस्था संचलीत आनंद ऋषी हॉस्पीटल, अहमदनगरचे ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफीसर उपस्थित आहेत. सहायक निबंधक,सहकारी संस्था, अहमदनगर अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता असल्याचे आयोगास प्रतिपादन केले.

हॉस्पीटलच्या प्रतिनिधीने त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगास सादर केला असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, आनंद ऋषीजी हॉस्पीटल, अहमदनगर हे जैन सोशल फेडरेशन ही संस्था मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट व सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट खाली पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट म्हणून नोंदविलेली संस्था असून संस्थेचा रजिस्ट्रेशन क्र.एफ-२३४० असा आहे. संस्थेला शासनाकडून कोणतीही ग्रॅन्ट अथवा मदत मिळत नाही. संस्था पूर्णपणे दानशूर लोकांच्या देणग्यांवर व मदतीवर चालते. सदर हॉस्पीटलमध्ये दारिद्रयरेषेखालील रुग्णांवर मोफत उपचार केला जातो व सदर हॉस्पीटल हे ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालविले जाते. त्याचप्रमाणे त्यांची संस्था ही पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट असल्यामुळे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रीट अर्ज क्र.५२९४/०८ भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरुध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर या प्रकरणात दि. २४.०८.२००९ रोजी निर्णय दिला असून माहिती अधिकार अधिनियमाखाली अर्जदारास

माहिती देणे त्यांना बंधनकारक नाही, त्यामुळे अपिलार्थीचे अपील रद्द करण्यात यावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जैन सोशल फेडरेशन संस्था संचलीत आनंद ऋषी हॉस्पीटल, अहमदनगर यांच्याकडे वर नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितली आहे. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या नागपूर खंडपीठाने श्री. गोविंद रामानंद समर्थ सदगुरु प्रल्हाद महाराज (रामदासी) संस्थान साखरखेर्डा,जि.बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयोग,नागपूर यांच्या रिट पीटीशन क्र. ५२९४/०८ च्या संदर्भात दिलेल्या या निर्णयामध्ये, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अशाप्रकारच्या सार्वजनिक विश्वस्त संस्थांना लागू नाहीत, असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे व अशा संस्थांच्यासंदर्भात काही माहिती मागवावयाची असल्यास संबंधित धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यास ते योग्य निर्णय देऊ शकतात, असे निर्देश दिले आहेत.अशाप्रकारे माहिती अधिकार अधिनियम हा विचाराधीन इस्पितळाला लागू होत नसल्यामुळे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः २७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. संतोष आंबादास साळवे,रा. नान्नज, ता.जामखेड,जि.अहमदनगर

२. ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफीसर, जैन सोशल फेडरेशन संचलित, आनंद ऋषीजी हॉस्पीटल, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२८

निर्णय दिनांक: ३०.११.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. समीर सुधाकर लोंढे,<br>रा.वैजापूर, जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>रोहयो, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर,<br>जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग (पं.),औरंगाबाद. | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
वैजापूर, जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, विशेष प्रकल्प विभाग क्र.१ मध्ये वैजापूरच्या रोहयो (सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैजापूर) या कामाचे हस्तांतरण झाल्यानंतर एकूण मंजूर झालेल्या कामांची संख्या व त्या

कामाच्या प्रशासकीय मान्यतेच्या सत्यप्रती आणि एकूण मंजूर कामाची संख्या व वाटप झालेल्या यंत्रणाचा तपशील, अशी सन २००७-२००८ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अर्जास जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी उपअभियंता यांना त्यांच्याकडील दि. ०६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दि. १०.०८.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या युक्तिवादाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०३.०३.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध असल्याचे कळवूनही अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितल्यानंतर ही माहिती त्यांच्याकडून हस्तगत करुन घेण्याचे

संपूर्ण उत्तरदायित्त्व हे अपिलार्थीचे होते. तथापि अपिलार्थीने त्यांचे उत्तरदायित्त्व योग्यप्रकारे पार पाडल्यासंदर्भात त्यांच्याकडे आयोगास सादर करण्यासाठी, कोणताही पुरावा आज रोजी उपलब्ध नाही. त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः हस्तांतरित करावी. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काबाबत अपिलार्थीने असा दावा केला की, त्यांच्याकडून संबंधित उपविभागाच्या लिपीकाने दि. २०.०९.२००८ रोजी माहितीपोटीचे शुल्क म्हणून रु.५००/- इतक्या रकमेचा स्वीकार केला. तथापि याप्रीत्यर्थ त्यांना संबंधित लिपीकाकडून शासकीय पावती प्राप्त झालेली नाही. तेव्हा या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी स्वत: चौकशी करुन अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या पुराव्याची शहानिशा करुन जर या प्रकरणी संबंधित लिपीकाने अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क प्राप्त करुन घेतले असेल तर आणि अद्यापही या शुल्काच्या रकमेचा शासकीय कोषागारात भरणा केला नसेल तर संबंधित लिपीकावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी आणि अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.५००/- इतके, संबंधित लिपीक हे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करतील, असे पहावे.जर संबंधित लिपीकाने या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केला असेल तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातून अपिलार्थीकडून या माहितीपोटीच्या स्वीकारलेल्या रु.५००/- इतक्या शुल्काची रक्कम त्यांना याच कालावधीमध्ये परत करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्विकारलेले शुल्क रु.५००/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच, वरील निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे, सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. समीर सुधाकर लोंढे,२५, विनायक कॉलनी, वैजापूर, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, रोहयो, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पं.), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२९

निर्णय दिनांक: ३०.११.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख कलीम जहाँगीर,<br>रा.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बीड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, बीड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, जिल्हा परिषद आरोग्य विभाग,बीड

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व योग्य माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असून या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत, नेमणूक केलेल्या, डाटा एन्ट्री ऑपरेटर पदांच्या भरतीबाबत एकूण चार मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती

मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - लेखी परीक्षेत उपस्थित उमेदवारांची संख्या, उमेदवारनिहाय मिळालेले गुण व त्यांची नावे, उमेदवारनिहाय उत्तरपत्रिकेची प्रत व लेखी परीक्षेसाठी काढलेल्या प्रश्नपत्रिकेच्या प्रश्ननिहाय उत्तरपत्रिका - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती पुरविली. तथापि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २, ३ व ४ च्या संदर्भात बीड जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ३०.१२.२००६ रोजीच्या पत्राचा हवाला देऊन, ही माहिती अपिलार्थीस गोपनीय असल्याच्या कारणास्तव ती देता येणार नाही, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. २४.०९.२००८ रोजी पारित केले. या निर्णयाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना यासंदर्भात अपिलार्थीस निवड झालेल्या उमेदवारांमध्ये ज्यांना सर्वात कमी गुण मिळाले, त्यांची नावे आणि अपिलार्थीचे गुण याबाबतची माहिती दि. ३०.०९.२००८ पर्यंत देण्याचे सूचित केले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. ३०.०९.२००८ रोजीच्या पत्राव्दारे विनामूल्य पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. २७.०८.२००८ रोजी व तदंतर दि. ३०.०९.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली चार मुद्यांशी संबंधित माहिती ही, अधिनियमातील तरतुदीनुसार 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकते त्यामुळे या मुद्यांवरील ही संपूर्ण माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. या पैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली आहे. परंतु मुद्दा क्र.२,३ व ४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्याचे त्यांनी गोपनीयतेच्या कारणास्तव नाकारले आहे व असे कळविताना जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा परिषद, बीडच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ३०.१२.२००६ रोजीच्या परिपत्रकाचा हवाला दिला आहे. हे परिपत्रक पाहता असे आढळून आले आहे की, हे पत्र म्हणजे केंद्रीय माहिती आयोगाने त्यांच्याकडील अपील क्र. ११/५३/२००६, दि. ०२.०५.२००६ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत आहे. या निर्णयामध्ये उत्तरपत्रिका न देण्याचे केंद्रीय माहिती आयोगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे. परंतु किती गुण प्राप्त झाले, ही माहिती गोपनीय ठरविण्याचे काहीही कारण नाही, असेही त्यांनी या आदेशामध्ये म्हटले आहे. या निर्णयाची प्रत माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांना दि. ३०.१२.२००६ रोजी पाठविलेली असल्याचे दिसून येत आहे व याचा आधार घेऊन विचाराधीन प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारलेली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वस्वी चुकीची आहे. आजपर्यंत आयोगाकडे उत्तरपत्रिकांच्या संदर्भात झालेल्या दाव्यांमध्ये आयोगाने आणि मा. उच्च न्यायालयाकडील आदेशामध्ये उत्तरपत्रिकांच्या प्रती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उघड न करण्याची भूमिका घेतली आहे. तसेच आयोगाच्या इतर खंडपीठाने देखील उत्तरपत्रिकांची प्रत उघड करु नये, असे निर्णय दिलेले आहेत. हे पाहता अपिलार्थीस या प्रकरणी त्यांच्या मूळ

अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. परंतु या परीक्षेसाठी उपस्थित राहिलेल्या सर्व उमेदवारांना मिळालेले गुण आणि त्यांची नावे आणि लेखी परीक्षेसाठी काढलेल्या आदर्श उत्तरपत्रिकेची प्रत, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. या मुद्यांवरील माहिती त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे गोपनीयतेच्या कारणास्तव अपिलार्थीस देण्याचे नाकारले आहे. ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे या माहितीस गोपनीय मानता येणार नाही आणि ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) व ९ मधील तरतुदींचा भंग प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे होणे संभवत नसल्याने, ही माहिती अपिलार्थीस नाकारण्याचे कोणतेही कारण नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपर्यंत द्यावयाच्या राहिलेल्या उर्वरित माहितीतील मुद्दा क्र.२ व ४ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ४ च्या संदर्भातील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख कलीम जहाँगीर, गजानन नगर, इदगारोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,जिल्हा परिषद आरोग्य विभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३०

निर्णय दिनांकः ३०.११.२००९

१ श्री. गंगाधर अर्जुनराव कदम, : अपिलार्थी
रा.तरोडा बु., नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार नायगाव (खै), जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. उत्तम वसंत कवटीकर, मे.माधव सिताराम मेडेवार, श्री.वाहेद रहेमतुल्ला, मे.साईबाबा ट्रेडिंग कंपनी, श्री.राम पंढरीनाथ चिद्रावार.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नायगाव (खै.) यांच्याकडे प्रथम अपील रजिस्टर्ड पोस्टाद्वारे दाखल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ व विलंब केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नायगाव तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. उत्तम कवटीकर, मे.माधव सिताराम मेडेवार, श्री. वाहेद रहेमतुल्ला, मे.साईबाबा ट्रेडिंग कंपनी व श्री. राम पंढरीनाथ

चिद्रावार यांना शासनाकडून मिळणाऱ्या दरमहा रॉकेल नियतनाच्या सत्यप्रती, त्यांचे रॉकेल वितरण रजिस्टर व स्टॉक रजिस्टर व त्यांना वितरण केलेल्या रॉकेल वाटप नोंदवहीच्या सत्यप्रती, शासनाकडून दिवाळी सणानिमित्त अतिरिक्त रॉकेल व त्याचे वितरण केलेल्या विक्रेत्यांची लेखी व तपशीलवार माहिती मागितली होती. ही माहिती दि. ३१.०१.२००५ ते दि. १५.०८.२००८ या कालावधीशी संबंधित असून अपिलार्थीने ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी तहसीलदार, नायगांव (खै.) यांच्याकडे यासंदर्भात अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आपल्या युक्तिवादाचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दि. ०७.१२.२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने तहसीलदार, नायगाव (खै.) यांना विचाराधीन प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्जाचा हवाला देत असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. २५.०८.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, त्यांनी आयोगाकडे दि. २१.११.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केल्यानंतर दि. ०७.१२.२००८ रोजी संबंधितांच्याकडून प्राप्त झाली आहे, त्यामुळे विचाराधीन अपील अर्ज निकाली काढावा. अपिलार्थीचे हे पत्र आयोगास नायब तहसीलदार, नायगाव (खै.) श्री. कोंडीबा किशनराव तारु यांनी सादर केले आहे. या पत्रातील

मजकूर पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधितांच्याकडून आयोगाकडे त्यांनी द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध असल्यामुळे, त्रयस्थ पक्ष ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देतील, त्याप्रमाणे ते अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात. त्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस माहिती दिली आहे. हे पाहता अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन या अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.१९३०/०८, दि.२४.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०.११.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गंगाधर अर्जुनराव कदम, व्दारा- आनंदा हैबती भुरे, सावली निवास, प्रकाशनगर, तरोडा बु., नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगांव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८
निर्णय दिनांक ३०/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव,<br>रा.नांदगांव, पो.गांजूर, ता.चाकूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती,<br>लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, लातूर | | |

**निर्णय**

श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ३०.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ३०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १८.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, नांदगांव, पो.गांजुर, ता.चाकूर, जि.लातूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९
निर्णय दिनांक ३०/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,<br>रा.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, निलंगा, जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय कार्यालय, निलंगा, जि.लातूर | | |

**निर्णय**

श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १३.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १५.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २२.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिकचौक, उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०
निर्णय दिनांक ३०/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कु.उषा व्यंकटराव जाधव (पाटील),<br>बालाजीनगर, शेखापूर रोड (तुळजापूर रोड),<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

कु. उषा व्यंकटराव जाधव (पाटील) यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक १६.०८.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ५८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. कु. उषा व्यंकटराव जाधव (पाटील), बालाजीनगर, शेखापूर रोड (तुळजापूर रोड), उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२११
निर्णय दिनांक ३०/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल,<br>रा.जाफ्राबाद, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि.जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२
निर्णय दिनांक ३०/११/२००९

१ श्री. शिंदे रामेश्वर गणपतराव, : अपिलार्थी
रा.पोहनेर, ता.परळी वै., जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, माजलगांव, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, माजलगांव, जि.बीड

**निर्णय**

श्री. शिंदे रामेश्वर गणपतराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०८.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिंदे रामेश्वर गणपतराव, मु.पो. पोहनेर, ता.परळी वैजनाथ, जि.बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३
निर्णय दिनांक ३०/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती रमा दशरथ सरकटे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>विनय मराठी प्राथमिक शाळा,<br>क्रांतीनगर, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्रीमती. रमा दशरथ सरकटे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २५.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २५.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती. रमा दशरथ सरकटे, साईधाम अपार्टमेंट, विद्यापीठ गेट, जयसिंगपुरा रोड, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४
निर्णय दिनांक ३०/११/२००९

१ श्री. मो. मोईज खान पठाण, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय (पुरवठा),
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी,
तहसील (पुरवठा) कार्यालय,
नांदेड

**निर्णय**

श्री. मो.मोईज खान पठाण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ११.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०३.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १४.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. मोईज खान पठाण, व्दारा- राम संगनवार, 'ओम निवास', प्र.नि.हा. शाळेजवळ, कैलास नगर, नांदेड ४३१६०५.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५
निर्णय दिनांक ३०/११/२००९

१ श्री. राजेंद्र काशीनाथ पितृभक्त, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
ल.पा. (स्था.स्तर) विभाग, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
ल.पा. (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

श्री. राजेंद्र काशीनाथ पितृभक्त यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २१.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १७.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि. ०१.०९.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ५१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र काशीनाथ पितृभक्त, एन-१२, जी-१५, स्वामी विवेकानंद नगर, हडको, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१६
निर्णय दिनांक ३०/११/२००९

१ श्री.शेख ख्वाजा शेख अमिर, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
ल.पा. (स्था.स्तर) विभाग, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
ल.पा. (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

श्री. शेख ख्वाजा शेख अमिर यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २५.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०१.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर सुनावणी घेऊन दि. १०.०९.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ७८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख ख्वाजा शेख अमिर, नरीमननगर, रेल्वेस्टेशनजवळ, जालना ४३१२१३.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१७
निर्णय दिनांक ३०/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अनिल किशनराव पाटील (घुगे),<br>रा.हिंगोली | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, हिंगोली | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय आयुक्त,<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. अनिल किशनराव पाटील (घुगे) यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ३१.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०६.१२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २८.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४२९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल किशनराव पाटील (घुगे), स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, ता.जि. हिंगोली.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२३

निर्णय दिनांक ३०-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शरद बा. कुलकर्णी,<br>१६७, "बलवंत", ज्योतिनगर, ज्योति मंदिराजवळ,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष :
१. ए. एम. देशमुख
२. श्री. रामनाथ सखाराम नागे
३. श्री. बी. टी. कटारे
४. श्री. जिजाराम आवारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, सदरचे अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजी त्यांना प्राप्त झालेल्या निकालाच्या विरुध्द

केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांनी माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी उडवाउडवीचे आदेश दिले, त्यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बोकुड जळगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद येथील श्री. रामनाथ सखाराम नागे यांनी तत्कालीन ग्रामसेवक श्री. जी. डी. चव्हाण व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांच्या संगनमताने त्यांच्या मालकीच्या जागेच्या क्षेत्राची खाडाखोड करुन खोटी कागदपत्रे तयार केल्यासंदर्भात एकूण नऊ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५५ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनाशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि श्री. नागे व श्री. आवारे हे दोन त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आजही हवी आहे. तथापि त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या प्रथम प्रतिसादाबाबत अपिलार्थीस विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, हे पत्र त्यांना ऑक्टोबर महिन्यात प्राप्त झाले असून त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या पाकिटावर पोस्टाचा शिक्का नाही. जन माहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांच्याकडे जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत असा पुरावा नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ९ मुद्दयाव्दारे प्रश्नार्थक स्वरुपात आणि त्यांचे खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारची माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-अन्वये अर्जदाराने माहिती अधिका-यास त्यांच्या कृतीची कारणे, खुलासे व स्पष्टीकरणे विचारणे व यासंदर्भात त्यांचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. अर्जदाराने माहिती मागितल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात ती उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करणे इतपतच प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, रामनाथ सखाराम नागे यांच्या मालकीचे घर नमुना नंबर ८ च्या प्रती, या नोंदी नमुना नंबर ८ मध्ये ज्या कागदपत्रांच्या आधारे घेतल्या गेल्या

आहेत त्या कागदपत्राच्या प्रती, श्री. रामनाथ सखाराम नागे यांच्या मुलांच्या नावाने नोंदणी झालेल्या जागेच्या नमुना नंबर ८ च्या नोंदी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी संबंधित ग्रामसेवकाला या प्रकरणी लेखी खुलासा करण्यास दिलेल्या लेखी आदेशाची प्रत, या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी सर्व प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, ग्रामसेवक श्री. जी. डी. चव्हाण यांना या प्रकरणी दिलेल्या कारणे दाखवा नोटीसच्या प्रती आणि श्री. जी. डी. चव्हाण यांनी यासंदर्भात दिलेल्या खुलाशाची प्रत एवढीच माहिती देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसाच्या आत ही माहिती अपिलार्थीस देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जास दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या प्रतिसादाचे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस वर स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण देय माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे या प्रकरणातील सर्व सहायक यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शरद बा. कुलकर्णी, १६७, "बलवंत", ज्योतिनगर, ज्योति मंदिर जवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२४

निर्णय दिनांक ३०-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ससाने बाबासाहेब आनंदराव,<br>मु. पो. वडवाळी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती अपूर्ण व समाधानकारक नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागासवर्गीय मुलींची परीक्षा फी, उपस्थिती भत्ता व सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती संदर्भात सन २००३ ते २००८ या कालावधीतील एकूण ९ मुद्दयाव्दारे माहिती मागितली

होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडवाळी, तालुका पैठण यांच्याशी संबंधित होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, ज्यांची अशा प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे त्यांच्याकडे, दिनांक २५-०७-२००८ रोजी पाठविला. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००८ रोजी मुद्दा क्रमांक १ ते ८ शी संबंधित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून बहुतांशी माहिती प्राप्त झाली, तथापि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ६ व ८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही अपूर्ण व समाधानकारक नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीचा आक्षेप फक्त जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३, ६ व ८ शी संबंधित त्यांना प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे " मागासवर्गीय मुलींकडून परीक्षा फी घेण्यात यावी असे आदेश शासनाने शाळेला कधी

दिलेले आहेत त्याचा दिनांक व वर्ष देण्यात यावे " अशी माहिती मागितली आहे. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर असा खुलासा केला की, शासनाने अशा प्रकारचे आदेश कधीही दिलेले नाहीत. त्यामुळे या मुद्दयावर ते अपिलार्थीस माहिती देऊ शकत नाहीत. तथापि संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीला दिलेले उत्तर पाहता त्यांनी या मुद्दयावर अपिलार्थीस अनावश्यक माहिती पुरविल्याचे दिसून येते. त्यामुळे गट शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन च्या संदर्भात मागासवर्गीय मुलींकडून परीक्षा फी घेण्यात यावी असे शासनाचे आदेश नाहीत एवढीच माहिती अपिलार्थीस कळवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे "सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती मिळण्यासाठी प्रत्येक वर्षी मागासवर्गीय मुलींचा प्रस्ताव जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना पाठविला आहे का" व मुद्दा क्रमांक ८ व्दारे ........ "प्रत्येक वर्षी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव का पाठविण्यात आलेला नाही याचा खुलासा करण्यात यावा," अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या दोनही मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित करणा-या स्वरुपाची माहिती त्यांच्याकडे मागितल्याचे दिसून येत आहे अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे या मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक माहिती मिळाली नाही, हे अपिलार्थीचे म्हणणे आयोग फेटाळून लावत आहे.

वरीलप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेल्या व अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे केलेले पृथःकरण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात, वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ससाने बाबासाहेब आनंदराव, मु. पो. वडवाळी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२५

निर्णय दिनांक ३०-११-२००९

१ श्री. सुभाष किसनराव पाटील, : अपिलार्थी
प्लॉट नं. ३, सुनेम रेसिडेन्सी, रचनाकार कॉलनी,
रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १. उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद
२. उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व व पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांनी १५ दिवसाच्या आत तर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना क्रमांक १/२ यांना एक महिन्याच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करुनही त्यांना संबधितांनी संपूर्ण माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी मंजूर केलेला निधी, उपविभागीयनिहाय व खड्डे भरण्यासाठी वापरलेला निधी, रस्त्याचे नांव, गुत्तेदाराचे नाव, खड्डे खात्याने भरले की गुत्तेदाराने भरले, अदा केलेल्या देयकाच्या प्रती, मोजमाप पुस्तिकांचा तपशील, खड्डयांचे छायाचित्र, अगोदरच्या  व काम पूर्ण झाल्यानंतरच्या प्रती, अशी सन २००७ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती.  अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११२६ इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.  तथापि यानंतरही मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०९-२००८ रोजी निर्णय देऊन औरंगाबाद विभागातील माहिती १५ दिवसात व जालना विभागातील माहिती एक महिन्याच्या आत अपिलार्थीस देण्याचे संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांना सूचित केले.  तथापि यानंतरही माहिती

प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधींनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मोजमाप पुस्तिकांच्या प्रती दिल्या गेलेल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०३-२००८ रोजी सशुल्क माहिती पुरविली आहे. त्यांच्याकडे जेवढ्या मोजमाप पुस्तिका उपलब्ध होत्या तेवढ्या त्यांनी अपिलार्थीस दिल्या आहेत. अद्याप काही द्यावयाच्या बाकी आहेत. त्या अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत पुरविण्यात येतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस अद्यापपावेतो मोजमाप पुस्तिकाच्या प्रती व रस्त्याचे फोटो या दोन मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. फोटोच्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात या प्रकरणी त्यांनी खड्डयाचे अगोदरचे व खड्डे भरल्यानंतर अशा प्रकारचे कोणतेही फोटो न घेतल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद ग्राह्य धरण्यात येत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी अधीक्षक अभियंता यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक उपविभागाशी संबंधित असल्याने या प्रकरणी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या अर्जाच्या प्रती सर्व संबंधित उपविभागाकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस उपरोक्त माहिती देण्याचे सूचित करणे हे या प्रकरणी अभिप्रेत होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी तसे न करता सर्व उप

अभियंत्यांकडून माहिती एकत्र गोळा करुन नंतर ती अपिलार्थीस पुरविण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम म्हणून अपिलार्थीस अद्यापपावेतो ब-याच उपविभागाकडून मोजमाप पुस्तिकेच्या सत्यप्रती मिळाल्या नाहीत. सबब जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या ज्या ज्या मुद्दयावरील माहिती त्यांना अद्याप देणे बाकी आहे त्या त्या सर्व उप विभागाकडून अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती गोळा करुन ही संपूर्ण माहिती १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर आदेश पारीत करतांना ते अधीक्षक अभियंता यांनी पारीत केले नसल्याचे दिसून येते. यापूर्वी वेळोवेळी आयोगाने सूचना देऊनही औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम मंडळाकडून प्राप्त झालेल्या प्रत्येक अपिलावरील निर्णय हे अधीक्षक अभियंता यांच्या सहायकाने दिल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या सहायकाची अपिलीय अधिकारी म्हणून त्यांच्या विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडून एक तर नियुक्ती करुन घ्यावी किंवा जर याबाबत अधीक्षक अभियंता यांची अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असेल तर माहिती अधिकार अधिनियमातील अंतर्गत प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर अधीक्षक अभियंता यांची स्वाक्षरी असेल याची, त्यांनी आदेश निर्गमित करतांना खात्री करुन घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २३-०३-२००८ रोजी माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस आजपावेतो जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये ११२६ इतके, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ११२६ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष किसनराव पाटील, प्लॉट नं. ३, सुनेम रेसिडेन्सी, रचनाकार कॉलनी, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२६

निर्णय दिनांक ३०-११-२००९

१ श्री. ई. टी. काळे, : अपिलार्थी

रा. खुपटा, पो. मादणी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,

सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कृषी विस्तार अधिकारी, पंचायत समिती,

सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषी अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. मिलींद नाना जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुदतीत दिली नसल्यामुळे त्यांनी जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांच्या अपील अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळाली नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश देऊन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. मिलींद नाना जाधव यांच्या संदर्भात एका मुद्याद्वारे व श्री. विठ्ठल रामाजी जाधव व श्री. नाना विठ्ठल जाधव यांच्यासंदर्भात दुसऱ्या मुद्याद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मिलींद नाना जाधव, रा. खुपटा यांना विशेष घटक योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या विहिर प्रकरणासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेल्या संपूर्ण कागदपत्राच्या नकला व मुद्दा क्रमांक २ व्दारे श्री. विठ्ठल रामजी जाधव व श्री. नाना विठ्ठल जाधव यांनी पूर्वी घटक योजनेअंतर्गत व इतर योजनेचा लाभ घेतला असूनही त्यात त्यांचे नाव नाही आणि त्यांनी इतर निर्णयाचा फायदा घेतला आहे. त्यांचे यादीत नाव न देण्याचे कारण काय, याचा खुलासा - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकरी यांच्याकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्याच्यावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये श्री. विठ्ठल रामजी जाधव यांच्याशी संबंधित मागितलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-११-२००८ रोजी दिली आहे. ही माहिती त्यांच्या मुख्य कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना विशेष परिश्रम घ्यावे लागले, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी वेळ लागला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण २ मुद्यावरील माहितीपैकी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ शी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. मिलींद नाना जाधव यांच्या संदर्भातील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोठलाही प्रत्यवाय असू नये. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा खुलासा अपेक्षित केला असून, श्री. विठ्ठल रामजी जाधव व श्री. नाना विठ्ठल जाधव यांचे नाव यादीत न देण्याचे कारण काय, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. परंतु एवढे असूनही श्री. विठ्ठल रामजी जाधव व श्री. नाना विठ्ठल जाधव यांचे नाव ज्या योजनेच्या लाभार्थी यादीमध्ये आहे त्या लाभार्थ्यांची यादी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे, असे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित पुरविलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तिशः दिनांक २२-११-२००८ रोजी म्हणजे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर दिली असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी मुळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांच्याकडून विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्या संपर्काशिवाय माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क उरत नाही. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती आणि सुसंगत माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर दिली असल्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस देय माहिती, त्यांनी मूळ अर्जामध्ये त्यांना माहिती कशी हवी आहे, याचा खुलासा न करुनही, विनामूल्य प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर आता नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ई. टी. काळे, रा. खुपटा, पो. मादणी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२७

निर्णय दिनांक ३०.११.२००९

१ श्री. रुपचंद लक्ष्मण गाडेकर, : अपिलार्थी
मु. लिंबे जळगांव, पो. तुर्काबाद, ता. गंगापूर,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गंगापूर तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात

सन २००७ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - हजेरीपटाची सत्यप्रत, जॉबकार्डाची सत्यप्रत, मजुरांचे खाते क्रमांक - या मुद्याचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्याने त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ३१.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे ही माहिती ज्या ग्रामपंचायतीत उपलब्ध आहे त्या ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रती पाठवून अपिलार्थीस ही माहिती देण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक २४.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडेअधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक ०५.०९.२००८ पूर्वी विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांना सूचित केले. परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित २८ ग्रामसेवकांकडे पाठविली. त्यापैकी तुर्काबाद, अंबेगाव या ग्रामपंचायतींनी अपिलार्थीस समक्ष माहिती दिली, सुलातानाबाद व पुरी या ग्रामपंचायतींनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे आता ते ही माहिती अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती गंगापूर यांनी अपिलार्थीचा दिनांक २७.०५.२००८ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही विहित मुदतीत केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही २८ ग्रामपंचायतींकडे उपलब्ध आहे. त्यापैकी ४ ग्रामपंचायतीने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. उर्वरित माहिती २४ ग्रामपंचायतींकडून ही माहिती अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्याचे गट विकास अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, गट विकास अधिकारी, पंचायत समिती गंगापूर, यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची माहिती संबंधित २४ ग्रामपंचायतींनी त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांनी व्यवस्था करावी. अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना ज्या २४ ग्रामसेवकांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी, उर्वरित २४ ग्रामपंचायतींकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित चोवीस ग्रामसेवकांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रुपचंद लक्ष्मण गाडेकर, मु. लिंबे जळगांव, पो. तुर्काबाद, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.